साप्ताहिक

# माणूस

२८ ऑगस्ट ८२
दोन रुपये



डॉ. जैन आम्हाला 'सूर्य' परत हवाय,
तुमची किंमत सांगा.

२५ लाख?
६० लाख?
७५ लाख?



## बंद चिरडण्याचा आदेश दिल्लीचा होता.

# माणूस

¤

**वर्ष : बाविसावे**

**अंक : बारावा**

**२८ ऑगस्ट १९८२**

**किंमत : दोन रुपये**

¤

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

¤

सहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

¤

वार्षिक वर्गणी

**पन्नास रुपये**

¤

**प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.**

¤

**राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.**

¤

पत्ता :

**साप्ताहिक माणूस**

**१०२५ सदाशिव, पुणे ३०**

**दूरध्वनी : ४४३४५९**

¤

**मुखपृष्ठ**

**अनंत सालकर**

¤


# बंद ?....काही शंका

मुंबई पोलिसांचे बंड म्हणा, दंगल म्हणा, कठोर उपायांचा अवलंब करून मोडून काढल्याबद्दल शासनाचे अभिनंदन केले पाहिजे. पण हे उपाय या आधीच का योजले गेले नाहीत असा प्रश्नही शासनाला विचारायला हरकत नाही.

पोलिसांमधील असंतोष व बेशिस्त वर्तन गेल्या दीड-दोन वर्षांपासून स्पष्ट दिसत होते. या वर्षीच्या १५ ऑगस्टला काळ्या फिती लावून निषेध व्यक्त करण्याचा पोलीस संघटनेचा निर्णयही अगोदरच जाहीर झालेला होता १५ ऑगस्टला ध्वजारोहण झाले आणि पोलिसांनी आपला निर्णय अंमलात आणला. काळ्या फितीच्या निषेधाला चूलबंदची जोडही दिली गेली. त्याच-वेळी या बेशिस्तीचा विमोड करण्याचे कणखर पाउल तडकाफडकी उचलले गेले असते तर पुढचा सगळा वणवा पेटलाच नसता. वणवा पेटल्यावर विझवणे केव्हाही चांगले. पण तो पेटूच न देणे अधिक चांगले नाही का ? जी कृती १७ ऑगस्टला मध्यरात्री केली तीच कृती १५ ऑगस्टला सकाळी का केली नाही ? १७ ऑगस्टच्या मध्यरात्री सीमा सुरक्षा व राखीव दलाच्या पोलिसानी एकदम झडप टाकून पोलीस सघटनेच्या कार्यकर्त्यांची धरपकड केली. शस्त्रागारातून शस्त्रे पळवून मोठी दंगल घडवण्याचा पोलीस संघटनेचा इरादा असावा या कल्पनेने शस्त्रागार ताब्यात घेतले गेले. असा काही इरादा असता तर याठिकाणी थोडीफार तरी चकमक झडली असती. पण तेथे काहीच घडले नाही. आपल्याला अटक केली जात आहे हे पाहून अनेक संघटना-कार्यकर्त्यांची म्हणे भीतीने घाबरगुंडीही उडाली. याचा अर्थ बंड वगैरेची फार पूर्वतयारी झाली होती असे दिसत नाही.

१५ ऑगस्टला शासनाने निर्धारयुक्त कृती केली असती, शंभर-दोनशे सघटना कार्यकर्त्यांना ताब्यात घेऊन गजाआड बद केले असते तर बड म्हणा, दगल म्हणा, तेव्हाच, तिथल्या तिथेच जिरली असती १७ ऑगस्टच्या सघटना-कार्यकर्त्यांच्या मध्यरात्रीच्य धरपकडीनंतर जेवढी प्रतिक्रिया उमटली तेवढीही उमटली नसती. १७ ऑगस्टच्या मध्यरात्री संघटना-कार्यकर्त्यांची धरपकड झाली. याची प्रतिक्रिया म्हणून सघटनेशी सबंधित असलेल्या इतर पोलिसानी सकाळी रस्ते-वाहने अडवली. जे आपल्याला पकडायला आले त्याच्यावर दगडफेक केली. हा सगळा मामला चार-सहा तासात आटोपला. फार फार तर १५ ऑगस्टला एवढेच घडले असते. शक्यता यापेक्षा खूप कमीच घडण्याचीअ धिक. कारण मध्यरात्रीच्या उगाचच नाट्यपूर्ण केलेल्या हालचालीपेक्षा ही सकाळची, भर दिवसाढवळ्या केलेली कृती अधिक स्वाभाविक व सरळ वाटली असती. उगाचच १८ ऑगस्टला जो घबराट पसरला तो निर्माणच झाला नसता. कदाचित सैन्याला पाचारण करण्याची जी वेळ आली तीही आलीच नसती. शासनाने दोन दिवस दिरंगाई का करावी हे अद्याप एक न उलगडणारे कोडे आहे. दोन दिवस तयारी करायला लागले असतील, तर हे कारण हास्यास्पदच म्हणावे लागेल. १००-१५० लोकाना पकडण्यासाठी आणि संघटना बरखास्त केल्याचा निर्णय जाहीर करण्यासाठी दोन दिवस तयारी करावी लागते ? त्यासाठी सीमा

सुरक्षा, राखीव दल, सैन्य यांची मदत घ्यावी लागते ? मध्यरात्रीच्या काळोखाचा आश्रय कशासाठी ? जरूर कुछ डाल मे काला है.

मुख्यमंत्री श्री. भोसले, राज्यपाल श्री. लतिफ हे दोघेही १७–१८ ऑगस्टला, एवढी मोठी पोलीस-बंड-बिमोड कारवाई चालू असताना मुंबईत नव्हते. शासन प्रमुखांची ही अनुपस्थिती काय सुचवते ? 'टाइम्स'चे गिरिलाल जैन यानी लिहिले आहे की, शासनातर्फे पोलिसाविरुद्ध काही जबरदस्त कारवाई होणार असल्याची कुणकुण त्यांना १७ ऑगस्टला दुपारीच, म्हणजे सुमारे दहा/बारा तास अगोदर समजलेली होती. परंतु मुख्यमंत्री व राज्यपाल हे दोघेही शासनप्रमुख मुंबईत हजर नसताना एवढी मोठी कारवाई होईल, यावर त्यांचा विश्वासच बसला नाही. पोलिसांचा कट खरोखरच एवढा रचला जात असता, बंड थोडेफार जरी संघटित होत असते, तर त्याच्या बिमोडाचे महत्त्वाचे काम बाजूला ठेवून, हे दोघेही शासनप्रमुख, नेमक्या बिमोड कारवाईच्या वेळीच मुंबई सोडून दिल्लीला कशाला गेले असते ? त्यांना हेतुपुरस्सर अंधारात तरी ठेवले गेले असावे, किंवा त्यांची अनुपस्थिती ही एक सोय म्हणून तरी पाहिली गेली असावी किंवा ही पोलीस-बंड-कथा तरी अतिरंजित असावी. गृहराज्यमंत्री तरूण व तडफदार आहेत. त्यांचेकडून या घटनेला नाट्यरूप देण्याचा प्रयत्न कशावरून झाला नसावा ? रिबेरो आणि जिचकर यांचाच या मोहिमेत विशेष पुढाकार दिसतो. पोलीस आयुक्त रिबेरो यांच्या कडक कारवाईमुळे मुंबईतील गुडांचे बरेच अड्डे व या अड्ड्यांशी संबंधित पोलीस हतबल झालेले आहेत. रिबेरोंच्या बदलीसाठी अनेक प्रयत्न, खटपटी सुरू होत्याच. या हतबल व त्यामुळे दुखावलेल्या-संतापलेल्या व बेशिस्तीला प्रवृत्त झालेल्या पोलिसांना आणखी एक तडाखा देण्याची आवश्यकता रिबेरोना भासली असणे अगदी शक्य आहे-स्वाभाविकही आहे. रिबेरोंच्या या गुड व पोलिस-बेशिस्ती निर्मूलन कार्याला कुणीही सुयशच चिंतील.पण १५ ऑगस्टला पोलिसांनी काळ्या फिती लावल्यावरच हे निर्मूलन कार्य त्वरित उरकले गेले असते, तर पुढची सगळी मोहिम कदाचित अनावश्यकही ठरली असती. केंद्रीय गृहसचिव श्री. चतुर्वेदी प्रत्यक्ष मोहीम सुरू झाली तेव्हा मुंबईत दाखल झाले. त्यांनी पंतप्रधानांकडे पाठवलेला अहवाल गृहराज्यमंत्री श्री. जिचकर यांच्यावर बराच ठपका ठेवणारा आहे असे कळते. 'करायला गेलो एक' असे म्हणण्याची पाळी जिचकरावर येऊ नये म्हणजे मिळवली.

¤

मोहिमेची आखणी करताना एक काळजी घेतली गेली नाही—त्यामुळे दोन दिवस मुंबई शहर गुंडांना लुटमार-जाळपोळ करण्यास मोकळे मिळाले. प्रत्येक पोलीस ठाण्यावर त्या भागातील समाजकंटकांच्या, गुंडगिरी करणाऱ्या लोकांच्या याद्या असतात. असा धोका वगैरे संभवत असला तर समाजविघातक प्रवृत्तीचा अगोदरच बंदोबस्त केलेला असतो, समाजकंटकांना वेचून धोका संपेपर्यंत गजाआड डांबून ठेवण्यात येते. या वेळी पोलीसच ठिकाणावर–ठाण्यावर नव्हते. त्यांना निःशस्त्र करून घरी परत पाठविण्यात आलेले होते. ठाण्याचा ताबा स्थानिक परिस्थितीची माहिती नसणाऱ्या सीमा सुरक्षा दलाच्या किंवा राखीव दलाच्या सैनिकांकडे होता. अगोदर गुडाना—समाजकंटकांना अटक करून डांबूनही ठेवलेले नव्हते व नंतर माहितीच्या अभावी अशांना पकडणेही शक्य झाले नाही. त्यामुळे ही सगळी टोळधाड मुंबईची यथेच्छ लूटमार करण्यास मोकळीच राहिली. पोलीस बिथरलेले असले तरी त्यांचे लक्ष्य लुटमार नव्हते. त्यांनी रस्ता रोको केले, वाहने अडवली. राग-चीड व्यक्त करण्यासाठी दगडफेक केली. अनेक ठिकाणी कामगार–पोलीस एकत्रच राहत असल्याने पोलिसांच्या बरोबरीने कामगारांनीही या दगडफेकीत-दंगलीत हात धुवून घेतला असणारच. कारण तोही चिडलेला आहेच; पण दादरसारख्या मध्यवस्तीत दुकाने लुटली, माल पळवला, गाड्यांच्या काचा फोडल्या, त्या कोणी? दंगल कामगारांची की पोलिसांची हेच कित्येक तास लोकांना नीट समजले नाही. शासनाने अचानक झडप घातल्यासारखी, मध्यरात्री कारवाई केल्यामुळे हा घबराट आणि गोंधळ माजला. याचा फायदा गुंडांनी–समाजकंटकांनी घेतला नाही तर ते गुड–समाजकंटक कसले ? मुंबईसारख्या शहरांना यापुढे अशा गुंडगिरीच्या लाटांना नेहमीच तोड द्यावे लागत राहणार आहे. यावेळी तर गुडांना थोडेफार आवरू शकणारे पोलीसच ठिकाणावर नसल्याने किंवा पोलिसांतील काहीनी गुंडांशीच हातमिळवणी केलेली असल्याने लाटेने अधिकच बेफाम व उग्र स्वरूप धारण केले. प्रचंड वित्तहानी झाली. नागरिकांचे फार हाल झाले जे गोळीबारात सापडून मेले किंवा जखमी झाले त्यांच्यापैकी बहुसंख्य बिचारे सर्वसामान्यच असणार. कारण गुंडाना कुठे केव्हा पळायचे-निसटायचे याचा सराव असतो. सापडतो तो तुमच्या-आमच्यासारखा सर्वसाधारण माणूसच. जो कर भरतो, कायदे पाळतो व राज्यकर्त्यांनी आपल्याला सुरक्षितता द्यावी अशी अपेक्षा बाळगून असतो. ही साधी अपेक्षाही कधीकधी पुरी होत नाही. तर मग लोकानी काय करावे ? एक जुना श्लोक आठवावा–

अबला यत्र प्रबला
बालो राजा, निरक्षरो मंत्री ।
नहि नहि तत्र सुखाशा
जीवितआशापि दुर्लभा भवती ।।

—श्री. ग. मा.

मुंबई

## चार दिवस विध्वंस जपत राहणं मुंबापुरीला परवडणारं नाही.

# पण जखम आत ठुसठुसतेय....

प्रतिनिधी

'कमिशनरसाहेबांनी आम्हाला फसवलं. मंगळवारी संध्याकाळी (१७ ऑगस्ट) अर्जंट रेडसाठी म्हणून सगळ्यांना पोलीस-स्टेशनच्या आवारात जमवलं आणि शस्त्रं काढून घेतली...'

'आम्ही कुठे संपावर गेलोय ? आमची शस्त्रं काढून घेतल्यावर आम्ही कसे ड्यूटीवर जाणार ? तो x x x x x मुख्यमंत्री आणि x x रिबेरोसाहेब समजतात काय स्वतःला ? त्यांच्यामुळंच ही दंगल झाली...'

'पंचाण्णव टक्के पोलीस कामावर आले वगैरे साफ खोटं. अहो, गिरणवाले परतले म्हणून नाही का टी. व्ही.वर सांगत होते ? त्यातलाच हा प्रकार !'

'रोज मस्टरवर सही करून आम्ही परत येतो. शस्त्रं परत केल्याशिवाय आम्ही काम कसं करणार ?'


'या चाळीत एक दिवस राहून दाखव म्हणावं बाबासाहेबाला ! साले गाड्यांतून फिरतात !'

'आमच्या नेत्यांची सुटका होईपर्यंत आम्ही गप्प नाही बसणार !...'

नायगावच्या पोलीसमुख्यालयाच्या आवारातल्या चाळीतून ऐकू येणारे हे तळतळाट. बरीच वर्षं या चाळी विटका रंग अंगावर खेळवत असहाय्यपणे जगल्या आहेत. अखेर अठरा ऑगस्टला त्यांचीही सहनशक्ती संपली. लाठ्या चालवायला सरावलेल्या हातांनी दगड-विटा आणि सोडावॉटरच्या बाटल्यांचा आसरा घेतला.

आज बंदुकीच्या जोरावर शांतता आली असली तरी जखम बुजलेली मात्र नाही. किंबहुना चिघळली आहे. दंगलीनंतरचे तीन दिवस या भागातून फिरताना हा तणाव सतत जाणवत होता.

रस्त्याच्या नाक्यांवर पडलेला काचांचा चुराडा. मधूनच एखाद्या दुकानाची मोडतोड. राखण करत बसलेले निगरगट्ट चेहऱ्यांचे सी. आर. पी. आणि संतापाने कुजबुजणाऱ्या वस्त्या.



चाळींच्या खाली किंवा नाक्यावर उभी राहून तरुण पोरं गप्पा छाटत असतात. ही पोलीसदलातली नवी भरती. परवाच्या दंगलीत याच मंडळींनी मोठ्या प्रमाणावर भाग घेतला. आपण जे काही केलं त्याबद्दल त्यांना पश्चात्ताप तर सोडाच; पण सरकारला कधी तरी धडा द्यायलाच हवा होता असं वाटतंय. तसं ते उघडपणे बोलूनही दाखवतात.

हेडक्वार्टरला लागूनच असलेल्या मैदानात सध्या लष्कराचा तळ आहे. समोरची शेड सी. आर. पी. वाल्यांनी बळकावलेली दिसली. मी नायगावला पोचलो तेव्हा हेडक्वार्टरच्या प्रशस्त दरवाजात पहारा देणारा जवान सोडला तर एकूण वातावरण सुस्तावलेलंच होतं. पोलीसस्टेशनच्या व्हरांड्यात चारही बाजूंना सी. आर. पी. वाले पहुडले होते. दंगलीनंतरचा श्रमपरिहार चालला असावा !

मिसरूड न फुटलेले दोघं-चौघं पोलीस आणि त्यांना सूचना देणारा वयस्कर इन्स्पेक्टर सोडला तर स्टेशनमध्येही फारशी जाग नव्हती. दंगलीच्या दुसऱ्या दिवशीचं हे दृश्य. सकाळीच कमिशनर रिबेरोंनी सत्तर टक्के पोलीस कामावर परतल्याचं म्हटलं होतं. नायगावच्या या मुख्यालयात मात्र त्याचं थोडंही चिन्ह दिसत नव्हतं. इन्स्पेक्टरकडे याविषयी चौकशी केली तर त्यानं काहीही बोलायचं नाकारलं.

मैदानातल्या दगडांच्या खचावरून आदल्या दिवशीच्या (बुधवार, १८ ऑगस्ट) रणधुमाळीची कल्पना येत होती. चारही बाजूंच्या

चाळीतून हेडक्वार्टरवर हल्ला चढवण्यात आला, असं ही घटना प्रत्यक्ष पाहिलेल्यांनी सांगितलं. हल्ल्याची मोर्चेबंदी व्हायची चाळीच्या गच्चीमधून. सोडावॉटरच्या बाटल्या, दगडांचा असा वर्षाव झाल्याने सी. आर. पी. वाले जसजसे पुढे येत तसतसे हे निदर्शक माघार घेत आणि चाळीत लपत. सी. आर. पी. च्या जवानांना हा भाग अनोळखी. या गनिमी काव्यामुळं ते गोंधळत. चाळीत शिरले तर तिथली सगळी दारं बंद. माग फिरले तर बाटल्यांचा मारा पुन्हा सुरू होई. अखेर वैतागून त्यांनी घराच्या दारांना बाहेरून कड्या घातल्या. दगडफेक करणाऱ्या काही पोरांना चाळीत शिरून बदडलं. चार नंबरच्या चाळीत तर पहिल्या मजल्यापर्यंत ते पाठलाग करत आल्याचं तिथल्या रहिवाशांनी सांगितलं. सी. आर. पी. वाले असे गोंधळले असताना असिस्टंट कमिशनर शरद मथुरे आणि काही इन्स्पेक्टर्सनी मात्र धैर्य दाखवलं. चाळीच्या गच्चीवर जाऊन त्यांनी काही हल्लेखोरांची गचाडो पकडली; पण परिस्थिती एवढी हाताबाहेर गेली की, गोळीबार करावा लागलाच ! त्यात एकजण ठार झाला !

पोलिसांचं बंड म्हटल्या गेलेल्या या दंग्याची पहिली ठिणगी पडली बुधवारी पहाटे अडीच वाजता. लॅमिंग्टनरोड पोलीसस्टेशनच्या आवारातल्या पोलीसचाळींना सी. आर. पी. वाल्यांनी अचानक वेढा घातला. पोलीससंघटनेचे नेते एस. डी. मोहिते इथेच रहातात. चार–पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्या अंधारातच मोहित्यांचं दार ठोठावलं. त्यापैकी दोघांच्या हातात मशिनगन्स होत्या. मोहित्यांच्या बायकोने दार उघडल्यावर या अधिकाऱ्यांनी मोहित्यांना उठवलं. तोंड धुवायला किंवा कपडे बदलायलाही त्यांना संधी दिली नाही आणि आपल्याबरोबर यायला सांगितलं. आपल्याला अटक झाल्याचं मोहित्यांच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. त्यांच्याबरोबर शेजारच्या यशवंत सान्यानाही नेण्यात आलं. संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांपैकी साने होते.

अडीचचा ठोका हा मुंबईतल्या वरिष्ठ पोलीसअधिकाऱ्यांच्या दृष्टीने ‘ झिरो अवर ’ ठरला असावा. कारण या एकाच वेळी मुंबईत सर्वत्र पोलीससंघटनेविरुद्धच्या योजनाबद्ध कारवाईची सुरुवात झाली. नायगाव, वरळी, माहीम आणि माटुंग्याच्या पोलिसांच्या वस्त्यांना सी. आर. पी. च्या जवानानी वेढा दिला. नेत्यांच्या अटकेची बातमी फुटली तर गडबड सुरू होऊ नये म्हणून ही दक्षता होती.

त्या वेळेपुरता हा हेतू साध्य झालाही. कारण सकाळी साडेसात–आठपर्यंत आपल्याला अटकेची माहिती नव्हती असं नायगावच्या लोकांनी मला सांगितलं. आदल्या दिवशी संध्याकाळी धाईघाईनं शस्त्र काढून घेतल्यानं ते चक्रावले होते इतकंच. सकाळी ते ड्युटीवर गेले तरी त्यांना शस्त्र परत करण्यात आली नव्हती. इथूनच दंग्याला सुरुवात झाली. शस्त्रं नाकारलेले पोलीस रस्त्यावर आले. रस्त्यावरची वाहनं त्यांनी अडवली. टायरमधली हवा काढली. लालबाग नाक्यावर तर ते रस्त्यावर आडवे झोपले. सुरुवातीला बसमधल्या लोकांना वाटलं, गिरणी-कामगारांचं काही तरी आंदोलन असावं; पण नंतर या सगळ्यांच्या रंगीबेरंगी शर्टाखालच्या एकजात खाकी पँट्स पाहून बघ्यांना शंका आली.

या संदर्भात परळच्या लेबर इन्स्टिटयूटमध्ये काम करणाऱ्या एका बाईनी सांगितलं, ‘ सकाळी ड्युटीवर गेलेले पोलीस बाहेर आले तेव्हा त्यांनी आपले शर्ट काढून ठेवले. टोपी खिशात ठेवली आणि आंदोलनाला सुरुवात केली. ते फारच भडकलेले दिसत होते. बसमधून उतरणाऱ्या काहीजणांना त्यांनी मारहाणही केली. ’

नायगावचे निदर्शक पुढे दादर स्टेशनवर पोचले आणि त्यांनी हैदोस घातला.

इथून पुढे दंगल झपाट्याने पसरली. वरळीच्या बी. डी. डी. चाळीत आधीच नाजूक परिस्थिती.

तिथल्या पोलिसांचा उठाव गुंड-झोपडपट्टीवाल्यांना वरदानच ठरला.

हल्लेखोर पोलिसांचा नूर कसा होता हे दादर पोर्तुगीज चर्चची घटना सांगेल. ‘ पोलीससंघटनेचा विजय असो! ’ अशा घोषणा देत सकाळी अकराच्या सुमाराला दोन ट्रक एल्फिन्स्टनरोडकडून आले. ट्रकमध्ये सगळी आडदांड पोरं आणि त्यांच्या हातात लोखंडी सळया त्यांना इशारा देणारा एक पोक्त गृहस्थ. हा हवालदार वगैरे असावा असं ही घटना पहाणाऱ्यांनी सांगितलं. त्याच्या इशाऱ्यानुसार पोरांनी रस्त्यावरच्या प्रत्येक गाडीचा, दुकानाचा हातातल्या सळयांनी चक्काचूर केला !


दादरच्या टिळक–ब्रिजच्या तळाशी पोलिसांची वस्ती आहे. इथल्या पोलिसांच्या मुलांचाही जाळपोळीत पुढाकार होता. पंच्याऐंशी क्रमांकाची बस त्यांनी थांबवली. त्यांच्याबरोबरचा मध्यमवयीन माणूस ओरडला, जाळा ! ’ इतक्यात दुसरा एक पोक्त गृहस्थ तिथे आला. हाही पोलीसच असावा. त्याने पोरांना दम भरला म्हणून पोरं थांबली; पण तो निघून गेल्यावर मात्र त्यांनी ती बस पेटवलीच !

या पोरांच्या हातात लोखंडी कांबी कुठून आल्या असं मी एका ज्येष्ठ पोलीसअधिकाऱ्याला विचारलं. तो म्हणाला, ‘ या सळया प्रोहिबिशनच्या असाव्यात. दारूचे डबे फोडण्यासाठी त्या लागतात. ड्यूटी संपल्यावर पोलिसांकडून शस्त्रं जशी काढून घेतली जातात तसा या सळया घेतातच असं नाही. कित्येकदा त्या उघड्यावरच पडलेल्या असतात. ’

हे ऐकल्यावर आदल्या दिवशी पोलिसांकडून शस्त्रं काढून घेण्याची सावधगिरी कमिशनरनी दाखवली नसती तर काय झालं असतं हे दृश्य डोळ्यांसमोर आलं. किती मुडदे पडले असते, चाळीच्या चक्रव्यूहातून शस्त्रांचा मुकाबला करताना लष्कर कसं वागलं असतं याची कल्पना करणंही भयानक होतं...

नायगावच्या चार नंबरच्या चाळीजवळ गोळीबार झाला. इथे तळाशी असलेल्या ‘ कर्नाटक लाँड्री ’च्या बंद दरवाजाच्या तळाला गोळी लागली आणि आत घुसून शोकेसची काच तिने फोडली. दुपारी अडीचचा हा सुमार. लाँड्रीचे मालक रमेश होवाळे म्हणाले ‘ गोळीबार झाला तेव्हा मी जेवत होतो. बाहेर आरडाओरडा भयंकर

**मंगळवार – रात्री अडीचचा ठोका हा ‘ झिरो अवर ’ ठरला....**



शूट ॲट साइट... परिस्थितो आटोक्याबाहेर गेली तेव्हाच...

वाढला होता. काहीजण घाबरून खाली बसले. त्यापैकीच एकाच्या मांडीवर गोळी लागली !'

गोळीबार करतानाही लष्कर आणि सी. आर. पी. वाल्यांनी खूप काळजी घेतल्याचं यावरून दिसतं. कोणत्याही परिस्थितीत कमरेवर गोळीबार होणार नाही किंवा परिस्थिती हाताबाहेर गेल्याशिवाय 'शूट ॲट साइट' चा मार्ग वापरायचा नाही हे त्यांनी पाहिल्याचं नमूद केलं पाहिजे.

माहिमच्या पोलीसवस्त्यांत मात्र सी. आर. पी. वाल्यांनी अतिरेक केल्याचं दिसतं. जवळच्या कोळीवाड्यातून दंगलीला सुरुवात झाली आणि सी. आर. पी. नी मारहाण केली पोलिसांच्या चाळीत, असं इथल्या रहिवाश्यांचं म्हणणं आहे.

एकदा दंगलीचं निमित्त मिळाल्यावर मग मुंबई पेटायला वेळ लागत नाही. कमिशनर रिबेरोंच्या दक्ष कारवायांमुळे आधीच हातभट्टी–मटकेवाले हतबल झालेले. त्यांना ही गरळ ओकायला सुवर्णसंधीच वाटली !

ज्या भागात दंगल प्रकर्षानं पेटली त्यापैकी काही शिवसेनेचे बालेकिल्ले आहेत हेही लक्षणीय म्हणावं लागेल. प्लाझा सिनेमासमोरच्या खांडके बिल्डिंगच्या परिसरात वारंवार दगडफेक होत होती. दुसऱ्या दिवशी सकाळी या भागात एक बस जाळण्यात आली. अनेक दुकानांवरही हल्लेखोरांचा रोख होता. सेनाभवनाच्या जवळचा हा भाग काय किंवा 'राजू ज्वेलर्स'चं दुकान फोडण्यात आलं तो परळनाका काय शिवसैनिकांचे अड्डेच ! बांद्र्याच्या खेरवाडीतल्या दंगलीत तर एका सैनिकाचाच पुढाकार होता. या सैनिकावरचे फौजदारी खटले अंतुलेंच्या राजवटीत काढून टाकण्यात आले होते.

या संदर्भात सेनाप्रमुखांनी काही दिवस आधी घेतलेल्या भोसलेविरोधी पत्रकार परिषदेकडे निर्देश केला जातो; पण दंगलीला सेनापतींचा प्रत्यक्ष आशीर्वाद असण्याची शक्यता कमीच. नाही तर गिरगावसारखा भाग शांत राहिला नसता. सैनिकांनी हात धुऊन घेतले इतकंच.

गिरणीकामगारांना मात्र त्यांच्या संयमाबद्दल धन्यवाद द्यायला हवेत. भाई भोसले घोर्शिग यांच्या घरावरच्या हल्ल्यापाठी गिरणीकामगारांची प्रेरणा असण्याची शक्यता नाकारता येत नसली तरी प्रत्यक्ष हल्लेखोरात जवळच्या झोपडपट्टीवाल्यांचाच भरणा होता असं आसपासचे रहिवासी सांगतात. असे काही तुरळक प्रसंग सोडले तर ऐन दंग्याच्या वेळी गिरणगाव शांतच होता. उलट दंगल सुरू झाल्यावर सर्वांना ती गिरणीकामगारांचीच वाटल्याने इथली तरुण मुलं चिडलेली होती.आजही त्यांची ही चीड व्यक्त होत होती.काही तरुणांनी या चिडीनेच नंतर दंग्यात भाग घेतला असण्याची शक्यताही नाकारता येत नाही; पण सर्वसाधारणपणे हा भाग स्वस्थ होता. दोन लाख गिरणीकामगारांचं आदल्याच दिवशी 'जेल भरो' आंदोलन झालं होतं हे लक्षात घेतलं तर या गोष्टीचं महत्त्व अधिक कळतं. त्यांनी पोलिसांच्या हातात हात मिळवले असते तर अख्खी मुंबई पेटायला वेळ लागला नसता !

या दंगलीच्या निमित्तानं दिसलेली पोलीसदलातली बेशिस्त मात्र अत्यंत 'स्वाभाविक' म्हणावी लागेल.

बुमरँगला कधी तरी आपला गुणधर्म दाखवावाच लागतो.
या दंग्याने हाच नियम पुन्हा एकवार सिद्ध केला आहे !
एकोणऐंशी साली जनता राजवटीत पंजाब, हरयाना वगैरे राज्यांत

पोलिसांचं बंड उद्भवलं होतं. त्या वेळचे गृहमंत्री एच.एम. पटेल यानी या प्रश्नाचा विचार करण्यासाठी दिल्लीत सर्व राज्यांच्या मुख्य-मंत्र्यांची बैठक बोलावली. या बैठकीनतर पोलीससंघटनेचे नियम नक्की करण्यात आले. त्यानुसार त्या वर्षीच्या ऑक्टोबरमध्ये आय.जी. पी. च्या सहीने आदेशही निघाले.

दरम्यान मुंबईत एस. डी. मोहितेच्या नेतृत्वाखाली पोलिसानी आपली वेगळी संघटना स्थापन केली होती. हालांना वैतागलेल्या पोलिसांनी या संघटनेला उत्स्फूर्त पाठिंबाही दिला. संघटनेची १९ जणांची कार्यकारिणी बनवण्यात आली. या मंडळींना आय.जी.पी.च्या आदेशातली बंधनं जाचक वाटली असल्यास नवल नाही. 'तुम्हाला स्वत:ची संघटना हवी की साहेबाची ?' असा सवाल त्यांनी पोलिसा-पुढे टाकला. शिवाय एस. डी. मोहित्यांना अध्यक्ष म्हणून जाहीर कर-ण्यात आलं.

महाराष्ट्रात नव्यानं सत्तेवर आलेल्या अंतुले सरकारनं अशा बेका-यदा संघटनेवर खरं तर बंदी घालायला हवी होती; पण सवंग लोक-प्रियतेच्या पाठी लागलेल्या अंतुलेंना या जबाबदारीची जाणीव कशी होणार ? त्यांनी या संघटनेला मान्यता देऊन टाकली. एवढंच नव्हे तर त्यांच्या पहिल्या सभेला ते स्वत: हजरही राहिले !

हे करताना अंतुलेंचा डोळा पक्षांतर्गत गटबाजीकडे होता. मोहि-त्यांच्या संघटनेला प्रभाकर कुंटेंचा आशीर्वाद आहे, हे त्यांनी पाहिलं. कुंटे हे पक्षातले अंतुल्यांचे विरोधक. अशा माणसाच्या हाती (अप्रत्यक्ष-पणे का होईना) संघटना राहू देणं अंतुलेंसारख्या धूर्त राजकारण्याला कसं पटावं ? त्यांनी मोहितेंना आपल्या कळपात ओढायला सुरुवात केली. संघटनेच्या पहिल्या सभेला अंतुल्यांबरोबर कुंटेही व्यासपीठा-वर होते; पण त्यांना भाषण करू देण्यात आलं नाही !

तरीसुद्धा ऑक्टोबर १९८१ मध्ये पोलिसांनी संप केलाच. याच काळात अंतुलेंविरुद्ध पक्षांतर्गत कारवाया बऱ्याच वाढल्या होत्या. यात विशेषत: प्रेमलाताई चव्हाणांचा गट आघाडीवर होता. कुंटे याच गटाचे. या संपालाही त्यांचीच चिथावणी असल्याचं त्या काळात बोललं गेलं होतं.

या संपानंतर अंतुल्यांनी संघटनेला चुचकारण्याची हद्द केली. कदा-चित पोलिसांना खूष ठेवून पक्षातल्या विरोधकांना नामोहरम कर-ण्याचा त्यांचा विचार असावा. 'कमिशनर कसबेकर हटाव' ही संप-वाल्यांची मागणी होती. अंतुल्यांनी कसबेकरांची मंत्रालयात अतिरिक्त गृहसचिव म्हणून बदली करून टाकली. त्याआधी ३० सप्टेंबरलाही त्यांनी कसबेकरांना या संघटनेसाठी डावललं होतं. पोलीस परेड ग्राउंडवर सभा घ्यायची परवानगी कमिशनरनी नाकारली; पण अंतु-ल्यांनी मंत्रालयातून पोलिसांना ती परवानगी दिली.

एवढं झाल्यावर पोलीसनेते चेकाळले असले तर नवल नाही. मधल्या काळात संघटनेतही दोन तट पडले. चिटणीस चिखलकरांनी मोहित्यांवर अफरातफरीचा आरोप केला. या दोन गटात डिसेंबर-मध्ये नायगावला तुफान हाणामारी झाली आणि मोहित्यांच्या गटानं संप पुकारला. अवघ्या तीन महिन्यातला हा दुसरा संप !

हा संप तर हिंसक होता. वरळी, माटुंगा इथल्या पोलीसस्टेशनवर संपकऱ्यांनी झुंडीनं जाऊन दगडफेक केली. वरळीला स्टेशनच्या खिड-क्याही मोडल्या. जवळजवळ शंभर पोलीसव्हॅनसमधली हवा काढून टाकली. खुद्द कमिशनरची गाडीही यातून सुटली नाही.

माटुंगा पोलीसस्टेशनला तर इन्स्पेक्टरला मारून तिथली कोठडी फोडायचा प्रयत्न संपकऱ्यांनी केल्याचं त्या वेळी प्रसिद्ध झालं होतं. त्या बातमीत 'या प्रकारची फक्त साधी नोंद करा' असे आदेश आल्याचंही म्हटलं होतं; पण अंतुले सरकारनं याचा इन्कार केला नाही, की या गंभीर गुन्ह्याबद्दल जे दोषी होते त्यांच्यावर कारवाईही केली नाही !

याशिवाय सत्तेच्या आपल्या शेवटच्या दिवसात अंतुल्यांनी संघ-


## प्रसिद्ध झाले. . .

संदीप पाटील आणि रवी शास्त्री
सुनील आणि कपिलदेवनंतरची
भारतीय क्रिकेटची ही दोन आशास्थाने.
संदीप खेळाला निर्णायक कलाटणी
देऊ शकतो.
तर रवी निर्णायक कलाटणी देणाऱ्या
कोणालाही हुकमी साथ देऊ शकतो.
आंतरराष्ट्रीय दर्जाचे हे दोन खेळाडू
प्रथमच सांगत आहेत — त्यांच्या
क्रिकेटजीवनाची कथा.

# पटक आणि पटकार

लेखक : संदीप पाटील, रवी शास्त्री
मूल्य रुपये तीस
सवलत मूल्य रुपये पंचवीस
आदित्य प्रकाशन, मुंबई

टनेला पन्नास हजाराची देणगीही जाहिररीत्या दिली.

यामुळे पोलीसनेते अंतुल्यांना मिंधे झाले; पण बेबंद बनले. एस. डी. मोहित्यांची भाषा तर अत्यंत उद्धट होती. अनेकदा ते संघटनेच्या बैठकीत कमिशनरबद्दल अर्वाच्च बोलत. अलीकडे पोलीसमहानिरीक्षकांबरोबर झालेल्या बोलण्यांच्या वेळीही ते फारच बेगुमानपणे वागत होते असं एका वरिष्ठ पोलीसअधिकाऱ्यानं मला सांगितलं.

सत्तावीस जुलैला झालेल्या पोलीससंघटनेच्या बैठकीत पंधरा ऑगस्टला निषेध म्हणून काळ्या फिती लावण्याचा निर्णय झाला.

पोलीसमहानिरीक्षक कृष्णनाथ मेढेकर हा कर्तबगार अधिकारी. पोलिसांच्या गाऱ्हाण्यांची त्यांना जाणीव होती. मुंबईचे आयुक्त असताना त्यांनी अनेकदा मोहिते आणि त्यांच्या सहकाऱ्यांशी चर्चा केली होती. काळ्या फिती लावणं हा त्यांनाही स्वातंत्र्यदिनाचा अपमान वाटला. त्यांनी तसं सात ऑगस्टला संघटनेला कळवलं.

पण मोहिते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते! आठ ऑगस्टला त्यांनी तसं मेढेकरांना कळवलं.

खरं तर मोहित्यांनी एकदम असं आततायी पाऊल टाकायचं कारण नव्हतं. मेढेकराच्या अध्यक्षतेखाली पोलिसांच्या मागण्यांचा विचार करण्यासाठी नेमण्यात आलेला अहवाल अजून यायचा आहे. तोपर्यंत तरी थांबायला हरकत नव्हती.

नेमकं इथेच पाणी मुरतंय.

मोहिते का थांबले नाहीत?

या संदर्भात गुप्तहेरखात्यातला एक निवृत्त अधिकारी म्हणाला; 'स्वातंत्र्यदिनापूर्वी तेरा-चौदा ऑगस्टाला आणि नंतर सोळा तारखेला संघटनेच्या बैठका झाल्या. त्यात चर्चा एकच-बाबासाहेबांना कसं उलथून पाडायच! मी या बैठकांना हजर रहाणाऱ्या पोलिसांना म्हटलंही, 'तुम्ही उगाच भलत्या डोक्यानं चालू नका!'

हे 'भलतं डोकं' कुणाचं?

संघटनेच्या काही बैठका वरळीच्या हॉटेल पुनम इन्टर नॅशनलमध्ये होत, असंही समजलं.

अलिशान हॉटेलमध्ये बैठका घेण्याइतका पैसा कुठून आला?

संघटनेकडे एका पंचाहत्तर हजाराच्या चेकची नोंद आहे असं याच अधिकाऱ्यानं सांगितलं. हा अंतुल्यांना दिलेल्या रकमेव्यतिरिक्त असलेला चेक आला कुठून?

पंधरा ऑगस्टपूर्वी संघटनेने पोलिसांकडून निधीच्या रूपात अडीच लाख रुपये जमा केल्याचं सरकारनं जाहीर केलंय. नायगावला मी याबद्दल काहीजणांना विचारलं, तर सुरुवातीला त्यांनी असा निधी जमवल्याचं साफ नाकारलं; पण नंतर संघटनेचा खर्च कसा चालतो याबद्दल फारच ताणल्यावर दहा रुपये दिल्याचं मान्य केलं.

म्हणजे पैसे जमवले! मग ते गेले कुठे? एवढ्या अडीच लाखाचं काय करणार होती ही मंडळी?

केंद्रीय गृहसचिव डी. एन. कपूर यांनी 'संघटनेचा उद्देश वेगळा आणि अधिक गंभीर होता' असे म्हटलं आहे. हा 'वेगळा उद्देश' काय? आंदोलन दीर्घकाळ चालवायचा या मंडळीचा हेतु होता; पण सरकारनं वेळीच घाला घातला असं म्हटलं जातं. त्यात त्यामुळच तथ्य वाटतं.

अंतुल्यांचा मोहित्यांशी असलेला संबंध आणि I will hit back हे त्याचे उद्गारही डोळ्याआड करता येणार नाहीत.

बाबासाहेबांविरुद्धची पक्षांतर्गत बंडाळी शिगेला पोचली असताना हे घडलं. बारा, तेरा, सोळा ऑगस्टच्या संघटनेच्या बैठकीतल्या 'बाबासाहेब हटाव'च्या चर्चेचा त्याच्याशी काही संबंध आहे?

अगदी हेच प्रश्न केन्द्राने विचारात घेतले असावेत.

अकरा ऑगस्टलाच 'क्रश इट' असे आदेश दिल्लीहून आल्याचं सध्या पोलीसगोटात बोललं जातंय. म्हणूनच बाबासाहेब अशी कठोर पावलं उचलण्यास तयार झाले असावेत. स्वतःच्या हिंमतीवर ते असं काही करतील हे संभवत नाही!

तेरा ऑगस्टला सी. आर. पी. च्या बारा बटालियन्स (बारा हजार जवान) आणण्यात आल्या. मुंबईत सोळा ऑगस्टच्या 'जेल भरो'साठी त्या आल्या असं सांगितलं गेलं असलं तरी त्यांचा खरा उपयोग या पोलीसउठावासाठीच झाला. 'जेल भरो' तर अत्यंत शांततेने पार पडलं होतं. शिवाय ही काही गिरणीकामगार आंदोलनातली पहिली पायरी नव्हती. दत्ता सामतांचा सूरही फार टिपेचा नव्हता. मग बारा हजार जवानाची गरज काय? स्वाभाविकच त्यांचा उपयोग दिल्लीच्या आदेशासाठी असावा असं ठामपणे वाटतं.

आज सरकारला आततायीपणे पोलीसनेत्यांना अटक केली म्हणून अनेकजण दोष देताहेत. त्यामुळेच दंगल पेटली असा या मंडळीचा सूर आहे; पण भावी धोका टाळण्यासाठी केलेली ही कारवाई होती. बेशिस्तीचं विष निपटून काढताना एवढी किंमत द्यावी लागणारच!

¤

दंगल दोन दिवसांत शमली.

फार दिवस विध्वंस जपत रहाणंही मुंबापुरीला परवडणारं नाही!

एक गोष्ट मात्र अजूनही भयचकित करते.

दंगलीत हात सगळ्यांनीच धुऊन घेतले. अगदी सात-आठ वर्षांच्या मुलांनीही दगड मारायची संधी सोडली नाही. बसची काच खळकन फुटताना किंवा एखादं दुकान लुटताना या तरुणांच्या चेहऱ्यावर दिसणारा तो आनंद ... मनसोक्तपणे ओरबडण्याची ती वृत्ती... आणि जमावाला चढलेली झिंग...

मला हिंदी सिनेमातली दृश्यं आठवू लागली.

बलात्कार करणाऱ्यांच्या चेहऱ्यावरही कुठे तरी हाच भाव असतो. सुप्त वासनेला आसुरी वाट मिळाल्याचा.

पोरांची वासना मात्र वेगळी आहे. बरेच दिवस त्यांना काही तरी नाकारलं गेलंय...जखम आत ठुसठुसतेय...

याला 'क्रांतियोग्य परिस्थिती' म्हणायच की अराजक... की अराजकाकडून क्रांतीकडे...

तुम्ही काहीही विचार करा. त्यांना त्याची फिकीर नाही. ते फक्त पुढच्या संधीची वाट पहाणार आहेत...! □

कामगारवृत्त

# दिलासा देणारा डाय केमचा विजय

भारतीय मजदूर संघाने गेल्या दोन महिन्यांपासून घेतलेल्या खडतर मेहनतीनंतर शहाड येथील 'अमर डाय केम' ही कंपनी ६ ऑगस्ट १९८२ पासून पूर्ववत सुरू झाली असून १५५० कामगारांची गेल्या नऊ महिन्यांपासून सुरू असलेली उपासमार एकदाची थांबली आहे !

अमर डाय केम ही केमिकल फॅक्टरी आहे. या कारखान्यात काम करणाऱ्या कामगारानी नेहमीच आपले नेतृत्व बदलते ठेवलेले दिसते. या ठिकाणी पूर्वी बॉम्बे लेबर युनियन आपले नेतृत्व करीत होती. त्यानंतर तेथील कामगारानी इंटकचे नेते श्री.सलामतराय पुरुस्वामी यांचे नेतृत्व स्वीकारले.

सलामतरायनी कंपनीबरोबर एक करारही केला होता. या कराराची मुदत ३१ डिसेंबर १९८० रोजी समाप्त झाली. त्यानंतर तीन महिन्यांनी म्हणजे मार्च १९८१ मध्ये सलामतराय यांच्या युनियनने कंपनीकडे नवीन मागण्या सादर केल्या.

कायद्यानुसार सलामतराय यांच्या युनियनशी वाटाघाटी होऊन नवीन करार व्हावयास हवा होता; पण तसे झाले नाही. सलामतराय यांची युनियन मालकाला मिळाली आहे असा दाट संशय कामगारांना आल्याने त्यांनी आपल्या नेतृत्वात बदल करण्याचे ठरविले.ह्या काळ डॉ. दत्ता सामंतांच्या भरभराटीचा काळ होता. कामगारांना वाटले की, आपल्या कारखान्यात जर आपण डॉ. दत्ता सामंतांना आणले तर अतीव कायदे करून देणारा नवीन करार अस्तित्वात येऊ शकेल. त्यानुसार कामगारानी आपला निर्णय पक्का केला आणि डॉ. दत्ता सामंतांचे नेतृत्व त्यांनी या कारखान्यात आणले.

डॉ. सामंतांचे आगमन म्हणजे कारखान्यात संप किंवा टाळेबंदी निश्चित हे गणित आता अगदी दृढ होत गेलेय. कारण डॉ. सामंत आले की झटपट आम्हाला काही तरी मिळालं पाहिजे ही कामगारांची धारणा असते. त्या अपेक्षेनेच त्यांनी डॉ. सामंतांना आणलेलं असतं ; पण मालकांनाही डॉ. सामंतांचं वावडं असतं.

अमर डाय केममध्ये डॉ. सामंत आले आणि त्यांच्या आगमनाने उद्भवलेल्या परिस्थितीवर तोडगा म्हणून अवघ्या दोन महिन्यांच्या आतच या मालकाने आपल्या कपनीला कुलूप लावून टाळेबदी पुकारली !

कामगारांनी डॉ. सामंतांचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर त्यांच्या महाराष्ट्र जनरल कामगार युनियनच्या वतीने लागलीच मागण्यांचा खलिता व्यवस्थापकाना सादर करण्यात आला डॉ सामतांची ताकद ओळखून व्यवस्थापकांनी वाटाघाटीची तयारीही दर्शवली होती. त्यानुसार प्राथमिक चर्चाही सुरू झाली. होती; पण इतक्यातच परिस्थितीने वेगळी कलाटणी घेतली.

कंपनीला काम चालू करून २५ वर्षे पूर्ण झाल्याने त्यानिमित्त कामगाराना काही तरी बक्षिसी देण्यात यावी अशी जोराची मागणी कामगारानी केली. कपनीची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नसल्याने आपण अशा प्रकारची बक्षिसे देण्यास असमर्थ असल्याचे व्यवस्थापकानी लागलीच कळविले या गोष्टीने कामगार संतापले. त्यातच त्यांच्या 'जनरल डिमाण्डसही' समोर होत्या. कामगारांची शक्ती वाढली होती. ती काबूत ठेवून योग्य त्या वेळी तिचा उपयोग करून घेण्याचे नेतृत्वाचे काम होते; पण ते त्याना जमले नाही !

चिडलेल्या कामगारांनी कंपनीच्या आवारात मोर्चा काढण्यास, निदर्शने करण्यास सुरुवात केली. कामावर असलेल्या अधिकाऱ्यांना दमदाटीने बाहेरही काढण्यात आले आणि मोर्चात सहभागी होण्याविषयी त्यांच्यावर जबरदस्ती करण्यात आली. या सर्व प्रकाराने कंपनीच्या उत्पादनात खंड पडू लागला. ही सर्व कृत्ये कपनीच्या शिस्तीत बसणारी नसल्याने व्यवस्थापकांनी कपनीला कुलुप लावण्याचा निर्णय घेतला आणि त्यानुसार ५ नोव्हेंबर १९८१ पासून अमर डाय केममध्ये टाळेबंदी जारी झाली.

टाळेबदी पुकारल्यापासून जवळजवळ सहा महिने कामगार परिस्थितीचे अवलोकन करत होते. या कंपनीचा पगार १० तारखेला होत असल्याने कामगारांना ऑक्टोबरचा पगार मिळालेला नव्हता. कारण कंपनी ५ नोव्हेंबरला बंद झाली होती. ऑक्टोबरचा पगार मिळवून देण्याविषयी सामंतानी काही तरी करावे अशी कामगारांची अपेक्षा होती; पण डॉ. सामंत तो पगार मिळवून देऊ शकले नाहीत. कंपनी चालू होण्याबाबत डॉ. सामंतांकडून ठाम अशी पावले टाकली जात नाहीत आणि टाकली तरी त्याला यश येत नाही हे कामगारांना सहा महिन्यांनंतर उमगल्याने त्यांनी पुन्हा नेतृत्वात बदल करण्याचे ठरवले.

पण नवीन नेतृत्व असे हवे होते की, जे डॉक्टर सामतांशी मुकाबला करू शकेल आणि व्यवस्थापकांनाही व टाघाटीसाठी बोलणी करण्यास भाग पाडेल ! कामगारांना असं नेतृत्व आणि अशी युनियन हवी होती. त्यानुसार त्याना भारतीय मजदूर संघ ही कामगारसघटना योग्य वाटली कारण आतापर्यंत साडू, कॅमलिन आदि कंपन्यात डॉ. सामंतांना शह देण्यास हीच कामगारसंघटना यशस्वी झाली होती. ते ओळखून कामगारांनी भारतीय मजदूर संघाशी संपर्क साधला.

मे ८२ मध्ये हे कामगार भा. म संघाकडे आल्यानंतर संघाने त्यांना सह्या गोळा करण्यास सांगितले. जर तुम्ही निम्म्याहून अधिक कामगारांच्या सह्या गोळा केल्या, तर कामगार आयुक्तांच्यामार्फत आपण कपनीला टाळेबंदी उठवण्यास भाग पाडू असे आश्वासनही भा. म. संघाने कामगाराना दिले.

### ७०० सह्यांचे पत्र

त्यानुसार कामगारांनी सह्या गोळा करण्यास सुरुवात केली. सह्या गोळा करत असताना डॉ. सामतांच्या कार्यकर्त्यांकडून त्याना दमदाटीही देण्यात आली; पण त्याने कामगार डगमगले नाहीत. कामगाराना कोणत्याही परिस्थितीत कंपनी लवकर सुरू व्हावी असे वाटत असल्याने त्यांनी सह्या देण्यास सुरुवात केली आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे पधरा दिवसाच्या आतच सुमारे ७०० कामगारांनी भा. म. संघाला सह्यांचे पत्र सादरही केले.

कामगारांच्या सह्यांचे हे पत्र मिळाल्यानंतर भारतीय मजदूर संघाचे नेते रमणभाई शहा, डॉ. पां. रा किनरे, श्रीमती जयावन नाईक, प्रभाकर ओक या नेत्यांनी अप्पर कामगार आयुक्त श्री पी. जी. ओवीद याची भेट ठरवली. त्यानुसार ३ जून ८२ रोजी ५८ कामगारांच्या समवेत हे नेते ओवीदाना भेटले आणि सह्याचे पत्र त्यानी त्यांना सादर केले. ओवीदांनी सर्व सह्या पाहिल्यानंतर व्यवस्थापकांना आपण बोलावून घेतो असे आश्वासन या मंडळीना दिले.

पण याचा सुगावा डॉ. सामंतांना लागल्याने त्यांनी ओवीदाना पत्र लिहिले की, अमर डाय केममधील कामगार अद्यापही माझ्याकडेच असल्याने आपण त्यांच्या सह्या आपणाला सादर करीत आहोत. डॉ. सामंतांच्या पत्रानुसार ओवीदांनी त्यांना दोन दिवसांची मुदत दिली. दोन दिवसात डॉ. सामंत हे काम न करू शकल्यामुळे त्यांना त्यांच्या विनंतीवरून आणखी एक दिवस वाढवून देण्यात आला; दुर्दैवाने डॉ. सामंत सह्या देऊ शकले नाहीत!

स्वतःची ही शक्ती ओळखून डॉ. सामंतानी वास्तविक स्वस्थ बसावयास हवे होते. तसे

त्यानी आपल्या कार्यकर्त्यास सांगावयास हवे होते; पण प्रत्यक्षात तसे घडले नाही. डॉ. सामंताचे हे कामगार संतापले. अमर डाय कंपनी चालू करण्याबावत भारतीय जनता पार्टीचे या भागातील नवनिर्वाचित खासदार जगन्नाथ पाटील हे प्रयत्न करीत असल्याचे डॉ. सामंतांच्या पाठिराख्याना पसंत पडले नाही. खा. जगन्नाथ पाटलाच्या या कृती-विरुद्ध डॉ सामंतांच्या पाठिराख्यांनी भाजपच्या ठाणे येथील कार्यालयावर एक निषेध-मोर्चा काढण्याचे ठरवले त्यानुसार त्यांचे प्रयत्न सुरू झाले; पण पुरेसे कामगारच न जमल्याने त्यांचा हा निषेध--मोर्चा अखेरीस वारगळला; पण या सर्व प्रकरणात डॉ. सामंताच्या नावाला नाही म्हटले तरी कमी-पणा हा आलाच !

झालेल्या या प्रकरणावरून तरी डॉ. सामंतांच्या पाठिराख्यांनी काही तरी बोध घ्यावयास हवा होता; पण तसे घडले नाही. यातील काही कामगार शिवसेनाप्रणीत श्रमिकसेनेला मिळाले. श्रमिकसेनेचे नेते श्री. शाबीर शेख यानी मग अप्पर कामगार आयुक्त श्री. ओपीदांना कळविले की, अमर डाय केममधील बहुसंख्य कामगार माझ्या युनियनचे सभासद असल्याने आपण व्यवस्थापकांना आमच्याशी बोलणी करण्यास सागावे भा. म. सघ आणि डॉ. सामंत याच्यामध्ये अचानक आलेल्या या नव्या श्रमिकसेनेमुळे ओवीदांच्यापुढे नवीनच पेचप्रसंग उभा राहिला. यातून मार्ग काढण्यासाठी त्यानी शाबीर शेखना कामगाराच्या सह्या देण्यास सांगितले. त्यानुसार शाबीर शेखनी ज्या सह्या दिल्या त्याने त्याचे खूपच हसे झाले.

श्रमिक सेनेच्या शाबीर शेखनी ज्या ४९९ कामगाराच्या सह्यांचे निवेदन ओवीदाना सादर केले त्यात काही मृत कामगारांची नावे होती, काही कामगार भारताबाहेर म्हणजे दुबईला गेलेले होते. सह्यांतील काही कामगार हे भारतीय मजदूर संघाच्या कमिटीमध्ये होते आणि याहून अधिक महत्त्वाचे म्हणजे एका कामगाराच्या सहीखाली २१।९। १९८१ ही तारीख होती.

या सर्व गोष्टीवरून शाबीर शेखनी सादर केलेल्या सह्या या जुन्या म्हणजे कपनी बंद होण्यापूर्वीच्या होत्या हे सिद्ध झाले. मग ह्या सह्या शेखना कोणी दिल्या हा प्रश्न उभा राहतोच कारण कामगारानी डॉ. सामंतानाच अशा प्रकारच्या सह्या पूर्वी दिल्या होत्या, पण खोटी माहिती अप्पर कामगार आयुक्तांना देण्याचा प्रयत्न केल्याने श्रमिकसेनेची नाचक्की झाली.

चर्चेतून डॉ. सामंत आणि शिवसेनेचे शेख बाद झाल्यानंतर भारतीय मजदूर सघाला चर्चेसाठी मार्ग मोकळा झाला. ओवीदांनी व्यवस्थापकांना बोलवून वाटाघाटी करण्यास भाग पाडले. त्यानुसार मराठा मंदिर येथील ॲड. बाबासाहेब गावडे याच्या ऑफिसमध्ये बोलणी सुरू झाली. दि. २० जुलै १९८२ पासून ते ३० जुलै १९८२ पर्यंत सतत १० दिवस दुपारी २ पासून रात्री ७ पर्यंत ही बोलणी चालली होती. या बोलण्यात भा. म. संघाचे नेते, अमर डायमधील कामगार-प्रतिनिधी आणि व्यवस्थापक सहभागी होते. सतत १० दिवस चाललेल्या चर्चेअंती व्यवस्थापक आणि युनियन याच्यामध्ये तीन वर्षांचा जो करार घडून आला त्याच्यावर ३० जुलै ८२ ला सर्वांच्या सह्या झाल्या. त्यानुसार व्यवस्थापकांनी ६ ऑगस्ट १९८२ पासून टाळेबदी उठवण्याचे जाहीर केले.

भा. म. संघाने ६ ऑगस्ट रोजी कल्याण-पासून शहाडपर्यंत एक मिरवणूक आयोजित केली होती. मिरवणुकीचे नेतृत्व भाजपाचे खा. जगन्नाथ पाटील यानी केले कल्याण हा श्रमिकसेनेचा म्हणजे शिवसेनेचा बालेकिल्ला समजला जातो ! येथून मिरवणुकीने जाणे तशी साधी गोष्ट नव्हती; पण भा म. संघाने अत्यंत शांततेने ही मिरवणूक काढली. कल्याण ते शहाड हे अंतर ४ किलोमीटरचे ! तरीही सर्व कामगारानी हे अंतर चालून मिरवणुकीने कारखान्यात प्रवेश केल्यानंतर तेथे झालेल्या एका छोटया समारंभात भाजपचे खा. जगन्नाथ पाटील, डॉ. पा. रा. किनरे जयाबेन नायक आदीची भाषणे झाली.

भारतीय मजदूर संघाने उमर डाय केममध्ये हा जो तीन वर्षांचा करार केला त्यानुसार कामगाराच्या मासिक वेतनात सरासरी १५० रुपयापासून १६५ रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. करारानुसार प्रत्येक कामगाराला 'स्पेशल पे' म्हणून ४० रुपये तर ज्याची नोकरी १५ वर्षांपेक्षा जास्त झाली त्याना ५० रुपये मिळणार आहेत. पूर्वी येथील कामगाराना ३०० रुपये वार्षिक प्रवासभत्ता मिळत असे. नवीन करारानुसार आता तो ५५० रुपये मिळणार आहे. याच्यापूर्वी कामगाराना घरभाडेभत्ता मिळत नव्हता; पण आता तो मासिक ५० रुपये मिळणार आहे. शिवाय कारखान्यात रोज जाण्यायेण्यासाठी कामगाराना महिन्याला ३९ रुपये प्रवासभत्ता मिळणार आहे.

१८ मार्च १९८१ रोजी इंटकच्य सलामतरायनी ज्या मागण्या केल्या होत्या त्याच्या आधारावरच ही बोलणी होऊन नवीन करार अस्तित्वात आला. या नवीन करारानुसार कामगाराना ७५० रुपये सानुग्रह अनुदान मिळाले १ जाने. ८१ ते ५ नोव्हेंबर ८१ पर्यंत हे ७५० रुपये सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे याशिवाय ऑक्टोबर ८१ चा पूर्ण महिन्याचा पगार, नोव्हें. ५ पर्यंतचा म्हणजे टाळेबंदी होण्यापर्यन्तचा आणि १४ दिवसाच्या नोटिशीचा असा एकूण ५० दिवसाचा पगार कामगाराना देण्याचे करारानुसार निश्चित झाले.

आणखी एक महत्त्वाचा प्रश्न नवीन करारामुळे तूर्तास सुटला आहे. या कारखान्यातील ४४३ कामगारांना कामावरून कमी करण्याची परवानगी देण्यात यावी अशा प्रकारचा विनंतीअर्ज येथील व्यवस्थापकानी सेशन कोर्टात केला होता; पण या कोर्टात व्यवस्थापक हरल्याने त्यानी या कामगाराना कमी करण्याविषयी आता हायकोर्टात धाव घेतली आहे. नवीन करारानुसार युनियनला विश्वासात घेतल्याखेरीज कोणत्याही कामगाराला कामावरून कमी केले जाणार नाही हे निश्चित झाले आहे. हायकोर्टाचा निकाल काहीही लागला तरी व्यवस्थापकावर करारानुसार आता बंधन आले आहे. त्यामुळे या ४४३ कामगारावरती लटकत असलेली टागती तलवार दूर करण्यात भा. म. संघाला यश आले आहे.

डॉ. दत्ता सामंताशी आणि शिवसेनेशी मुकाबला करून अमर डाय केम सुरू कर-करण्यात भारतीय मजदूर संघाने जे यश मिळविले आहे त्याने इतर बद कपन्यातील कामगारांच्या आशा उचावल्या आहेत. येथील कल्याण--अंबरनाथ परिसरात सुमारे ३० हजार कामगार संप-टाळेबदीमुळे आज बेकार आहेत. सेंच्युरी रेयॉन, ऑलब्राइट मोरारजी, स्वस्तिक केमिकल, मफतलाल इंजिनिअरिंग, मर्फी इंडिया, डकन आदि कंपन्यातील कामगार घरी बसून कंटाळले आहेत. कोणी तरी पुढे यावे आणि आपले नेतृत्व स्वीकारून आपली कंपनी चालू करावी ही कामगाराची आंतरिक भावना आहे. भारतीय मजदूर संघाला हे काम पेलेल काय ? कामगाराच्या आशा भारतीय मजदूर संघ पूर्ण करू शकेल काय ? का केवळ साडू, कॅमलिन आणि अमर डाय केम याच्या विजयातच समाधान मानून भारतीय मजदूर सघ गप्प बसणार ? हे आणि असले अनेक प्रश्न कामगारात आज चर्चिले जात आहेत. भारतीय मजदूर सघ या कसोटीस कितपत उतरतो हीच त्याची आता परीक्षा आहे

— मोहन शकर कुलकर्णी

# वसुराजेंच्या घरी मनेका आणि डॉ. जैन ' सूर्य-विक्री ' कथा

## भाग तिसरा

लेखक : डॉ. जे. के. जैन

भाषांतर : विनया खडपेकर

पंतप्रधानाच्या निवासस्थानातील सवाद तुम्ही वाचलात. 'माणूस' दि ३१ जुलै व ७ ऑगस्ट अंक.) तो म्हणजे 'सूर्य' आमज्याकडून परत घेण्याच्या प्रयत्नाची केवळ सुरुवात होती. नंतरच्या घटना केवळ कारस्थानीपणाच्या नव्हत्या, तर त्या काही प्रमाणात धक्कादायकही होत्या.

दुसऱ्याच दिवशी म्हणजे १७ फेब्रुवारीला मला वसुराजेचा ( वसुंधरा राजे सिंग ) फोन आला की, तिला असे कळले आहे की, कोणी तरी माझ्याशी संपर्क साधेल आणि मला रु. २५ लाख देईल "तो पूर्वीचा जनसंघी" तिने अधिक माहिती सांगितली.

ती सकाळ कामांनी अगदी व्यापली होती. जैन मेडिकल सेंटरमधील दैनंदिन कामे तर होतीच. शिवाय 'सूर्य-विक्री'च्या संबंधात Onlooker, Sunday, India Today या वार्ता-नियतकालिकाचे पत्रकार माझी मुलाखत घेण्यासाठी आले होते; त्यांच्याशी मी बोललो. दुपारी साधारण अडीच वाजता मी जेवणासाठी निघालो तर माझी स्वागतिका पूर्णिमा घोष हिने मला सांगितले कोणा श्री. मदन यांचा फोन आहे. ते म्हणतात, " ते कोणत्या तरी नियतकालिकाचे संपादक आहेत. "

'त्यांना जरा सांग, उद्या फोन करा. मी थकलो आहे.' मी कुमारी घोषला सांगितले.

'ते, अगदी थोडंच बोलायचं आहे म्हणून खनपटीस बसले आहेत. हे बोलणं अगदी तातडीचं आणि तितकचं महत्त्वाचंही आहे म्हणून सांगत आहेत. कृपया फोन घ्या !' माझी स्वागतिका म्हणाली.

तिचा अगदी पिच्छा पुरवला गेलेला दिसत होता. मी फोन घेतला. 'नमस्ते. मी आपल्यासाठी काय करू शकतो ? '

'मी मदन. मी 'बाबा जी' ( Bala-ji ) या नियतकालिकाचा मालक आणि संपादक आहे. मला आपल्याला आज भेटायचच आहे!' आवाज तातडीचा आणि पाठपुरावा करणारा वाटला.

'श्री. मदन, आज नको.' मी आधीच तीन नियतकालिकांशी बोललो आहे. मला इतर बऱ्याच गोष्टीही करायच्या आहेत. मला पुढच्या आठवड्यात फोन करा!' मी त्रासून पण नम्रतेने म्हटले.

'डॉक्टरसाहेब, आपल्या मुलाखतीसाठी हे बोलणे नाही, तर दुसऱ्या काही गोष्टीसाठी आहे. ते महत्त्वाच आहे. आज मला तुम्हाला भेटायलाच पाहिजे !'

'ठीक आहे. मी 'सूर्य-कचेरीत जातो आहे. तेथे येऊन चार वाजता मला भेटा.' मी त्या गृहस्थाना सांगितलं.

मी 'सूर्य-कचेरी' 'काचनगंगा' येथे जरी चार वाजता पोहोचलो तरी तावडतोब श्री. मदन यांच्याशी बोलू शकलो नाही. किती तरी गोष्टी पहायच्या होत्या. मला पर्यायी व्यवस्थापनाची व्यवस्था पहाण्यास अवसर मिळावा म्हणून श्रीमती आमटेश्वर आनंद या महिनाअखेरपर्यंत काम पहातील, असे आमच्यात संमत झाले होते आणि ठरविले होते; परंतु 'सूर्य-विक्री'ची बातमी प्रकाशित झाल्यावर त्यांनी कचेरीत येणे सोडले. कर्मचाऱ्याना कामासंबंधी कोणती तरी सूचना द्यायला हव्या होत्या आणि मी त्यात गुतलो होतो.

मी सूर्यकचेरीतून निघालो तोपर्यंत श्री. मदन आपले बसून राहिले होते. मी त्याची क्षमा मागितली आणि म्हटले की, मला काही महत्त्वाची कागदपत्रे पहाण्यासाठी 'दीनदयाळ रिसर्च इन्स्टिटयूटला' जायचे आहे. तर आपण एक दिवस बोलणी पुढे का ढकलू नये ?' आधीच उशीर झाला आहे. आणि संस्थेचे जनरल मॅनेजर वाट पहात असतील.

मला भरपूर वेळ आहे आणि वाट पहाण्यात मला काही वाटणार नाही असे श्री. मदन यांनी खात्रीपूर्वक सांगितले. ते त्यांच्या कारमधून माझ्यापाठोपाठ आले. मी माझ्या चेंबरमध्ये त्यांना बोलवेपर्यंत सहनशीलपणे बसून राहिले.

'हं ! मी आपल्यासाठी काय करू शकतो ? ' मी त्यांना विचारले.

'माझे नांव मदन. मी नेहमीचा कायम जनसंघाचा सभासद आहे. श्री. विजयकुमार मलहोत्रा यांना मी चांगले ओळखतो.' त्यांनी सुरुवात केली. मला त्या वेळी वसुच्या सकाळच्या फोनची आठवण झाली.

त्यांनी बोलणे पुढे सुरू केले, 'मी 'बाबा-जी' हे नियतकालिक काढतो. ते फलज्योतिषावरचे उत्तम नियतकालिक आहे. तुम्ही माझ्याबद्दल आणि माझ्या नियतकालिकाबद्दल ऐकले आहे का ? "

मी ऐकलेले नव्हते. त्याना तसे सांगितले.

माझ्या टेबलावर 'बाबाजी'च्या काही प्रति ठेवीत त्यांनी बोलणे पुढे सुरू केले. 'हे जरी अगदी उत्तम नियतकालिक असले, तरी काय असेल ते असो मी ते लोकप्रिय करू शकलो नाही. कोणते तरी व्यवस्थित चालू असलेले प्रकाशन घेण्याचा मी विचार करतो आहे '

'मी तुमच्यासाठी काय करू शकतो ? ' मी विचारले.

'मी येथे 'सूर्य' खरेदी करण्यासाठी आलो आहे.' ते म्हणाले.

'सूर्य' विक्रीसाठी काढले आहे असे तुम्हाला कोणी सांगितले ?' मी विचारले.

'मला अगदी विश्वसनीय ठिकाणाहून ते कळले आहे.' त्यानी उत्तर दिले.

'नाही ! तुमचे ठिकाण आणि माहिती विश्वसनीय नाही. मी ते कोणालाही विकत नाही आहे.' आणि मी उठलो.

'डॉक्टर, मी तुम्हाला २५ लाख देऊ शकतो.' त्यांनी लगेच म्हटले.

'श्री. मदन, तुम्ही या नियतकालिकासाठी एवढी रक्कम कां देता? ते एवढ्या किंमतीला योग्य नाही.' मी त्यांना सांगितले.

ते ऐकून श्री. मदन यांना आनंद झालेला दिसला. ते म्हणाले, 'माझे मुलगे स्टेट्समध्ये आहेत. ते चिकार पैसा मिळवितात. माझ्याजवळही खूप पैसा आहे. मला दुसरा छंद नाही. ही एवढी रक्कम म्हणजे माझ्यासाठी काही प्रश्न नाही. तुम्ही रु. २५ लाख घेऊन कागदांवर स्वाक्षरी केलीत तर मी कृतज्ञ आहे. मी अगदी थोडयाशा अवधीच्या सूचनेने रक्कम देण्याची व्यवस्था करू शकतो."

मी त्यांना म्हटले की, त्यानी देऊ केलेले, (offer) काही पुरेसे आकर्षक नाही आणि मला त्यात रस नाही.

'तुम्ही ते मोकळेपणाने सागा.' त्यांनी कळकळीची विनंती केली आणि मला आपले ( Visiting Card ) दिले.

दुसरा दिवस–१८ फेब्रुवारी हा माझा वाढदिवस होता. मी माझ्या पत्नीला–रागिणीला–कबूल केले होते की, मुलाना घेऊन आपण बाहेर भोजनास जाऊ. मी दुपारी तिच्याबरोबर भोजनास यावे हे सागण्यासाठी वसुराजेने मला दवाखान्यात फोन केला. "तुम्ही माझ्या घरी एक वाजता आलंच पाहिजे. माझ्याकडे आणखी एक महत्त्वाची पाहुणी व्यक्ती आहे !'

## डॉक्टर, तुम्ही आलंच पाहिजे

मी तिला म्हटले की, भोजन शक्यच नाही. तेव्हा तिने मला सांगितले, 'मनेकाला तुम्हाला भेटायचे आहे. तुम्ही काही जेवलंच पाहिजे असं नाही; पण आलंच पाहिजे ! ती केवळ तुम्हाला भेटण्यासाठी येते आहे.'

'तेथे आणखी कोण असेल ?' मी चौकशी केली.

'कोणीही नाही. तिला कोणाच्याही अडथळयाशिवाय बैठक हवी आहे.'

'ठीक आहे. मी तेथे अडीच वाजता येतो.' मी वसुराजेला सांगितले.

मनेकावर 'सावध नजर' असणार आणि Intelligence Bureau चे अधिकारी तिच्या पाठोपाठ असणार हे मी गृहित धरले होते. अधिकाऱ्यांची माझ्याही हालचालीवर नजर होती किंवा नाही याबद्दल मला खात्री नव्हती. माझ्याजवळ जरी काही मोलाचे नव्हते तरी पंतप्रधानांची विधवा सून मला भेटू इच्छित होती याची मला चागलीच जाणीव होती. तिला काय पाहिजे असेल ? ती मला काय सांगणार असेल ?

एकंदर कार्यप्रक्रियेत तिचे नुकसान झाले नाही याबद्दल विशेष करून खात्री मला द्यावयाची होती. मी सुरक्षित मार्गाने जाण्याचे ठरविले आणि पाठलाग होण्याची शक्यता टाळून वसुराजेच्या घरी पोहोचलो. मनेका आणि वसु जेवण आटोपून माझीच वाट पहात बसल्या होत्या. वातावरण घरगुती, मैत्रीचे आणि मोकळे होते. त्यात कोणताच ताण किंवा उपचार नव्हता. तेथे आम्ही तिघेच होतो.

'तुम्ही अगदी शूर माणूस आहात. तुम्ही स्वामी धीरेंद्र ब्रह्मचारीशी जसे बोललात तसे दुसरे कोणी बोललेले मी पाहिले नाही.' मनेका आरंभीच म्हणाली.

'नाही. माझ्या बाजूने ते अज्ञान होतं. शौर्य नव्हतं. 'अज्ञान हे मोठं सुख' असं जे म्हणतात ते माझ्या बाबतीत बरोबर लागू पडतं, मी म्हणालो, 'उलट मला वाटतं तुम्हीच शूर आहात.'

'तुम्ही असं का म्हणता ?' तिने प्रतिप्रश्न केला.

'वसुच्या घरी अशा तऱ्हेने मला भेटण्याचा निर्णय घेतलात ! तुमच्या या धाडसाचं मला कौतुक वाटतंय. तुम्ही कोणता धोका पत्करला आहे याची मला वाटतं तुम्हाला कल्पना आहे.'

'नाही. मी काही स्वतःहून तुम्हाला भेटायला आले नाही. तुम्हाला भेटण्यासाठी माझा पाठपुरावा केला गेला.' मनेका म्हणाली.

'म्हणजे ? येथे, या वेळी तुम्ही मला भेटणार आहात हे तुमच्या सासूबाईंना माहिती आहे असं तुम्हाला म्हणायचं आहे का ?' मी माझं आश्चर्य लपविण्याचा जरासुद्धा प्रयत्न न करता विचारले.

'हो–अर्थातच !'

'मला येऊन भेटायचं आणि काय बोलायचं ते त्यांनी स्वतः तुम्हाला सांगितलं का ?' अजूनही गोंधळलेल्या आवाजातच मी चौकशी केली.

'त्यानी स्वतः मला सागितलं नाही. पण स्वामीजीनी (ब्रह्मचारी) मला सागितलं. घरगुती बाबतीत पंतप्रधान स्वतः माझ्याशी किंवा राजीवशी क्वचितच बोलतात. त्याच्या कुटुंबातील माणसाशी बोलायला त्या नेहमी स्वामीजीचा उपयोग करतात. पंतप्रधानांनी त्यांना सांगितलं असल्याशिवाय स्वामीजीनी मला तुम्हाला भेटण्यास सागितलं नसतं.' मनेका म्हणाली.

'त्यांना काय पाहिजे आहे ?' मी चौकशी केली.

'त्यांना 'सूर्य' परत हवे आहे.' मनेकाने उत्तर दिले.

'वास्तविक पहाता त्याना त्याचं एवढं काय येऊन पडलं आहे ?' मी विचारलं.

माझ्या प्रश्नाला उत्तर न देता तिने तिचेच बोलणे पुढे सुरू केले, 'मला सागितलं गेलं आहे, तुमच्या पुढं हात जोडायचे, रडायचं. ओरडायचं किंवा भीक मागायची; पण 'सूर्य' परत मिळवायचं !'

'काही कारण नसताना तुम्ही स्वतःची अशी मानखंडना का करून घेता ?' मी विचारले.

## मला सुखाने जगू द्याल का ?

'नाही, मला माझी मानखंडना करून घ्यायची नाही.' ती अतिशय आत्मविश्वासाने बोलली; पण मला तुम्हाला असं विचारायचं आहे, तुम्ही 'सूर्य' परत करून मला सुखानं का जगू देत नाही ? २५ लाख रुपये तुम्हाला पुरेसे वाटत नाहीत का ? आणखी किती पाहिजे आहेत ? तुम्ही ६० लाख रुपयांत व्यवहार मिटवाल का ?'

'नाही. हा पैशाचा सवाल नाही. अगदी सुरुवातीलाच मी हे पूर्ण स्पष्ट करतो की, मी पैशाच्या मागे नाही. मला तुमच्या स्थितीचा किंवा पंतप्रधानांच्या अडचणींचा कोणताही फायदा उठवायचा नाही. त्यामुळं मी अशी ऑफर केली होती की, पंतप्रधानाची इच्छा असेल तर 'सूर्य' परत केलं जाईल; पण कोणीही तसं बोलून दाखवीत नाही.'

'नाही. पंतप्रधान हे कधीच स्वीकारणार नाहीत. त्यांचा यात काही संबंध होता किंवा त्याच्यावर याचा काही परिणाम झाला होता हे त्या कोणत्याही प्रकारे कधीही कबूल करणार नाहीत

मी तिला सांगितलं, 'हा काही पंतप्रधानांना उपकृत करण्याचा प्रश्न नाही. हा निराळ्या जीवनमूल्यांचा प्रश्न आहे. प्रथम मला हे स्पष्ट करायचं आहे की, सरदार आंग्रे किंवा मी आमच्यापैकी कुणासही विकत घेता येणार नाही किंवा आमच्यावर दबाव आणून आमच्याकडून काही करवून घेता येणार नाही. दुसरं म्हणजे शांतपणे याबद्दल वाटाघाटी करायला आम्ही अगदी नम्रतेनं तयार आहोत. जर पंतप्रधानांना ताप होत असेल तर आम्ही ते परत करू. नाही तर शांतपणे आम्हाला नियतकालिक चालवू द्या.'

'तुम्ही पैसे घ्या आणि त्याबद्दल सगळं विसरून जा—आणि तुम्हाला चिक्कार मिळतो आहे.' हातांनी हावभाव करीत मनेका बोलली.

'तुम्हाला एवढा पैसा कुठून मिळाला आहे?' मी सहजपणे मनेकाला विचारले, 'तुम्ही तुमच्या आईलाच हा पैसा का दिला नाही? म्हणजे त्यांना हे नियतकालिक विकावं लागलं नसतं!'

मनेकानं खालच्या आवाजात उत्तर दिलं, 'माझ्याजवळ पैसा नाही. माझं स्वतःचं उत्पन्न म्हणाल तर संजयनी मागं ठेवलेली एक ट्रक-कंपनी काय ती आहे आणि त्या उत्पन्नातून मला बँकेचं कर्ज फेडावं लागतं. श्री. चरणजितसिंग दिवसेंदिवस मला सगळं कठीण करीत आहेत. माझे सगळे ट्रक त्यांच्याकडेच आहेत. हे ट्रक Soft drinks च्या बाटल्या वाहून नेण्यासाठी मुद्दाम बनवले होते. बाजारभावापेक्षा ते मला फारच कमी रक्कम देतात.'

'तुम्ही मग तुमचे ट्रक दुसऱ्या कोणाकडे भाड्यानं का देत नाही?' मी विचारले.

'ते इतकं सोपं नाही. सरकार माझ्या ट्रक्सना दिल्लीबाहेर जाण्याची परवानगी देत नाही.'

'जरा थांबा हं!' मी मध्येच अडवून म्हटले, 'तुम्ही संजयच्या पत्नी! पंतप्रधानांच्या सूनबाई! स्थानिक काँग्रेस (I) चे खासदार आणि स्थानिक सरकारी अधिकारी तुमच्यापुढं समस्या निर्माण करतात, तुमच्या ट्रकची कामे सुरळीतपणे व्हावीत एवढी लहानशी मेहेरबानीही तुमच्यावर होत नाही—या गोष्टीवर मी विश्वास ठेवावा, असं तुम्हाला म्हणायचं आहे का?'

'मी असं म्हणते हाच तुमचा प्रश्न आहे, डॉक्टर जैन!' मनेका अगदी त्रासून म्हणाली, 'संजय गांधीची पत्नी म्हणजे कोणी विशेष आहे असं मानू नका. मला याबद्दल अधिक बोलायचं नाही. मला एवढंच सांगायचं आहे की, तुम्ही 'सूर्य' परत केलंत तर माझ्यावर मोठी मेहेरबानी होईल. मी काही तुम्हाला ते दान म्हणून द्यायला सांगत नाही. ते तुम्हाला किती तरी फायदे देऊ करीत आहे.'

## तुम्हाला ते समजणार नाही डॉक्टर!

मी तिच्यात आणखी बारकाईने लक्ष घालायचे ठरवले. 'तुमच्यावर 'सूर्य-विक्री' चा परिणाम कसा काय होऊ शकतो?'

मनेका माझ्यावर जवळजवळ ओरडलीच: 'परवा स्वामीजींनी तुम्हाला सांगितलं नाही का की, परिणाम मला भोगायला लागणार आहे, बाकी कोणाला नाही!'

आता तिला अगदी तिटकारा आला आहे असं वाटलं.

वसु मध्येच बोलली, 'डॉक्टर, आधीच तिला घरातून वाईट वागणूक मिळते. सूर्य-विक्रीनंतर तर परिस्थिती अगदीच बिघडली आहे. एवढंच काय घरात कोणी तिच्याशी बोलतसुद्धा नाही.'

मनेका मध्येच तिला थांबवून म्हणाली, 'पंतप्रधान मला म्हणाल्या, पुढच्या वेळी लंडनला जाताना त्या मला बरोबर नेणार नाहीत. कारण त्यांना मला शिक्षा करावयाची आहे.'

मी तिला थंडपणे म्हटले: तुम्ही लंडनला जाऊ शकत नाही ही काही शिक्षा नाही.'

'तुम्ही समजू शकत नाही, डॉक्टर! कुटुंबातल कोणी माणूस तुमच्याशी साधं बोलतसुद्धा नाही अशा घरात रहाणं म्हणजे काय आहे ते तुम्हाला कधीच कळणार नाही, डॉक्टर. माझे पती आता कोणीच नाहीत. माझा मुलगा अजून खूप लहान आहे. मी त्या घरातील व्यक्ती असण्यास लायक नाही असं मला पुन:पुन्हा सांगितलं जात आहे. प्रत्येक लहानसहान गोष्टीत क्षुद्र वाटावं असं मला वागवलं जातं. असा छळ आणि मानखंडना सतत चालू आहे माझ्या सासूबाई!—केवळ राजीव आणि त्याची पत्नी यांना खूष करण्याच्या प्रयत्नात! सासूबाईंच्या मनात माझ्याविषयी तीव्र नावड उत्पन्न झाली आहे, अगदी प्रत्येक बाबतीत माझे बोलणे, माझे कपडे, माझे खाणे आणि माझे रहाणे; प्रत्येक बाबतीत नावड. जेव्हा जेव्हा मी पंतप्रधानांसमोर येते, तेव्हा तेव्हा उपहास, मानखंडना, अपमान यानाच तोंड द्यावे लागते.'

ती थोडी थांबली. मी तिच्या चेहऱ्याचे निरीक्षण करीत होतो. त्यावर वेदना दिसत होत्या. 'दैवाने माझ्यावर आधीच किती तरी आघात केले आहेत. तुम्ही त्या जखमांना आणखी वेदना देऊ नका.'

मी विचार केला. माझा दृष्टिकोन तिला सांगण्याची हीच वेळ आहे. 'तुमच्या समस्यांचा दुरुपयोग मला मुळीच करायचा नाही. परंतु सूर्य-विक्रीच्या आधीही तुमचे प्रश्न होतेच. तुम्हाला हे पटते की नाही?'

'हो. पण सूर्य-विक्रीने ते अनेक पटींनी वाढले आहेत.' तिने उत्तर दिले.

'नाही. मी याच्याशी संमत नाही.' मी जोर देऊन म्हटले.

'सूर्य-विक्रीमुळे या गोष्टी लोकांसमोर उघड झाल्या इतकंच.'

मी तिची प्रतिक्रिया पहात होतो. ती गप्प राहिली.

## ती तर धूर्त खेळी होती!

मी बोलणे पुढे सुरू केले. 'मी या सबंध घटनेकडे दुसऱ्या एका दृष्टिकोनातून पहातो. तुम्ही समर्थ आणि हुषार आहात. तुम्ही पंजाबी कुटुंबात जन्मलात. तुमचं कूळच तुमचं शौर्य सांगतं. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे पंतप्रधान रात्रंदिवस तुमची मानखंडना, अपमान करीत असतात. कारणं मला माहिती नाहीत, पण तुम्ही त्यापुढं नमावं अशी अपेक्षा नाही. मला जे काही माहिती आहे त्याप्रमाणे सूर्य-विक्री ही तुम्ही हिशोब ठरवून केलेली खेळी होती. मला वाटते, मुख्यत: तिचा अर्थ तुमचा निषेध प्रदर्शित करणे हा होता. आता मात्र परिस्थिती बदलली आहे; या खेळीनं भरलेला बंदुकीचा बार उडलाच नाही किंवा तुमचे पाय गार पडू लागले आहेत!'

मनेकाने उत्तर दिले नाही. फक्त माझ्या चेहऱ्याकडे टक लावून पहात राहिली.

मी तेवढ्यावरच थांबलो नाही. 'आमच्या बाजूनं म्हणाल, तर आम्हाला काही भलंमोठं प्रश्नचिन्ह मानू नका. तुम्हाला मदत करायला मी तर तयार आहे. 'सूर्य' परत करण्याने तुमचा प्रश्न सुटत असेल तर ते परत करण्याची माझी इच्छा आहे.'

मनेकाने हे काहीसे थंडपणेच घेतले. तिने थोडा वेळ विचार केला आणि नंतर विचारले, 'तुम्ही हे खरोखर गंभीरपणे म्हणता आहात डॉक्टर?'

'हो. अर्थातच !' मी तिला म्हटले, 'पण मला नाही असं वाटत की, माझ्या 'सूर्य' परत करण्यानं तुम्हाला तुमची पूर्वीची शांतता परत मिळेल. फार तर सूर्य-विक्रीच्या आधीच्या दिवसातल्या परिस्थितीत तुम्ही जाऊन पडाल. कदाचित तेवढंही होणार नाही. पंतप्रधान आता कधी तुमच्यावर विश्वास ठेवणार नाहीत. त्या आता सूडबुद्धीनं वागतील !'

'डॉक्टर, ती काळजी तुम्ही करू नका.' मनेका आत्मविश्वासाने म्हणाली.

'तर तुम्ही 'सूर्य' परत देणार, जर माझं त्यात भलं आहे हे तुम्हाला पटलं तर?' मनेकाने मला पुन्हा विचारले.

'हो. मी तसा शब्द देतो; पण एका अटीवर !'

'कोणती अट?'

'सूर्य' ज्याला विकायचे तो माणूस मी काळजीपूर्वक तपासून घेईन. सरदार आंग्रे यांची आणि माझी प्रतिष्ठा मी धोक्यात येऊ देणार नाही. कोणी असे म्हणता कामा नये, 'हे तर विकले गेले, हे तर डरले, घाबरले म्हणून.'

'ते योग्यच आहे; पण तुम्ही ते कोणाला विकू शकता?' मनेकाने चौकशी केली.

'पंतप्रधानांच्या कुटुंबातील कोणाही व्यक्तीला !' मी उत्तर दिले.

'पंतप्रधान याला कबूल होणार नाहीत !' ती म्हणाली.

'तुम्ही ते घ्या.' मी सुचविले.

'नाही. माझ्या नावे खरेदी करण्यासाठी ते पैसे देणार नाहीत.'

'मी एक सागून टाकतो. मी गरजेचा विचार करीन' मी म्हणालो. वसु आणि मनेका दोघींनाही सुटल्यासारखे वाटलेले दिसले.

### तिला तिचा 'करीश्मा' आहे !

आम्ही पुन्हा कॉफी मागविली आणि आणखी दोन तास बोलत बसलो. मनेकाचा माझ्याकडे पहाण्याचा प्रथम जो दृष्टिकोन होता तसाच तो नंतर राहिला नाही. ती आता शत्रूशी बोलत नव्हती तर अशा माणसाशी बोलत होती की, जो माणूस आधीच सगळं विसरून तिला मदत करू इच्छित होता. त्यासाठी आनुषंगिक किंवा इतर काही फायदेसुद्धा सोडून देण्याची त्याची तयारी होती.

आम्ही खूप गोष्टींबद्दल बोललो. राजकारण, व्यक्ती, कुत्रे, पुस्तकं, चित्रपट, संजय गांधीचं जीवन, त्याचं प्रचारकार्य आणि त्याचे मित्र याबद्दलही बोललो. संभाषण जसजसं वाढू लागलं आणि वसु आणि मनेका त्यांच्या खास बोलीत चित्रपट आणि कुत्रे यावर बडबडू लागल्या तेव्हा मला मी त्या ठिकाणी परका वाटलो; परंतु मधेमधे अगदी स्पष्ट खुलीखुली बोलणी झाली. इंदिरा गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचे बरोबर मूल्यमापन करण्यासाठी पुरेशी उपयुक्त माहिती त्या अधल्यामधल्या बोलण्यातून मिळाली. एखाद्या व्यक्तीची प्रतिमा पूर्णपणे उभी करण्यासाठी वेळोवेळी अनेक गोष्टी एकत्र आणाव्या लागतात. त्यांचे (इंदिरा गांधीचे) विचार आणि कृती यावर कोणाचा प्रभाव आहे, समकालीन राजकारण—त्या आखाड्यावर अंमल गाजविणाऱ्या शक्ती, प्रतिशक्ती, जोर, प्रतिजोर (pulls and counter pulls) याबद्दलची सूक्ष्म दृष्टी (insight) मला त्यांच्या भोवतालच्या व्यक्तींमध्ये (मनेकाप्रमाणे) क्वचितच आढळली.

मनेका एक अतिशय हुशार व्यक्ती आहे. तिला राजकारण चांगले कळते. तिने राजकारणाचे शिक्षण सगळ्यात उत्तम अशा केंद्रातून घेतलेले नाही का? मला तर असे दिसते तिने आपल्या सासुबाईंकडूनच पाठ घेतले आहेत. ती चांगल्यापैकी संभाषण करणारी आहे. श्रीमती इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी, चौधरी चरणसिंग आणि अशाच काही इतर पुढाऱ्यांप्रमाणे तिला स्वतःचा करिश्मा आहे. तिच्याकडे गर्दी खेचून घेण्यासाठी लागणारे गुणही आहेत

आम्ही काय काय चर्चा केली ते सगळे येथे लिहिणे शक्य होणार नाही आणि ते विषयाला धरूनही नाही. पुढे आमच्या बऱ्याच बैठका झाल्या. सगळ्याच वसुच्या घरी झाल्या नाहीत. ज्यानी त्यांच्या घरी आमच्या बैठका होऊ देण्याचा चांगुलपणा दाखवून धोका पत्करला, त्यांची नावे मी मुद्दामच येथे सांगत नाही. हेतु हा की, उगीच त्यांची गैरसोय नको.

परंतु मी 'सूर्य'च्या व्यवहाराबद्दल काही गोष्टी उघड करतो. नियतकालिकाची किंमत ७५ लाख रुपयांपर्यंत गेली. मात्र प्रत्यक्षात काही व्यवहार झाला असता तर तो ६० लाख रुपयांवर मिटवला गेला असता. आम्ही नफासुद्धा न घेता, पंतप्रधानांच्या कुटुंबातील व्यक्तीसच ते विकू ही माझी अट स्वीकारली गेली नाही. के. के. बिर्ला रु. ६० लाख किंवा त्याहीपेक्षा अधिक रक्कम मला देतील असे मला सांगितले गेले; परंतु ते किंवा त्यांचे कोणी प्रतिनिधी माझ्याकडे कधीच आले नाहीत. मला असे दाखविले गेले की, रामनाथ गोएंका 'सूर्य' घेतील; पण ते माझ्याकडे कधीच आले नाहीत. दोन्ही बाजूच्या एका जवळच्या मित्राने वसुराजेला सुचविले, नियतकालिक आम्ही चालविण्यापेक्षा गोएंकांना द्यावे. त्यांचा डॉक्टर असल्यामुळे मी तसा त्याच्याशी बराच जवळचा आहे. तरी Express boss नी या विषयाची चर्चा माझ्याकडे कधीच केली नाही. दिल्लीत एक सामान्य (insignificant) नियतकालिक काढणाऱ्या माणसाने डॉक्टर मित्राच्यामार्फत ६८ लाख रुपये देण्याची तयारी दाखविली. त्याचा स्वतःचा धंदा थोडयाफार हजारापेक्षा अधिक आकड्याला स्पर्श करत नव्हता; परंतु त्याने आमच्याकडून 'सूर्य' खरेदीसाठी लाखांचा आकडा सांगितला. मात्र त्याने प्रामाणिकपणे कबूल केले की, तो कोणी बड्या असामीच्या (big guy) वतीने बोलतो आहे आणि व्यवहार अगदी तडीला गेल्याशिवाय ती बडी असामी या चित्रात प्रवेश करू इच्छित नाही.

एके दिवशी उत्तरप्रदेशचे कॉंग्रेस (I)चे MLA रु. ७५ लाखांची offer करण्यासाठी मला भेटण्यास आले. त्यांनी मला सांगितले, श्री. अरीफ मोहंमद खान (Deputy Minister) of Information and Brordcasting) यांच्या खोलीवर, बऱ्याच युवक कॉंग्रेस (I) च्या खासदारांबरोबर (M. Ps.) त्यांची बैठक झाली. कोणत्याही किंमतीला 'सूर्य' परत द्यायचे असा त्या बैठकीत निर्णय झाला आणि त्याच्या (युवक कॉंग्रेस I च्या बैठकीतले खासदार) वतीने offer करण्याचे अधिकार त्यांना (V. P. MLA Congress I) देण्यात आले आहेत. (अपूर्ण)

('सूर्य इंडिया' ऑगस्ट १९८२ अंकावरून साभार)

---

## मनेकाच्या आई—श्रीमती आमटेश्वर आनंद यांनी डॉ. जैन यांना काय सांगितले? पुढील अंकी

---

अवती भवती

शरद कृष्णन

## □ तस्करसम्राट बखिया

पैशाची खैरात करून गोव्यामधील तुरुंगातून पळून गेलेला बखिया या विख्यात तस्कर एक दिवस अचानक दमण पोलिसांसमोर येऊन हजर झाला; तो कसा पळून गेला आणि त्याला कोणाकोणाचे सहाय्य झाले याच्या नाट्यपूर्ण कथा प्रसिद्ध होत असतानाच बखिया अचानक पोलिसांसमोर येऊन रुजू झाला. कायदेशीर तरतुदी पूर्ण केल्याची खातरजमा करून बखिया अवतीर्ण झाला. अर्थात त्याच्या या डावपेचांवर मात करून त्याला हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत कदाचित पुन्हा तुरुंगात डांबलण्यात आले असेल; पण समजा तो जरी आत असला तरी पैशाची साखरपेरणी करून, त्याला हव्या असलेल्या सर्व सुविधा तो उपलब्ध करून घेतो अथवा गंभीर आजाराचे सोंग घेऊन आपल्याला हॉस्पिटलमध्ये ठेवले जाईल याची दक्षता घेतो. तर असा हा सुकर बखिया आपल्याबरोबर उत्तमोत्तम वकिलांचा ताफा घेऊनच दमण जिल्हा पोलिसप्रमुखांच्या कचेरीमध्ये स्वतः होऊन दाखल झाला. गोव्यामध्ये त्याला अटक करण्यासाठी गेलेल्या कस्टमअधिकाऱ्यांच्या हाती तो लागला तर त्याला कोफासाखाली किमान वर्षभर आत टाकता आले असते आणि जामीनही चालू शकला नसता. म्हणून तुरुंगातून पळून गेल्यावर त्याने प्रथम आपली पत्नी मनेकाबेन बखिया हिच्याशी संपर्क साधून, तिला आपल्याला अटक करण्याच्या संदर्भात कोफासाखाली वॉरंट काढण्यात आले होते, त्याविरुद्ध रिट अर्ज करण्यास सांगितला. न्यायालयाने दोन अटी घातल्या. एक म्हणजे बखियाने सुनावणी पूर्ण होईपर्यंत दमण सोडून जाऊ नये व दर सोमवारी जिल्हा पोलीसप्रमुखांच्या कचेरीत हजेरी द्यावी. अशा प्रकारे प्रत्यक्ष तुरुंगवास टळतो आहे याची खात्री झाल्यावरच बखियाची स्वारी न्यायालयात हजर झाली.

आपल्या नारळीच्या बागा असून त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर आपला चरितार्थ चालतो असा बखियाचा दावा आहे. त्याच्याविरुद्ध स्मगलिंगचे सात दावे चालू असले तरी आपल्याला उगाचच गोवण्यात आले आहे असा त्याचा दावा असून लक्षावधी रुपयांचा खर्च चालवणाऱ्या बखियाचे उत्पन्न केवळ वीस हजार रुपयांचे आहे. १९७९–८० मध्ये त्याने भरलेल्या टॅक्स रिटर्नवरून त्याने केवळ २८३ रुपये आयकर भरल्याचे दिसून येते. गेल्या वर्षी नारळीच्या उत्पन्नात वाढ झाल्याने ही आयकराची रक्कम ४८० रुपयांवर गेलेली दिसते. आज त्याचे उत्पन्न हे असे वेताचे असले तरी मुंबईमधील प्रथमश्रेणीच्या कायदेविषयक फर्मचा तो सल्ला घेऊ शकतो. त्याचा खटला चालवणाऱ्या नामवंत वकिलांना प्रतिदिनी पाच हजार रुपये दिले जातात. आपले सारे वकिली कौशल्य पणास लावून ही मंडळी बखियाचा बचाव करतात. गोव्यामधून पळून गेल्याचे एवढे रामायण झाल्यानंतर त्याला गेल्या वीस जुलैला कस्टम अधिकाऱ्यांनी अटक केली. एस. एस. कामत, ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट, दमण यांच्या न्यायालयात बखियाला नेण्यात आले. कोणकोणत्या तस्कर–विषयक गुन्हेगारीबद्दल बखियावर खटले आहेत याचा सारा तपशील न्यायालयासमोर ठेवण्यात आला आणि रिमांड मंजूर करावा अशी विनंती करण्यात आली. न्यायमूर्ती कामतांनी काय करावे ? त्यांनी दहा हजार रुपयांचा जामीन आणि दहा हजार रुपयांची व्यक्तिगत हमी घेऊन बखियाची सुटका केली. कस्टम अधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा विचार करण्याची गरजही श्री. कामत यांना भासली नाही श्री. कामत यांनी यासंबंधीचे सारे कामकाज त्यांच्या चेंबरमध्ये केले. बखियाला खुर्ची देण्यात आली. त्याच्यासाठी चहा मागवण्यात आला. कस्टम अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अर्जाच्या संदर्भात निवेदन करण्याची सरकारी वकिलांची इच्छा होती; परंतु त्यांना परवानगी नाकारण्यात आली. न्यायालयाचा निर्णय कामतसाहेबांच्या कारकुनाने वाचून दाखवला. स्वतः कामतसाहेबांना निर्णय देतेवेळी उपस्थित राहण्याचीही गरज भासली नाही. कस्टमखात्याचे वकील सी. एन्. देसाई व वी. एम. कोलकर या निर्णयामुळे चांगलेच आश्चर्यचकित झाले. व्यक्तिगत हमीची रक्कम भरून आणि जामिनाची तरतूद करून बखिया रुबाबात निघून गेला!

बखिया हा सध्या नंबर एकचा तस्कर समजला जात असल्याने कस्टम अधिकारी त्याला असे सुखासुखी सोडणार नाहीत. खेरीज त्याच्या विरुद्ध जे सात विविध प्रकारचे दावे चालू आहेत, त्यांच्या कामकाजासाठी त्याला आपल्या वकिलांचा ताफा घेऊन बलसाड, अहमदाबाद, गोवा अशा फेऱ्या कराव्याच लागणार आहेत. कस्टम अधिकाऱ्यांनी विविध गुन्ह्यांसाठी त्याला ३० लक्ष रुपयांचा दंड ठोठावला आहे. खेरीज व्यवसायामध्येही त्याला ठोकर खावी लागली आहे. पोलिसांनी मोरवी–दमण किनाऱ्यावर जप्त केलेली चंद्रसागर या अत्याधुनिक नौकेशी आपला संबंध नसल्याचे बखियाने सांगितले असले, तरी ही नौका बखियाचीच असून, त्यावरून जप्त केलेला ९० लाख रुपयांचा चोरटा माल हा बखियाचाच आहे, याबाबत कस्टम अधिकाऱ्यांची खात्री आहे. केवळ ५ फूट चार इंच उंचीचा हा मध्यमवयीन माणूस, कोटयवधी रुपयांच्या चोरट्या आयातीमध्ये गुंतला असेल असे काही त्याला पाहून वाटत नाही. त्याची स्वतःची रहाणी साधी आहे. तो आपले छायाचित्र घेऊ देत नाही. कोणी छायाचित्र घेत आहे असे लक्षात आल्यास तो तोंड चुकवतो. गेल्या काही महिन्यांमध्ये झालेल्या त्रासाची झळ त्याला पोचल्याचे त्याच्या तब्येतीवरून लक्षात येते.

चोरट्या व्यापाराच्या व्यवहारात त्याला सहाय्य करणाऱ्या दमणमधील कोळ्यांना बखिया हा परमेश्वरी अवतार वाटतो; त्यांच्या अनेक अडचणींच्या वेळी त्याने सढळ हाताने मदत केली असल्याने ते त्याच्याशी निष्ठावान आहेत. कस्टम अधिकारी लक्ष्मण फिटर म्हणतात, आम्ही सर्व कायदेशीर तरतुदी पूर्ण केल्या तरी दमणमध्ये बखियाला अटक करणे जवळजवळ अशक्य आहे, इतका प्रचंड दबदबा व शक्तीशाही यंत्रणा त्याने येथे तयार केली आहे. दमणमधील कोळी–ज्यांची संख्या एकूण लोकसंख्येच्या ७० टक्के आहे हे– त्याच्याशी इतके प्रामाणिक आहेत की, आम्ही त्याला अटक करण्यासाठी आलो हे समजताच, त्यांनी बखियाला अशा जागी लपवून ठेवले असते की, कितीही प्रयत्न करून आम्हाला तो सापडू शकला नसता. त्याच्यावर श्रद्धा असणाऱ्या या कोळी समाजामधील लोकांना, त्याचे बाईबद्दल असणारे वेड मात्र मुळीच पसंत नाही ! बखियाला अन्य व्यसने नसली तरी त्याला बाईचा दांडगा शौक आहे. त्यातही तरुण आणि कोऱ्याकरकरीत मुलींचा उपभोग घेण्यात त्याला आनंद वाटतो. आता हा शौक पूर्ण करायचा म्हणजे काही मंडळींना दुखवणे आलेच. तशी काही मंडळी दुखावलेली आहेतही; परंतु त्याने केलेल्या चांगल्या गोष्टींचा त्यांच्यावर पगडा असल्याने

आणि त्याची दहशतही वाटत असल्याने ती मंडळी त्याच्या विरोधात जाणे पसंत करत नाहीत. नारायणभाई टंडल हा दमणचा एक टॅक्सी-ड्रायव्हर, तो म्हणतो, बखियाने दमणमधील शेकडो गोरगरिबांना उदंड मदत केली आहे.

बखियाचे निवासस्थान असलेल्या पारकोटा शेरीमध्ये अनेक तरुण मुली वावरताना दिसतात. त्या आपण तेथे नोकरी करत असल्याचे सागत असल्या तरी बखियाचे षौक पूर्ण करण्याचे कामच त्यांना करावे लागते हे सर्वांनाच माहीत आहे. बखियावाडी या त्याच्या वस्तीवर विश्वासू सेवकांचा कडेकोट पोलीसबंदोबस्त असून बखियाला ते कोणालाही भेटू देत नाहीत. विशेषत: पत्रकारांपासून ते त्याला कटाक्षाने दूर ठेवतात. ते म्हणतात, आपण त्याना भेटू इच्छिता हे ठीक आहे; पण आमचे भोळेभाबडे शेठजी काही तरी बोलतील आणि अडचणीमध्ये येतील. आपल्या मुलाखतीमुळे नवीन निष्पन्न तर काही होणार नाही आणि कस्टम-अधिकाऱ्यांना मात्र काही तरी खाद्य मिळेल. कशाला घेता आपण ही नसती तसदी? शेठजी पुरेसे त्रासलेले आहेत. त्यांना आणखी त्रास देऊ नका!

कस्टम अधिकाऱ्यांनी जोरदार आघाडी उघडली असल्याने. बखिया सध्या थंड आहे; पण वातावरण थोडे निवळले की, आपल्या अत्याधुनिक साधनांनी युक्त असलेल्या बोटींचा वापर करून केवळ ४८० रुपये आयकर भरणारा हा तस्कर राष्ट्रविरोधी अशा चोरट्या व्यापाराच्या व्यवहारात स्वत:ला झोकून देईल!

## □ एशियन गेम्स : अशीही एक बाजू


एशियन गेम्सच्या वातावणाने दिल्ली मोहरून गेली आहे. १९ नोव्हेंबरला या स्पर्धा सुरू होतील त्या वेळी, काळ-काम-वेगाचे गणित जमवून या स्पर्धांसाठी आवश्यक असलेले प्रचंड बांधकाम व नवीन पूल, हे सर्व आपण रात्रंदिवस कष्ट उपसून कसे पूर्ण केले, याचा तपशील पुरवून, भली भली मंडळी श्रेय उपटतील आणि त्याच वेळी दिल्लीमध्ये तळ ठोकून बसलेल्या हजारो कामगारासमोर आता पुढे काय असा प्रश्न निर्माण होईल. वास्तविक रक्ताचे पाणी कोणी केले असेल तर ते या कामगारांनी. ओरिसा, मध्यप्रदेश आणि दक्षिण भारतामधून आलेल्या या कामगारांना दिल्लीमधील दोन वर्षांचा काळ मोठ्या सुखाचा गेला असे नाही; परंतु निदान दोन वेळच्या जेवणाची तरी सोय झाली. एशियन गेम्ससाठी जे बांधकाम करण्यात आले त्यासाठी मध्यप्रदेशातून सत्तावीस हजार, तर ओरिसामधून बावीस हजार कामगार कंत्राटदारानी पकडून आणले. खेरीज दक्षिण भारतामधील चार राज्यांमधून सुमारे पाच ते सात हजार कामगार कामावर आणण्यात आले. आता एशियन गेम्सचे काम करवून घेतल्यावर या सुमारे पन्नास हजार कामगारांना वाऱ्यावर सोडून दिले जाईल. त्यांची जबाबदारी घेण्यास अथवा त्याना सतत काम पुरवण्यास कोणीच जबाबदार नाही.


या कामगारांना अक्षरश: एखाद्या यंत्राप्रमाणे राबवून घेण्यात आले. कित्येक आठवडे तर दिवसाला १४ ते १५ तास काम करावे लागले. ज्यादा कामाचा थोडा-फार ज्यादा मोबदला मिळाला खरा; परंतु शरीर बोलू लागले. अतिश्रमामुळे आपण वयाच्या केवळ ३३व्या वर्षी निकामी झालो अशी तक्रार ओरिसामधून आलेल्या वीरेंद्र पटनायक या कामगाराने केली. पैशाबद्दल बोलताना कालीचंद हा कामगार म्हणाला, 'दिल्ली डेव्हलमेन्ट कार्पोरेशन'च्या नियमाप्रमाणे आम्हाला रोज ११ रुपये साठ पैसे मिळणे जरूर होते; परंतु प्रत्यक्षात केवळ ६ रुपये रोजावर समाधान मानावे लागे. याबाबत कंत्राटदाराकडे मी तक्रार केली तर माझ्या हातात माझ्या गावचे तिकिट देण्यात आले. मी चिडून कामगारांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केल्यावर मला मारपीट करण्यात आली, एक डोळा कायमचा निकामी करण्यात आला' कंत्राटदार मिश्रीलाल शर्मा म्हणाले, 'या कामगाराना त्यांच्या गावामध्ये खायची भ्रांत होती. आम्ही त्यांना रोजी मिळवून दिली. त्याच्या गावातून येथवर येण्याचा खर्च दिला, एका कुटुंबामधील चार-चार मंडळीना काम दिले, त्यांची रहाण्याची-जेवणाची व्यवस्था केली. आता हे सारे केल्यावर आम्हाला काही परत मिळायला नको? पण कंत्राट स्वीकारताना नफा वगैरे विचारात घेतलेला असतोच आणखी कामगारांकडून जास्त कशाला? यावर शर्मांचे उत्तर: प्रत्येक कामगाराकडून आम्ही रोज केवळ साठ पैसे घेतो. प्रत्येकी साठ पैसेप्रमाणे किती रक्कम जमा होते? रोज साधारणपणे दोनशे रुपये जमा होतात. म्हणजे महिना ६ हजार रुपये तर यांना कामगारांच्या मंजूर वेतनातूनच मिळतात. याशिवाय गेम्सच्या बांधकामात गुतलेल्या अकुशल कामगारांना किमान वेतन ११ रुपये साठ पैसे आकरल्याने त्याच दराने कंत्राटदार पैसे घेतात. म्हणजे प्रत्यक्षात त्याच्या खिशात किती मोठी रक्कम पडत असली पाहिजे याचा सहज अंदाज बांधता येईल. या कामगाराना अन्य फायदे कोणते मिळतात याबाबत चौकशी केली असता सांगण्यात आले की, कामावर असताना जखमी होऊन हात, पाय अथवा डोळा जर कायमचा निकामी झाला तर कामगाराला दहा हजार रुपये देण्यात येतात. जर कामगार कामावर असताना मरण पावला तर त्याला अठरा हजार रुपये देण्यात येतात. किती कामगार जखमी वा मयत झाले याचा तपशील मिळू शकला नाही; परंतु किमान २० कामगार कामावर असताना जखमी झाले असावेत, असा अंदाज दुसरे एक कंत्राटदार धनचंद वडार यांनी व्यक्त केला. ते म्हणाले, कंत्राटदार व पोटकंत्राटदारांची संख्याच दोन-अडीचशेच्या घरात आहे. त्यामुळे एकत्रित अशी माहिती उपलब्ध नाही.

### जेवणारहाण्याचे हाल

या कामगारांना राहण्यासाठी तंबू उभारण्यात आले असून एका छोटेखानी तंबूमध्ये किमान ८ ते १० कामगारांना आश्रय घ्यावा लागतो. अत्यंत अपुरी जागा असली तरी उन्हाळ्यात निदान बाहेर उघड्यावर तरी जाता येत असे; पण कडाक्याच्या थंडीत आणि झोडपणाऱ्या पावसात या कामगाराचे अतीव हाल झाले. आठ ते दहा तास काम केल्यावरही त्यांना निवाऱ्याची जागा उपलब्ध नसल्याने पुरेशी विश्रांतीही घेता येत नसे. खेरीज दिल्लीच्या अतिरेकी हवामानाचा सराव नसल्याने अनेक कामगारांना कायमची दुखणी लागली. कंत्राटदार भोजन कसे देतो याबाबत चौकशी केली असता, आपल्या नवऱ्यासह स्टेडियमच्या कामावर मोल-मजुरी करणारी सावित्री ही दक्षिणी स्त्री म्हणाली, कसा का होईना पण थोडाफार तरी भात आम्हाला हवा असतो; पण येथे डाळ व दोन रोटया या खेरीज काही मिळत नाही. जेवणासाठी म्हणून ५ रुपये कापून घेतात आणि दोन रुपयात भागवतात. पुन्हा कुठे तक्रार करण्याची सोय नाही!

अशा या अनत अडचणी सोसून पन्नास हजार कामगार गेली दीड-दोन वर्षे सतत खपल्याने एशियन गेम्ससाठी आवश्यक असलेले बांधकाम ठराविक मुदतीमध्ये मोठ्या प्रमाणात पूर्ण होऊ शकले. या कामाचा झपाटाच असा होता की, विचार करण्याचीही उसंत नव्हती. काम आणि अधिक काम असा हा घोषा होता. आता दिल्ली क्रीडा-शौकिनांनी फुलून जाईल. एशियन गेम्सचा सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न होईल आणि ज्यांनी जिवाची तमा न बाळगता काम केले ते असंख्य कामगार उद्याच्या भवितव्याची चिंता करत दशदिशांना पांगून जातील. एशियन गेम्सची अशीही एक बाजू आहे, याची नोंद करून या कामगारांच्या पदरात त्यांच्या कामाचे श्रेय टाकणे अगत्याचे वाटते. □





# महात्मा आणि माणूस

**पूर्वसूत्र**

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाची वार्तापत्रं लिहिण्यासाठी 'शिकागो ट्रिब्यून'चे प्रतिनिधी म्हणून विल्यम शिरर भारतात दाखल झाले. एकतीस सालच्या फेब्रुवारी महिन्यातली गोष्ट. गांधीजी पुन्हा एकदा तुरुंगातून सुटले होते.

त्यांना भेटण्यासाठी शिरर दिल्लीत पोचले तेव्हा गांधी-आर्यविन बोलणी चालू होती. तुरुंगातल्या पन्नास हजार सत्याग्रहींची सुटका आणि स्वराज्याच्या वाटाघाटींचं वचन, या दोन अटींवर गांधी कायदेभंगाची चळवळ मागे घ्यायला तयार होते. गांधी भयंकर कामात होते, तरीही शिरर यांची भेट त्यांनी नक्की केली.

## 'गांधी–अ–मेमॉर' – विल्यम शिरर

परिचयात्मक संक्षेप व स्वैर रूपांतर :

भाग : **दुसरा**

**निखिल वागळे**

अखेर बावीस फेब्रुवारीला (१९३१) माझी इच्छा पूर्ण होण्याची चिन्हं दिसू लागली. दुसऱ्याच दिवशी माझा सत्ताविसावा वाढदिवस होता. साहजिकच माझ्या दृष्टीने ती वाढदिवसाची सर्वात सुंदर भेट ठरली.

आपल्या रोजच्या प्रार्थनासभेच्या तासभर आधी गांधी मला भेटतील असा निरोप त्यांच्याकडून आला. वाटलं तर प्रार्थनेलाही थांबायला त्यांनी सांगितलं होतं.

गांधी त्या वेळी डॉ. मुख्तार अहमद अन्सारींकडे रहात होते. अन्सारी हे दिल्लीतले नामांकित डॉक्टर. यमुनेच्या पलीकडे पाहू शकणारा हा विशाल दृष्टीचा मुसलमान.

मी अन्सारींच्या घरी पोचलो तेव्हा गांधी व्हरांड्यातल्या एका कोपऱ्यात सूत कातत बसले होते.

त्यांनी माझं हार्दिक स्वागत केलं. त्या स्मितहास्याने जणू त्यांचा सगळा चेहराच उजळून निघाला होता आणि डोळ्यात एक जिवंत चमक दिसत होती. त्या दिलखुलास सलामीने माझी भीती कुठच्याकुठे पळून गेली.

एका उंच सडपातळ, गोऱ्या बाईकडे ते वळले आणि तिला माझ्यासाठी खुर्ची आणायला त्यांनी तिला सांगितलं. आपलं बोडकं डोकं झाकण्यासाठी तिने डोक्यावरून पदर घेतलेला दिसत होता.

'त्या मिराबाई असाव्यात' मी स्वतःशीच तर्क बांधला. मिराबाई ह्या पूर्वाश्रमीच्या मेडलिन स्लेड. ॲडमिरल सर अेडमंड आणि लेडी स्लेड यांची ही मुलगी गांधींच्या तत्त्वज्ञानाने एवढी भारावली की आपला देश सोडून भारतात आली. साधेपणा आणि शुद्ध चारि-

त्याची शपथ घेऊन ती गांधींच्या आश्रमातच राहू लागली. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामातही तिने स्वत:ला झोकून दिलं होतं. गांधींचं आणि तिचं जवळिकीचं नातं माझ्या ताबडतोब लक्षात आलं. त्याबद्दल बरंच काही सांगण्यासारखं आहे.

कस्तुरबा शेजारीच बसल्या होत्या. चेहरा बराचसा सुरकतलेला; पण तरुणपणी त्या सुन्दर दिसत असाव्यात हे सहजपणे लक्षात येण्यासारखं होतं. त्यांच्या गोल, मोठ्या डोळ्यात अजूनही एक तेज होतं हे निश्चित

मिस स्लेड माझ्यासाठी बाजूची खुर्ची ओढणार तोच मी म्हटलं, 'राहू दे. मी खालीच बसेन.'

मी खाली बसलो खरा; पण माझ्या दृष्टीने ते थोडं अवघडच होतं. माझी अडचण गांधींच्या लक्षात आली असावी. मिस्किलपणे माझ्याकडे पहात ते म्हणाले, 'जशी तुमची इच्छा; पण फारच अवघडल्यासारखं झालं तर मात्र मला सांगा !'

आमचं बोलणं चालू असताना गांधी काय सांगत होते याकडे माझं लक्ष होतंच, पण त्याहीपेक्षा त्यांचं व्यक्तिमत्त्व मी निरखत होतो; पण त्यांना प्रत्यक्ष पहाताना मला काहीसं आश्चर्य वाटत होतं. काही माणसांचा मोठेपणा त्यांचा चेहराच सांगतो. पण गांधींच्या चेहऱ्यावर या मोठेपणाचं बारिकसं चिन्हही नव्हतं. गर्दीत मिसळले असते तर लक्षातही आले नसते ! काहीजणांनी यापूर्वी ते कुरूप असल्याचं म्हटलं होतं; पण मला तसं अजिबात वाटलं नाही, त्या चेहऱ्यात निश्चितपणे एक सौंदर्य लपलं होतं. पण इतर चार चेहऱ्यांपेक्षा तो फारसा वेगळा नव्हता हेही तितकच खरं.

गांधी त्या वेळी एकसष्ट वर्षांचे होते. त्यांचे उपासतापासही सतत चालू असत. उन्हातान्हातून भटकण्याचे, अनेक वर्षं गजाआड काढण्याचे परिणाम शरिरावर जाणवतही होते. ओघळलेलं नाक आणि फुगलेल्या नाकपुड्या जवळजवळ ओठांनाच स्पर्श करताहेत असं वाटत होतं. त्यांचा खालचा ओठच तेवढा स्पष्टपणे पुढे आलेला दिसत होता. बहुतेक सर्व दातही गेलेले असावेत. बोलताना मला फक्त दोनच दिसत होते. केस अतिशय बारीक केलेले, टक्कल म्हटलं तरी हरकत नाही. कान सशासारखे मोठे, बाहेर फाकणारे. त्यांचे चमकदार राखाडी डोळे ते चष्म्यातून रोखून बघत तेव्हा विलक्षण धारदार दिसत. उलट एखाद्या विनोदाच्या वेळी ते फारच मृदू बनत. त्यातून सतत एक आनंदी वृत्ती डोकावे. या विलक्षण बोलक्या डोळ्यांमुळे मी त्यांच्या प्रेमातच पडलो होतो म्हटलं तरी चालेल. एक समर्थ, निर्भय माणूस मी अनुभवत होतो. खांद्यावर मोठ्या जबाबदाऱ्या असूनसुद्धा तो मनमोकळा राहिलेला दिसत होता. स्वत:च्या उणीवावर बोट ठेवायचा, इतराबरोबर स्वत:च्या कमीपणालाही हसायचा मोठेपणा त्यांच्याकडे होता.

गांधीजी हडकुळे दिसत असले तरी ते त्यांचं रूप फसवं होतं. प्रकृती निरोगी रहाण्यासाठी ते मोजकाच आहार घेत. दररोज सकाळी चार-पाच मैल चालत. त्यांचा चालण्याचा झपाटा प्रचंड होता. नंतर एक दिवस त्यांनी मला सकाळी त्यांच्याबरोबर बोलावलं तेव्हा मला त्याचा अनुभव आला. मी फक्त सत्तावीस वर्षांचा होतो आणि आल्पस पर्वतावरच्या गिर्यारोहणाची मला सवय होती तरी मी त्यांच्या वेगाने त्या वेळी चालू शकलो नव्हतो.

आपल्या देहाभोवती ते फक्त धोतर गुंडाळत. फारच थंडी असेल तर एखादी शाल अंगावर घेत. पायातल्या लाकडी खडावा मात्र अखंडपणे त्यांची सोबत करत.

थोडासा आवाज चढवून ते बोलत असले तरी शब्द अतिशय हळुवारपणे उच्चारत होते एखाद्या मुद्द्यावर जोर द्यायचा असेल तर अधिकच संथपणे. बोलण्याच्या ओघात नंतर त्यांचा आवाजही हळूहळू खाली आला. एखाद्या कवीसारखा त्यांच्या इंग्लिश उच्चारांना नाद होता. आवश्यक तेवढंच ते बोलत; पण अतिशय ठामपणे. मधूनच एखादा खास ठेवणीतला चिमटा काढण्याचीही त्यांची सवय होती.

त्यांच्या नम्रपणाने तर मला धक्काच बसला. आजपर्यंत मी युरोपातल्या ज्या ज्या मोठ्या माणसांना भेटलो होतो त्यांच्याशी या वृत्तीचा थोडासुद्धा मेळ बसत नव्हता. ही मंडळी त्यांचं सामर्थ्य, त्यांचं धैर्य वगैरे गोष्टींनी समोरच्याला प्रभावित करण्यासाठी आटापिटा करताहेत असं वाटे. त्यांचा अहंकारही अशा वेळी लपत नसे. याउलट गांधींच्या बोलण्यात अहंकाराचा लवलेशही नव्हता. अगदी घरगुती गप्पा मारल्यासारखे ते बोलत होते. 'एवढ्या किरकोळ, साध्या माणसाने ब्रिटिश साम्राज्याला कसा दणका दिला असेल ? कोट्यवधी लोकांना तो क्रांतीचं तंत्र कसं शिकवू शकला असेल ?' गांधींकडे पहाता पहाता माझ्या आश्चर्यात भरच पडत होती.

'तुम्हाला हे सगळं कसं साधलं ?' मी सरळ त्यांनाच विचारलं

'प्रेम आणि सत्याच्या मार्गानं' त्यांनी हसत हसत उत्तर दिलं 'दीर्घ पल्लयाच्या लढाईत कोणतीही शक्ती त्याच्यापुढे उभी राहू शकत नाही '

मला असं थातुर-मातुर उत्तर नको होतं. गांधींचे पन्नास हजार अनुयायी तुरुंगात होते. सरकारने फक्त त्यांचीच सुटका केली होती. परदेशी मालावर काँग्रेसनं पुकारलेल्या बहिष्कारानं ब्रिटिश सरकारची त्रेधा उडाली होती. सहाजिकच गांधींच्या अशा उत्तरानं माझं समाधान होणं शक्य नव्हतं.

'हे मला माहिती आहे.' मी त्यांना छेडलं; 'पण तुम्ही नेमकं काही सांगू शकाल का ?'

पहिल्याच मुलाखतीत अधिक काही सांगायची त्यांची तयारी नसावी. व्हाइसरॉयशी चाललेल्या बोलण्यात अडथळा येईल असं जाहीररीत्या काहीही न बोलण्याचं त्यांनी सरकारला आश्वासन दिलं होतं. सुरुवातीलाच त्यांनी मला हे सांगितलं होत.

'ते सोडून काहीही विचारा !' ते म्हणाले. 'शक्य तर मी तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तर देईन. लॉर्ड आयर्विनबरोबरची बोलणी संपल्यावर तुम्ही वाटेल ते विचारू शकता. मग बोलण्याची निष्पत्ती काहीही होवो. त्या वेळी आपण सविस्तरपणे बोलू. अगदी खोलवर जाऊन तुमच्या शंकांबद्दल आपण तेव्हा चर्चा करू शकू.'

'चालेल. मला ते निश्चितच आवडेल.' मी रुकार दर्शवला.

तरीसुद्धा त्यांनी एक गोष्ट आवर्जून सांगितली. प्रेम आणि सत्य हा त्यांच्या अहिंसक चळवळीचा पाया होता. त्याबद्दल ते म्हणाले, 'तुम्हा पाश्चिमात्यांना हे समजणं फार कठीण आहे. हे मला कळतं; पण या दोन गोष्टींबद्दल मी विशेष आग्रही आहे. आम्ही काय करू मागतो आहोत हे तुम्हाला उमजणारच नाही. आमचा मार्ग वेगळा

आहे. तुम्हाला तो ओळखीचा नाही. आम्ही आत्मिक सामर्थ्यानिशी लढतो आहोत, हे जोपर्यंत तुम्ही समजून घेत नाही तोपर्यंत ही परिस्थिती बदलणार नाही!'

'कशानिशी?' मी विचारलं.

'आत्मिक सामर्थ्य!' त्यांनी जोर देत म्हटलं. नंतर थोडा वेळ ते थाबले. त्यांच्या अमर्याद सहनशीलतेची ही एक चुणुक होती. पुढे म्हणाले, 'आम्ही त्याला सत्याग्रह म्हणतो. स्वराज्याच्या या लढाईत आम्ही आजवर जे काही मिळवलंय...'

'स्वराज्य?' मी त्यांना अडवलं. 'म्हणज संपूर्ण स्वातंत्र्य का?'

'बरोबर. गेल्या डिसेंबरातल्या लाहोरच्या अधिवेशनात काँग्रेसनं ते ध्येय ठरवलंय. त्याहून काहीही कमी आम्ही मान्य करणार नाही. सत्याग्रहाच्या मार्गानं आम्ही ते मिळवणार आहोत!'

'सत्याग्रह' किंवा 'आत्मिक सामर्थ्य' हा शब्द मला त्या वेळी निव्वळ धार्मिक किंवा आध्यात्मिक वाटला. सगळ्या मानवजातीनं आपलासा करावा असा हा शब्द! पण दडपशाहीवर भरवसा ठेवणाऱ्या राज्यकर्त्यांशी लढण्यासाठी तो व्यवहार्य ठरेल हे मात्र मला पटत नव्हतं.

माझ्या चेहऱ्यावर हा अविश्वास व्यक्त झाला असावा. गांधी तावडतोब म्हणाले, 'माझ्यावर विश्वास ठेवा, सत्याग्रह हे अत्यंत व्यवहार्य हत्यार आहे!'

मी त्याविषयी अनभिज्ञच होतो. विषय पुढे वाढवण्यात अर्थ नव्हता.

गांधीनाही माझ्या या अज्ञानाची जाणीव झाली असावी. ते म्हणाले, 'कधी तरी आपण यावर सविस्तरपणे बोलू. आज तुमच्या मनात दुसरे काही प्रश्न आहेत का?'

'प्रश्न खूपच आहेत.' मी उत्तरलो, 'समजा, तुमच्या वाटाघाटी यशस्वी झाल्या आणि तडजोडीचा मसुदा ठरला; पण अजून तुमचा ब्रिटिशांच्या आश्वासनावर विश्वास आहे का?'

'माझा त्यांच्यावर विश्वास होता. अगदी १९१९ पर्यंत!' गांधी म्हणाले, 'पण अमृतसर हत्याकांड आणि पंजाबातल्या इतर अत्याचारामुळं माझं मत बदललं. त्यानंतर आजवर पुन्हा विश्वास वाटावा असं काहीही घडलेलं नाही. गेल्या दहा महिन्यात तर नक्कीच नाही!'

तेरा एप्रिल १९१९ ला अमृतसरमध्ये झालेल्या त्या अमानुष हत्याकांडाबद्दल माझीही काही मतं होती. शांततेनं चाललेल्या भारतीयांच्या एका सभेवर ब्रिटिशांनी अतिशय निर्घृणपणे गोळीबार केला होता. या घटनेपासून ब्रिटिश राजकर्त्यांशी असलेलं भारतीयाचं नातं बदललं असं मला वाटत होतं. आता गांधी माझ्या मताला पुष्टीच देत होते. दोन युद्धात त्यांनी ब्रिटिश साम्राज्याशी निष्ठा दाखवली होती. या निष्ठेला अखेर तडा गेला! ब्रिटिश क्रूरतेची कुठलीही पातळी गाठू शकतात असं या घटनेवरून त्याचं मत झालं होतं. असली जुलमी राजवट उलथून पाडायची जिद्द त्यांच्यामध्ये पेटली होती. अमृतसरच्या या हत्यांनंतरच गांधीनी राष्ट्रीय चळवळीचं नेतृत्व आपल्याकडे घेतलं होतं.

गेल्या वर्षी मो भारतात आलो तेव्हा अमृतसरला गेलो होतो. जिथे हत्याकांड झालं त्या जालियनवाला बागेलाही भेट दिली होती. प्रत्यक्ष पाहिल्याने ते दृश्यच जणू माझ्या डोळ्यांसमोर उभं राहिलं. निष्पाप जीवाना ब्रिटिशांनी असं जाणूनबुजून मारलं असेल यावर विश्वास ठेवणं फार कठीण होतं; पण ती वस्तुस्थिती होती. इंग्लंडमधले आणि भारतातले ब्रिटिश नागरिक या घटनेचं समर्थन कसं करू शकतात हेच मला कळत नव्हतं. हाउस ऑफ कॉमन्सनं तर गोळीबाराचा आदेश देणाऱ्या त्या ब्रिटिश जनरलला क्षमा करणारा ठरावच करून टाकला होता. भारतातल्या ब्रिटिशांनी तर याही पुढची पायरी गाठली. त्यानी त्या जनरलसाठी सव्वीस हजार पौंडाची थैलीही जमा केली त्यांच्या मायदेशातल्या मंडळींनी तर याहीपेक्षा बराच मोठा निधी उभारला. अशा तऱ्हेचं रोख रकमेचं पारितोषिक मिळवणारा जनरल ब्रिटिश इतिहासात दुसरा कुणी बहुधा नसेलच!

गांधी हे सगळं अत्यंत शातपणे सागत होते. त्यांच्या बोलण्यात अजिबात कडवटपणा नव्हता. तसा तो कधीच नसायचा. मग ते ब्रिटिशाच्या दडपशाहीबद्दल बोलत असोत की तुरुंगवासाबद्दल.

मला माझी अमृतसरची भेट आठवली. जालियनवाला बागेची रचना डोळ्यांसमोर उभी राहिली. जनरल डायरनं कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय सोळाशे फैरी झाडल्या होत्या. फक्त दहा मिनिटांचा हा काळ! तेवढ्यात ३७९ माणसं मारली गेली, ११३७ जखमी झाली आणि इतर दीड हजारांना किरकोळ दुखापती झाल्या होत्या. डायरच्या पोलिसांनी झाडलेल्या प्रत्येक सोळा गोळ्यापैकी पंधरा कामी आल्या होत्या! गोळ्या चुकवायला जागा नाही, पळून जाणं तर अशक्यप्राय अशी ती परिस्थिती काहींनी बागेतल्या जुन्या विहिरीतच उड्या मारल्या. ते तिथल्या तिथे बुडून मेले! बाकीच्यांना जागचं हलताही आलं नाही काँग्रेसच्या अहवालानुसार जखमी झालेल्याना योग्य वैद्यकीय मदत वेळच्या वेळी मिळाली असती तर काहीजण तरी वाचू शकले असते; पण जनरल डायरचा खुनशीपणा इतका की त्याने जखमींवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनाही रोखलं. त्याच्यासाठी त्यानं कर्फ्यू शिथिल केला नाही!

जालियनवाला बागेत ज्या ठिकाणाहून जनरल डायरनं गोळीबाराला सुरुवात केली तिथं एक शिला बसवली आहे त्यावरचे शब्द मी त्या वेळी माझ्या वहीत उतरवून घेतले होते— "ब्रिटिश गोळ्यांनी जखमी झालेल्या, मारल्या गेलेल्या पंधराशे शिख, हिंदू आणि मुस्लिमांच्या हौतात्म्याला अर्पण!"

पण या निर्घृण खुनापेक्षाही अमृतसरमध्ये घडलेली दुसरी एक घटना गांधीना अधिक किळसवाणी वाटत होती. हा जनरल डायरनं दिलेला 'रांगण्याचा' हुकूम! मिशनरी काम करणाऱ्या एका गोऱ्या महिलेवर जमावानं चिडून हल्ला केला म्हणून डायरनं हा मार्ग अवलंबला. ती बाई जिथे रहात होती त्या रस्त्यावरून जे कोणी गेले त्या सर्वांना त्यानं गुडघ्यावर रांगायला लावलं होतं. हल्ला करणाऱ्या जमावाशी ज्याचं काहीही देणंघेणं नव्हतं असे अनेक वृद्धही यातून सुटले नव्हते. जनरल डायरचं सैनिक संगिनी रोखून या 'रांगणाऱ्या' लोकावर देख-

**माझ्यावर विश्वास ठेवा, सत्याग्रह हे अत्यंत व्यवहार्य हत्यार आहे.**

रेख करत होते. सगळ्यांची ओटीपोटं धुळीनं माखतात की नाही यावर त्यांची कडक नजर होती. भारतीयांच्या दृष्टीनं कधीही विसरता न येण्याजोगा हा अपमान होता. गांधी याबद्दल जनरल डायर आणि पर्यायानं ब्रिटिशांना क्षमा करायला कधीही तयार झाले नसते!

" अक्षरशः गांडुळासारखे लोक सरपटत होते." ते शांतपणे म्हणाले. मला आठवले त्यांच्या आत्मकथनातले शब्द– 'या जुलमी कृत्यामुळंच मला जालियनवाला बागेतल्या हत्याकांडाचा विशेष अर्थ समजला ...' त्यांनी लिहिलं आहे !

" सरकारनं पंजाबात चालवलेल्या बेकायदा दडपशाहीबद्दल आणि अत्याचाराबद्दल मी कॉंग्रेसच्या वतीनं एक अहवाल तयार केला आहे. अहवाल अर्थातच अनधिकृत आहे. तो तुम्ही वाचलात का ? " त्यांनी विचारलं.

"हो. मी तो वर्षापूर्वी वाचलाय."

"त्यावरून तुम्हाला पंजाबातल्या अत्याचाराची कल्पना येईल. ब्रिटिश माणूसपणा सोडून कुठवर जाऊ शकतात याचा तो धडधडीत पुरावा आहे."

नंतर बराच वेळ गांधी माझ्या प्रश्नांची उत्तरं देत होते. दिवसभराच्या वाटाघाटीमुळं आणि त्यानंतरच्या कॉंग्रेस वर्किंग कमिटीतल्या चर्चेमुळं ते थकलेले असतील असं मला वाटत होतं; पण माझा अंदाज खोटा ठरला. थकण्याचं एकही चिन्ह दिसत नव्हतं. मधूनच ते एखादा चांगला विनोद करत. कदाचित ताजेपणा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य घटक असावा.

बोलता–बोलता बराच उशीर झाल्याचं माझ्या लक्षात आलं. थोड्याच वेळात त्यांना प्रार्थनेसाठी बाहेरच्या हिरवळीवर जावं लागणार होतं. फार खोलवर जायची ही वेळ नव्हती. काही विषयांचं फक्त सूतोवाच करावं, म्हणजे मागाहून त्यावर सविस्तर चर्चा करता येईल असं मी ठरवलं.

हिंदू–मुस्लीम समाजातलं स्त्रीचं दुय्यम स्थान लक्षात घेता त्यांचा असहकार-चळवळीतला सहभाग थक्क करणारा होता. मुस्लिम स्त्रिया तर पडद्यातच वावरत; पण याच बायकांनी स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून त्या सत्याग्रह करत, लाठ्या खात आणि तुरुंगातही जात. मी गांधींना त्याबद्दल विचारलं.

'या चळवळीत महिलांनी बजावलेल्या भूमिकेची तुम्ही दखल घेताय हे पाहून मला खरोखरच आनंद झाला,' ते रोखून बघत म्हणाले. त्यांचे डोळे त्या वेळी अधिकच उजळलेले भासले. 'असलं अनोखं दृश्य आजवर या दुनियेत कधीच पाहिलेलं नाही. त्यांनी पुरुषाप्रमाणे धाडस दाखवलं. काय काय भोगलं, किती यातना सहन केल्या याची तर गणनाच नाही. त्यांच्यामुळंच माझा देशबांधवांवरचा विश्वास वाढला आहे. महिलांमधल्या या जागृतीमुळं साऱ्या देशभर ती संवेदना पसरायला मदत झाली आहे. त्यांच्याशिवाय आम्हाला स्वातंत्र्य मिळू शकणार नाही !'

'तुम्ही हा कशाचा परिणाम मानता ?' मी विचारलं.

'परिणाम ? हे फक्त देवाचं देणं असू शकतं.' ते हसतहसत म्हणाले, 'या लढ्यात देवच आमच्या बाजूनं उभा आहे हे निश्चित !'

गांधींचं हे खास ठेवणीतलं उत्तर होतं. त्यानंतरही अनेकदा ते असं देव वगैरे बोलले; पण त्यामुळं माझं कधीच समाधान झालं नाही. राजकारण आणि धर्म यांची अशी गल्लत ते वारंवार करत. माझ्यासारखे अमेरिकन किंवा ब्रिटिश पत्रकारच नव्हेत तर त्यांचे निकटचे सहकारीसुद्धा त्यामुळं बुचकळ्यात पडत.

जवाहरलाल नेहरू त्यामुळं इतके चिडत की, ती चीड लपवणं त्यांना फारच थोड्या वेळा जमत असे नेहरूंचा जन्म ब्राह्मण कुटुंबात झालेला असला तरी असल्या देवाधर्माच्या गोष्टीवर त्याचा अजिबात विश्वास नव्हता. 'गांधीजी एक कोडंच बनून राहिलेत. फक्त ब्रिटिश सरकारच्या दृष्टीनं नव्हे तर आमच्या दृष्टीनही. कित्येकदा ते अनोळखीच वाटावेत असे वागतात–नेहरूंनी वाटाघाटींच्या या दिवसांचं वर्णन करताना आपल्या आत्मचरित्रात लिहिलं आहे–

" तुम्ही 'इंडियन होमरूल' हे पुस्तक जवळजवळ वीस वर्षांपूर्वी लिहिलंत. या पुस्तकानं जगभर खळबळ माजली. त्यात तुम्ही पाश्चात्य संस्कृतीवर कठोर प्रहार केले आहेत. ही 'सैतानी' संस्कृती आहे आणि हिंदूंच्या दृष्टीने हे अंधारपर्वच होय असं तुम्ही त्यात म्हटलंय. जिथे कारखाने, रेल्वे, सैन्य नसतील, हॉस्पिटलं, डॉक्टर्स, वकील शक्य तेवढे कमी असतील ते आदर्श राज्य असं तुम्ही त्यात म्हटल्याचं मला आठवतंय. आता विसाव्या शतकातलं तिसरं दशक सुरू झालंय. अजूनही तुमचं तेच मत आहे की बदललंय ?" मी गांधींना विचारलं.

प्रश्न बराच लांबलचक होता. अत्यंत शांतपणे त्यांनी तो ऐकून घेतला. प्रश्न काय असणार याचा त्यांना अंदाज येऊ लागला तसं त्यांच्या चेहऱ्यावरचं हास्य वाढत गेलं. त्यांच्या सहनशक्तीचं मला कौतुक वाटलं. अनंतापर्यंत ती तशीच चालू राहील असं त्या क्षणी तरी मला वाटलं !

प्रश्न तसा गंभीर आणि महत्त्वाचा होता. स्वातंत्र्य मिळवण्यात ते यशस्वी झाले तर कोणतं पाऊल उचलणार होते ? भारताला काही शतकं मागं नेणार होते ? मध्यम युगातली जीवनपद्धती त्यांना अपेक्षित होती का ?

माझ्या डोक्यात शंकांचं मोहोळ उठलं होतं.

'मी माझं मत बदललंय का ?' गांधी मोठ्याने हसले. 'कणभरही नाही. आधुनिक पाश्चात्य संस्कृतीचे जे काही दुष्परिणाम आहेत त्याबद्दलच्या माझ्या कल्पना आजही त्याच आहेत उद्या मी हे पुस्तक पुन्हा प्रकाशित केलं तरी त्यातला एखाद-दुसरा शब्द देखील बदलणार नाही. फक्त मांडणीत काही सुधारणा करीन इतकंच.'

माझा विश्वास बसत नव्हता. गांधींच्या खरेपणाविषयी माझ्या मनात शंका होती अशातला प्रकार नाही; पण ते जे काही सांगताहेत तेच त्यांना अभिप्रेत आहे यावर मी त्या क्षणी तरी विश्वास ठेवू शकलो नाही हे मात्र खरं.

काही दिवसांनी मी हे नेहरूंना सांगितलं तेव्हा त्यांनाही ते खरं वाटलं नाही.

'गांधीजी बऱ्याच गोष्टी सांगत असतात.' ते म्हणाले, 'लोकांना उठवण्यासाठी, त्यांच्यामध्ये चैतन्य निर्माण करण्यासाठी त्या आवश्यक आहेत असं कदाचित त्यांना वाटत असावं. पण त्यांना नेमकं तसंच करायचंय यावर मी विश्वास ठेवू शकत नाही. ते बुद्धिमान

आहेत, अनुभवीही आहेत. स्वतंत्र भारत जर काही शतकं मागं गेला तर आधुनिक जगात त्याचा टिकाव लागणार नाही हे न कळण्याइतके काही ते दुधखुळे नाहीत. विसाव्या शतकातल्या वेगाबरोबर जगायचं असेल तर स्वातंत्र्य मिळाल्यावर आपल्याला पाश्चात्य तंत्रज्ञान स्वीकारावं लागेल हे त्यांना सांगण्याचा मी अनेकदा प्रयत्न करतो. गांधीजी सगळं ऐकून घेतात; पण नंतर आपल्याच मतावर ठाम असतात!'

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर इथले अनेक प्रश्न सुटतील असं तुम्हाला खरोखरच वाटतं का? असं मी गांधींना विचारलं तेव्हा तर ते फारच आशावादी झालेले दिसले. माझ्या मते हा अवास्तववाद होता; पण त्यांचं उत्तर ठाम होतं,

'निश्चितच सर्व प्रश्न सुटतील!' त्यांनी सांगितलं, 'अर्थात अडचणी येणारच नाहीत असं मात्र नाही. थोडाफार त्रास हा व्हायचाच!'

"अगदी सामाजिक–आर्थिक समस्यासुद्धा" मी आपली चिकाटी सोडली नाही. "यात भांडवलदार–कामगार संबंध येतील, हिंदू–मुस्लिमांमधली जातीय तेढ, तळा–गाळाच्या वर्गाचं शोषण, अस्पृश्यतेचा प्रश्नही येईल. स्वतंत्र भारताचं सरकार ते सोडवू शकेल असं तुम्हाला म्हणायचंय?"

"होय. निश्चितच. जेव्हा आम्ही स्वतःच आमचे मालक होऊ तेव्हा हे प्रश्न सोडवणं सोपं जाईल. माझा आमच्या क्षमतेवर विश्वास आहे. हे प्रश्न सोडवण्याचा मार्ग वेगळा असेल. तुमचं पाश्चात्य तंत्र आम्ही वापरणार नाही, तर सत्य–अहिंसा हा आमचा मार्ग असेल. आज याच मूलभूत पायावर आमची चळवळ उभी आहे आणि उद्याच्या भारताच्या घटनेचा पायाही हाच असणार आहे."

आदर्श म्हणून हे ठीक होतं; पण वास्तवतेच्या चष्म्यातून ते फारच कल्पनारम्य वाटलं. गांधी मात्र अढळ होते.

"मी सध्याच्या शाळा बंद करून टाकीन असा जो प्रचार काही गोरेलोक करताहेत तो मात्र खरा नाही. शिक्षणाची आमची समृद्ध परंपरा जतन करायला मी उत्सुक आहेच; पण सध्या आम्ही शाळांमधून ब्रिटिशांना हवं तेवढंच शिकतो. आमच्या गरजांप्रमाणे इथे शिकवलं जात नाही. स्वातंत्र्यानंतर ही परिस्थिती रहाणार नाही." गांधींनी अधिक स्पष्ट केलं.

आमच्या गप्पा चालू असताना अनेक लोक गांधींना भेटायला येत होते. शाळेतल्या मुलांचा एक जथा आत आला. सगळी मुलं एकसाथ त्यांच्यापुढं वाकली. आपण एक थोर व्यक्ती पहात असल्याचा भाव त्या बछड्यांच्या चेहऱ्यावर होता. गांधी त्यांच्याकडे पाहून हसले. त्यांनी त्यांना नमस्कार केला. शुभकामना व्यक्त करायची ही खास हिंदू पद्धत.

ती मुलं गेल्यावर गांधी मला म्हणाले, "त्यांच्यासाठी करण्यासारखं खूप काही आहे."

काही वेळाने एक भारतीय गृहस्थ आत आले. ते विधिमंडळात ख्रिश्चनांचं प्रतिनिधित्व करतात असं गांधींनी मला नंतर सांगितलं, गांधींनी त्यांचं केलेलं स्वागत पाहून मी भारावून गेलो.

"दोस्ता, मी तुझं अभिनंदन करतो." गांधी त्यांना म्हणाले; "पंडित मोतीलाल नेहरूंच्या निधनाच्या वेळी तू सिगरेट सोडलीस असं मला कळलं. आत्मशुद्धीचा तुझा हा प्रयत्न खरोखर अनुकरणीय आहे."

तो ख्रिश्चन राजकारणीही गांधींच्या बोलण्यानं एवढा भावनाविवश झाला की, आभाराचे शब्दही त्यांच्या तोंडून कसेबसेच बाहेर आले. अत्यंत नम्रपणे तो बाहेर गेला,

अंधार पडू लागल्याचं मला व्हरांड्यातून दिसत होतं. संध्याकाळच्या प्रार्थनासभेची वेळ झाल्याची ती सूचना होती.

"व्हाइसरॉयबरोबरच्या वाटाघाटीतून मला फार वेळ मिळत नाही हे खरं; पण तुमची इच्छा असेल तर उद्या आपण पुन्हा बसू. मी थोडा वेळ काढू शकेन." गांधी म्हणाले.

मी त्यांचे आभार मानले आणि प्रार्थनेसाठी त्यांच्या मागोमाग हिरवळीवर गेलो.

तिथे जवळजवळ पाचेकशे लोक जमले होते. भिन्न धर्मांचे आणि त्याहून भिन्न वेषांतले. गांधी तिथल्या एका छोट्या मंचावर चढले. त्यांपैकी अनेकजण दूरदूरच्या गावांतून पायपीट करत या महात्म्याचं दर्शन घ्यायला आले होते. अत्यंत नम्रपणे ते त्या धुळीत उभे होते. काहीजणांनी गांधींच्या पायांचं चुंबन घ्यायचा प्रयत्न केला; पण गांधींनी त्यांना बाजूला सारलं.

गांधी हात जोडून मंचावर उभे राहिले. आता मंडळी खाली बसली होती. देवदर्शनाचा आनंदच जणू त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

मिराबाईंनी भगवत् गीतेतली प्रार्थना म्हणायला सुरुवात केली. गांधी आणि जमलेल्या लोकांनी त्यांच्या सुरात सूर मिसळला.

ते सूर मला एखाद्या शोकगीतासारखे वाटले. हिंदूंच्या बहुतेक प्रार्थना आम्हा पाश्चात्यांना तशाच भासत. अर्थ समजला नाही तरी संस्कृत शब्दाचा तो लयबद्ध चढउतार मला भावला. त्यातलं काव्यात्म नादमाधुर्य माझ्या मनावर ठसलं. गीतेतलं तत्त्वज्ञानच आपल्या विचाराचा आणि जीवनाचा पाया आहे असं गांधी मला बोलताबोलता म्हणाले होते.

प्रार्थना अर्धा तास चालली.

मंडळी पांगू लागली. गांधींच्या त्या निकटदर्शनाने जणू ते सगळे धन्य झाले होते. गांधी जाताजाता त्यांच्याशी बोलत होते, हसत होते.

आपल्या खोलीकडे ते ताबडतोब गेले. त्यांच्यापाठोपाठ काँग्रेस वर्किंग कमिटीचे डझनभर सदस्य. काँग्रेसचे ते प्रति–मंत्रिमंडळच होतं.

बहुधा मध्यरात्रीपर्यंत आता ही बैठक चालणार होती. खोलीत जाताना गांधी हसतहसत तसं म्हणालेही.

दुसरा दिवस सोमवार. मध्यरात्रीच्या ठोक्याला गांधींचं मौन सुरू होणार होतं, आठवड्यातून एकदा ते असं मौन पाळत.

व्हाइसरिगल पॅलेसमधल्या गोल्डन हॉलमध्ये मंगळवारी लॉर्ड आयर्विनबरोबर पुन्हा चर्चा सुरू करण्याआधी गांधींना आपल्या सहकाऱ्यांशी अनेक प्रश्नांवर बोलायचं होतं, म्हणूनच त्यांची घाई चालली होती.

## ते सूर मला एखाद्या शोकगीतासारखे वाटले....

त्यांची ती पाठमोरी आकृती पहाताना मला आमच्या गप्पा आठवल्या. किती नखशिखान्त साधेपणा आणि अखंड वाहणारा मोकळेपणा. केवढं मोठं ओझं या लहानखुऱ्या फकिरानं सहजगत्या पेललं होतं !

¤

*पुढचे अकरा दिवस गांधी व्हाइसरॉयबरोबर सतत वाटाघाटी करत होते. अपवाद फक्त त्यांच्या मौनाच्या दिवसाचा.*

डॉ. अन्सारींचं घर जुन्या दिल्लीत होतं. तिथून व्हाइसरिगल पॅलेस चारेक मैलांवर असावा. गांधी हे अंतर रोज चालून जात. मुसळधार पाऊस असेल तरच त्यांच्या या नियमात फरक होई.

पंचा गुंडाळलेला आणि खांद्यावरून जुनीपुराणी शाल घेतलेला हा फकीर आपल्या लाकडी खडावा वाजवत व्हाइसरिगल पॅलेसच्या संगमरवरी पायऱ्या चढे तेव्हा ते दृश्य बघण्यासारखं असे. पॅलेसची राखण करणाऱ्या शिपायांची दगडी शिस्त आणि त्या शिस्तीला छेदणारा या महात्म्याचा अनौपचारिकपणा. विन्स्टन चर्चिलनी या दृश्याचं वर्णन 'भयंकर कंटाळवाणं' या शब्दात केलं असलं तरी मला हे दृश्य आवडत असे. गांधी अशा वेळी एखाद्या मुत्सद्यासारखे किंवा क्रांतिकारकासारखे अजिबात दिसत नसत.

वाटाघाटी अत्यंत गुंतागुंतीच्या झाल्या होत्या. अनेक मुद्द्यांवर सविस्तरपणे चर्चा होणं जरुरीचं होतं. भारतीयांच्या हाती सत्ता सोपवली जाईल त्या संक्रमणकाळातल्या अटी किंवा राष्ट्रीय कर्जाचा किती भाग ब्रिटिश उचलतील वगैरे भविष्यातले महत्त्वाचे प्रश्न यात होते. नव्या सरकारचे संस्थानांशी काय संबंध रहातील हे निश्चित करायला हवं होतं. हिंदू–मुस्लिम प्रश्न तर होताच. सात कोटी अस्पृश्यांच्या हक्कांविषयीही निर्णय घेणं भाग होतं. याशिवाय परदेशी मालावरचा बहिष्कार उठवण्याच्या अटी, दहा हजार भारतीयांची सरकारने जप्त केलेली मालमत्ता आणि पन्नास हजार सत्याग्रहींची सुटका वगैरे अनेक तत्कालीन प्रश्नही होते.

या सर्व प्रश्नांबद्दलची माहिती आणि आकडेवारी गांधींच्या डोक्यात तयारच असावी. वाटाघाटीसाठी जाताना ते फक्त एक छोटा लखोटा काखोटीला मारत. त्यात फारशी कागदपत्रं रहाणं शक्यच नव्हतं.

ते दिवस मोठे तणावाचे होते. वाटाघाटीत सतत चढउतार होत. त्या वेळची माझी दैनंदिन बातमीपत्रं या सगळ्या घटनांची साक्षीदार आहेत. त्यांच्याच आधारे आज मी हे सगळं लिहू शकतोय.

सोमवार, तेवीस फेब्रुवारी हा गांधींच्या मौनाचा दिवस असला तरी त्या दिवशीही काँग्रेस वर्किंग कमिटीची बैठक कित्येक तास चालली. गांधी मुख्यतः इतरांची मतं ऐकून घेत होते. काही सांगायचं असलं तर ते खुणेनं सांगत किंवा लिहून देत. त्या दिवशी ते व्हाइसरॉयला *अर्थातच भेटले नाहीत.*

मी मात्र बहुतेक सगळा दिवस सरकारी कार्यालयात घालवला. गांधींच्या मागण्यांबाबत लॉर्ड आयर्विनला असलेल्या अधिकारांची चाचपणी करण्याचा प्रयत्न केला. लॉर्डसाहेब सतत लंडनशी संपर्क ठेवून असल्याचं मला समजलं. अंतिम शिक्कामोर्तब तिथूनच होणार होतं.

बोरसाडला ब्रिटिशांच्या पोलिसांनी महिला सत्याग्रहींना अटकेपूर्वी क्रूर मारहाण केली होती. या अत्याचाराची चौकशी व्हावी असा गांधींचा आग्रह होता. लॉर्ड आयर्विनचा स्वभाव तसा दयाळू असावा. एका क्षणी तो अशा चौकशीला तयारही झाला होता; पण त्याला मदत करणाऱ्या गोऱ्या अधिकाऱ्यांनी ठामपणे विरोध केला म्हणून त्याला माघार घ्यावी लागली.

*संध्याकाळी मी गांधींच्या निवासस्थानी गेलो.* वर्किंग कमिटीतल्या काही जणांशी मला बोलायचं होतं. गांधी–आयर्विन बोलणी फिसकटली तर काय करायचं याचा विचार करण्यातच त्यांनी दिवस घालवल्याचं मला सांगितलं. कर न देण्याच्या भावी चळवळीची वर्किंग कमिटीने आखणी केली होती. त्या वेळी कलकत्त्याचं 'द स्टेटसमन' हे ब्रिटिशांचं महत्त्वाचं मुखपत्र होतं. त्यातून गांधींवर प्रखर हल्ला चढवण्यात आला होता. स्वातंत्र्याच्या चळवळीमुळं सरकारला कोट्यवधी रुपयांचा तोटा झाल्याचं आणि करवसुली घसरल्याचं या पत्रानं म्हटलं होत. ब्रिटिशांचं हे नुकसान वाचून गांधींचे सहकारी आनंदून गेले होते. त्यांना अधिकच उत्साह आल्याचं दिसत होतं.

पुढे आठवडाभर वाटाघाटी चालू होत्या. तडजोडीचा मसुदा तयार व्हायला वेळ का लागत होता हे शोधून काढणं माझ्यासारख्या वार्ताहराच्या दृष्टीनं अवघड झालं होतं. एक तर मला ज्या काही बातम्या मिळत होत्या त्या ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून. नेमका त्याचाच मला त्रास होत होता. ते खोटी माहिती देत अशातला प्रकार नाही; पण त्यांच्या सांगण्यात ब्रिटिशांच्या फायद्याच्या गोष्टीच अधिक असत. गांधींशी रोज थोडा वेळ माझ्या गप्पा होत; पण ते फारसं सांगत नसत. व्हाइसरॉयला दिलेलं वचन ते 'फारच काटेकोरपणे' पाळताहेत असं माझं मत होतं. तो अतिरेक मला आवडत नसे.

एक दिवस मी याबद्दल जवाहरलाल नेहरू, सरोजिनी नायडू आणि महादेवभाई देसाईंकडे तक्रार केली. 'तुम्हाला तुमची बाजू जगभरच्या वृत्तपत्रात यावी असं वाटत नाही का?' मी त्यांना टोमणा मारला.

याचा थोडा–फार परिणाम झाला असावा. त्यांनी त्याबद्दल गांधींबरोबर चर्चा केली आणि नंतर ते मला विश्वासात घेऊ लागले.

महादेवभाई देसाईंचा मला विशेष उपयोग होत असे. गांधींचा हा सेक्रेटरी हुशार आणि आनंदी वृत्तीचा होता. हा आपला 'आल्टर इगो' असल्याचं गांधींनी मला पहिल्याच मुलाखतीत सांगितलं होतं. गांधींच्या मनात काय चाललं आहे याचा देसाईंना नेमका पत्ता असे. अनेकदा ते वाटाघाटींनाही गांधींबरोबर जात. त्यामुळे तिथली ताजी माहिती त्यांच्याकडे मिळे.

देसाईंच्या विश्वास मी चांगलाच कमावला असावा. कारण तेव्हापासून ते अगदी लंडनमधल्या गोलमेज परिषदेपर्यंत देसाई मला खूप माहिती देत होते. अनेकदा त्यांनी माझ्या कामाचं कौतुकही केलं. मी भारतीय स्वातंत्र्यलढा चांगला समजून घेतल्यामुळही त्यांना आपुलकी होती.

सरोजिनी नायडूसुद्धा माझ्यावर खूष असत. वर्किंग कमिटीतल्या त्या एकमेव महिला सदस्य होत्या. १९१४ साली त्या लंडनमध्ये महात्मा गांधींना पहिल्यांदा भेटल्या. कवयित्री म्हणून तेव्हाही त्या प्रसिद्ध होत्या. गांधींशी त्यांचं लवकरच मैत्रीचं नातं निर्माण झालं

आणि अनेक वर्षांच्या सहवासानं ते वाढत गेलं. त्यांच्यात आणि गांधीत एक विरोधाभास होता. कदाचित त्यामुळं ते एकमेकांच्या अधिक जवळ आले असतील. गांधी दारिद्र्यात रहात, तर नायडूंना आयुष्याचा उपभोग घ्यायला आवडे. त्या श्रीमंत होत्या. फॅशन्स करण्याची त्यांना हौस होती. रंगीबेरंगी, नक्षीकाम केलेल्या साड्या आणि त्यावर घातलेले दागिने हा त्यांचा रोजचा पोशाख.

गांधी रेल्वेच्या तिसऱ्या वर्गातून प्रवास करत. आश्रमात किंवा एखाद्या शेतकऱ्याच्या झोपडीत ते रहात; पण सरोजिनी नायडूंनी असली रहाणी कधीच पसंत केली नाही. त्या पहिल्या वर्गातून प्रवास करत, चांगल्या हॉटेलात रहात. चांगलेचुंगले पदार्थ खायलाही त्यांना आवडत. हा डौल त्या मुद्दाम करत असं मात्र नाही. निसर्गतःच त्या तशा होत्या.

आमची मैत्री जमायला वेळ लागला नाही. त्यांचा सहवास मला आवडू लागला. त्यांची विनोदबुद्धी, हजरजबाबीपणा, रोखठोकपणा सारं आनंद देणारं होतं. गांधींबद्दल त्यांना प्रेम होतं. त्यांच्याविषयी त्या कौतुकानं बोलत आणि प्रामाणिकपणे त्यांच्या मागून जाण्याचा प्रयत्न करत; पण त्यांच्या अतिरेकी कल्पनांबद्दल त्या कित्येकदा त्यांना चिडवत. हे चिडवणंही निरागस होतं. त्यांच्या शेऱ्याताशेऱ्यात आकस तिळमात्र नसे.

गांधींच्या पहिल्या भेटीबद्दल बोलायला सरोजिनी नायडूंना मनापासून आवडे. तो प्रसंग त्या अनेकदा सांगत–

युद्धाचा काळ. गांधी लंडनमध्ये होते. दक्षिण आफ्रिकेतल्या चळवळीमुळे त्या वेळीही त्यांना भरपूर प्रसिद्धी मिळाली होती. ब्लूम्सबरीतल्या एका जुनाट घरात ते रहात.

नायडू त्या घरी पोचल्या तेव्हा गांधी जेवत होते. एक जुनाट अंथरूण त्यांनी जमिनीवर पसरलं होतं आणि त्यावरच बशा–भांडी ठेवली होती.

'तुम्ही माझ्याबरोबर जेवणार का?' गांधींनी विचारलं.

नायडूंनी त्या भांड्यांकडे, त्या अन्नाकडे एकदा नजर टाकली आणि त्या पटकन् म्हणाल्या, 'अजिबात नाही!'

त्या गांधींना कित्येकदा सांगत की, त्यांनी पहिल्या वर्गातून प्रवास करावा. तिथे त्यांना काम करता येईल, निदान विश्रांती तरी मिळेल. सूतकताईचं महत्त्व त्यांना कळत होतं; पण गांधींचा त्या कामात बराच वेळ फुकट जातो असं त्यांना वाटे. कित्येकदा त्या विनोदानं म्हणत, 'या जगावेगळ्या म्हाताऱ्याला दारिद्र्यात ठेवणं किती महागात पडतं हे तुम्हाला नाही कळायचं!'

सरोजिनी नायडूंचं नेतृत्व मात्र धडाडीचं होतं. भारावून टाकणारं वक्तृत्व त्यांच्याकडे होतं. ब्रिटिश अधिकाऱ्यांशी किंवा मुस्लिम नेत्यांशी त्या मुत्सद्दीपणे बोलत. अनेकदा अशा वाटाघाटींसाठी गांधी त्यांनाच पाठवत. मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी अटक झाल्यावर वारसदार म्हणून गांधींनी नायडूंचीच नेमणूक केली होती. धारासण्याच्या सत्याग्रहाचं नेतृत्व नायडूंनी केलं ते त्याच अधिकारात. या सत्याग्रहाच्या वेळी पोलिसांनी केलेल्या लाठीमारात शेकडो सत्याग्रही बेशुद्ध पडले. सहाजण ठार झाले. स्वतः नायडूंना अटक झाली!

भारतात आणि नंतर लंडनमध्ये गोलमेज परिषदेच्या वेळी आम्हाला एकमेकांना व्यवस्थित पहाता आलं. काँग्रेसच्या पुढच्या



**गांधी आणि सरोजिनीबाई नायडू.**
**या दोघांची पहिली भेट फार मजेशीर झाली.**

¤

योजना मला नायडूंकडून समजत. मला त्या उत्तरअमेरिकेतल्या एखाद्या स्त्रीसारख्या वाटत. धारदार नाक, गालाचे उंचवटे आणि विलक्षण बोलके डोळे! कधी ते खटघाळ तर कधी हसरे वाटत. कधी त्यात एक उदास झाक दिसे. त्या स्वातंत्र्यलढ्याशी पूर्णतः समरस झाल्या होत्या; पण कधीकधी त्यांना विश्रांतीची गरज भासे. अशा वेळी त्या मला बोलावत. एकदा तुरुंगातून बाहेर आल्यावर त्यांनी मला बोलावलं आणि म्हणाल्या, 'आज आपण जगातल्या सगळ्या अडचणी, दुःख विसरून जाऊ या. मी तुला एका हिंदू लग्नाला नेणार आहे. तुला मजा वाटेल तिथे.'

विशेष म्हणजे त्या दिवसात त्या कसल्या तरी वाटाघाटीत गुंतल्या होत्या!

गांधींनी माझ्याशी मोकळेपणानं बोला असं सांगितल्यानं नेहरूंनाही अगदी सुटल्यासारखं झालं होतं. गांधी–आर्यावन वाटाघाटी ज्या तऱ्हेने चालल्या होत्या त्या पद्धतीवर ते नाराज होते. गांधीजी फारच तडजोडी करताहेत असं त्यांना वाटत होतं; पण त्यांच्याशी बोलताना मला सगळ्यात जाणवला तो त्यांचा स्वतःशीच चाललेला झगडा. त्यामुळं ते व्यथित होते. गांधींच्या काही गोष्टी त्यांना पटत नव्हत्या; पण त्यांची आपल्या नेत्यावर निष्ठाही होती. स्वातंत्र्यलढ्याला आकार देऊ शकतील असे गांधी एकटेच आहेत हेही त्यांना माहीत होतं; पण त्यांची 'फॅड' नेहरूंना अस्वस्थ करत.

एकेचाळीस वर्षांचे नेहरू त्याहून किती तरी तरुण दिसत. लहान मुलासारखे त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव आणि रुबाबदार व्यक्तिमत्त्व. एक तारुण्यसुलभ अधीरता त्यांच्या वागण्यात होती. ब्रिटिशांच्या दडपशाहीबद्दल ते कडवटपणे बोलत. भारतीयांबद्दल त्यांना एक चीड

होती. इतके दिवस लोक हे सगळं कसं सहन करू शकले हा त्यांना प्रश्न पडे. स्वातंत्र्यचळवळीत सहभागी न होणाऱ्या भारतीय व्यापाऱ्यांबद्दल, उद्योगपतीबद्दल तर ते संतापानं बोलत

नेहरूंच्या नव्या विचारांनी, त्यांच्या रुबाबदार व्यक्तिमत्त्वानं मी प्रभावित झालो होतो गांधींनी तर या तरुणाला भावी वारसदार ठरवलं होतं.

□

पंचवीस फेब्रुवारीला गांधींना कॉंग्रेस वर्किंग कमिटीतल्या असंतोषाची जाणीव झाली. नेहरूंचा गट गांधींवर नाराज होता. व्हाइसरॉयबरोबरच्या वाटाघाटीत ते फारच मागे येताहेत असं या गटाचं मत होतं.

संध्याकाळी उशीरा गांधींनी वर्किंग कमिटीची बैठक बोलावली. आपण ज्या काही अटी वाटाघाटीच्या अखेरीस ठरवू त्या सगळ्या कमिटीला बंधनकारक रहातील असं त्यांनी सर्वांकडून मान्य करवून घेतलं.

'दुसरं आम्ही काय करू शकत होतो?' नेहरू नंतर मला म्हणाले, 'शेवटी आम्हाला गांधींबरोबर रहायचं होतं. शंका काढून काय साध्य होणार होतं? आम्ही त्यांचं नेतृत्व झुगारून देऊ शकलो असतो; पण त्यामुळं सगळी चळवळच कोलमडून पडली असती.'

बोलताना नेहरू खूपच त्रासलेले होते. आतल्या आत चाललेला त्यांचा झगडा अधिक तीव्र झाला होता.

पण सहकाऱ्यांच्या या ठाम भूमिकेमुळं गांधींचा उत्साह मात्र वाढला. कधी नव्हे ते मागण्याबाबत आग्रही झाले. नंतर त्यांच्याशी बोलताना हे सतत जाणवत होतं.

हे अधिक स्पष्ट झालं तीन दिवसांनी. अट्ठावीस फेब्रुवारीला. 'भारतात शांततेची शक्यता नाही' अशी त्या दिवशीच्या माझ्या तारेची सुरुवात होती.

त्या दिवशी संध्याकाळी लॉर्ड आयर्विननं लंडनशी चर्चा करून बनवलेला शांततेचा मसुदा गांधींना दिला होता. त्यावर त्यांची चार तास चर्चाही झाली.

हा मसुदा कॉंग्रेस वर्किंग कमिटीनं फेटाळून लावायचं ठरवलं होतं. कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून सभेची सूत्रं नेहरूंकडे होती. बैठकीवर प्रभुत्व मात्र गांधींचच होतं.

प्रार्थनेनंतर मी गांधींबरोबर गप्पा मारायला बसलो. वाटाघाटी मोडल्याची बातमी फुटू न देण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला; पण त्यांनाही ते शक्य झालं नाही. नकळत ते यासंबंधी बोलले. पालुपद मात्र पूर्वीचंच—'मी वचन मोडू शकत नाही. उद्या यासंबंधी तुम्हाला सारं काही सांगिन.' वगैरे.

त्यांच्या या सुरावरून मी अंदाज बांधला. बोलण्यासंबंधी ते अजूनही आशावादी आहेत का एवढंच त्यांना विचारलं आणि त्या उत्तरातच त्यांनी माझ्या बातमीला पुष्टी दिली.

'वाटाघाटी मोडल्या तरी भविष्याविषयी मी आशावादीच असेन!' ते हसत म्हणाले. त्या दिवशी ते नेहमीप्रमाणे सूत कातत नव्हते.

वाटाघाटी मोडल्याचं नंतर मला गांधींच्या काही सहकाऱ्यांनी स्पष्टपणे सांगितलं. व्हाइसरॉयच्या मसुद्यानं निम्म्या मागण्याही पूर्ण होत नव्हत्या असं ते म्हणाले.

स्वराज्याचा मार्ग खूप लांबवरचा असेल, आणखी बरीच वर्षं झगडावं लागेल हेही यावरून स्पष्ट झालं होतं. पूर्ण स्वराज्याचं कॉंग्रेसचं ध्येय मान्य करायचीही व्हाइसरॉयची तयारी नव्हती. गोलमेज परिषदेत गांधी हा विषय काढू शकतील असं त्यानं त्यांना सांगितलं होतं; पण गांधी काही दुधखुळे नव्हते. लंडनचे सत्ताधीश ही गोष्ट कदापि मान्य करणार नाहीत हे ते व्हाइसरायप्रमाणेच ओळखून होते. स्वातंत्र्य लढूनच मिळवावं लागणार याबद्दल ते निश्चित होते.

दोन्ही बाजूना शक्तिपाताची भीती वाटणं स्वाभाविकच होतं. एक मार्चला व्हाइसरिगल पॅलेसमध्ये वेगानं घटना घडत होत्या. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत गांधींनी आयर्विनबरोबर चर्चा केली. ते प्रार्थनेसाठी गेल्यावर व्हाइसरायनं ताबडतोब आपल्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली. रात्री नऊ वाजता गांधी परत येईपर्यंत ती चालू होती. गांधींबरोबर चर्चा करण्यात आयर्विनला जेवढ्या अडचणी येत तेवढ्याच त्या नोकरशहांशी चाललेल्या सल्लामसलतीत येत. राष्ट्रवाद्यांना कसल्याही सवलती देण्याविरुद्ध हे गोरे अधिकारी होते. त्यांना गांधींना पुन्हा तुरुंगात टाकायचं होतं. सहाजिकच त्या संध्याकाळी मी पाठवलेलं बातमीपत्र या मंडळींना आवडलं नाही. ते बातमीपत्र सरकारी कात्रीत सापडलं. पॅरिस किंवा शिकागोपर्यंत ते पोचूच शकलं नाही.

त्या दिवशी मध्यरात्रीच्या सुमाराला मी व्हाइसरिगल पॅलेसवर गेलो, तडजोडीच्या मसुद्याबद्दल काही तरी बातमी मिळेल या अपेक्षेने.

मध्यरात्रीच्या ठोक्यानंतर काही वेळानं गांधी उठले. त्याही वेळी त्यांनी गाडीनं जायचं नाकारलं. त्यांच्याबरोबर मी काही अंतर चालत गेलो. त्यांचा तो कणखरपणा, चिकाटी पाहून मी पुन्हा एकदा चकित झालो होतो. दिवसभरच्या अविश्रांत मेहनतीनंतरही ते उत्साही होते. बोलण्याबद्दल त्यांनी मला काहीही सांगितलं नाही, तरी त्यांच्या बोलण्यातून व्यक्त झालेला आशावाद पुरेसा बोलका होता.

ते फार घाईत होते. दुसऱ्या दिवशी त्यांचं मौन होतं आणि त्यापूर्वी त्यांना वर्किंग कमिटीतल्या लोकांशी बोलायचं होतं. अखेर वेळ वाचवण्यासाठी ते काहीशा नाराजीनेच सोबतच्या गाडीत बसले.

रात्री दोन वाजेपर्यंत वर्किंग कमिटीची बैठक चालू होती. तिथे अर्थात माझ्यासारख्यांना प्रवेश नव्हता. या बैठका नेहमीच गुप्त असत. तिथे सर्वांना मुक्त प्रवेश असावा असं कॉंग्रेसमधल्याच काहीजणांचं म्हणणं होतं; 'पण या अतिलोकशाहीवाद्यांचं' ऐकलं असतं तर वर्किंग कमिटीतली प्रत्येक हालचाल ब्रिटिशांना कळली असती असं मला नंतर नेहरूंनी सांगितलं. पत्रकारांमध्ये त्या वेळी काही ब्रिटिशांचे खबरे होते, त्यांच्यावर नेहरूंचा रोख होता.

अजून गांधींना रोजचा सूतकताईचा नियम पूर्ण करायचा होता. एवढ्या रात्रीसुद्धा ते झोपायला न जाता तासभर सूत कातत बसले.

मी थोडा वेळ त्यांच्याबरोबर बसलो; पण नंतर मला झोप येऊ लागली. अजून मला माझं बातमीपत्र लिहायचं होतं. शिकागो-दिल्लीच्या वेळेमध्ये अकरा-बारा तासांचं अंतर होतं. त्यामुळं तार पहाटेपर्यंत केली तरी चालणार होतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी मला महादेवभाईंनी सांगितलं की, सूत कातल्यावर गांधी फक्त तासभरच झोपले आणि ताबडतोब प्रार्थने-

साठी उठले होते. अशा माणसाला आमच्यासारख्यांनी हुडकुळा, वृद्ध म्हणणं साफ चुकीचं होतं. रोजचा त्याचा व्यायाम, नियमित आणि मोजका आहार, शिस्त यामुळं ते एखाद्या धावपटूइतके निरोगी होते. एकसष्ट वर्षांच्या तरुणाचा हा कणखरपणा मी रोजघडीला अनुभवत होतो.

मंगळवारी, तीन मार्चला, वाटाघाटींचं सत्र मध्यरात्रीपर्यंत चाललं. बाहेर पाऊस नुसता कोसळत होता; पण गांधींचा प्रार्थनेचा दिनक्रम काही चुकला नाही. प्रार्थनेसाठी जाऊन रात्री नऊ वाजता ते पॅलेसवर परतले.

या वाटाघाटींमधून गांधींची आणखी एक बाजू स्पष्ट होत होती. त्यांच्या सहकाऱ्यांना, माझ्यासारख्या पत्रकारांनाच नव्हे तर व्हाइसरॉयला आणि त्याच्या अधिकाऱ्यांनाही हे जाणवलं होतं. सगळे तपशील, पुढची गणितं गांधींच्या डोक्यात आधीच तयार असत. गोरे अधिकारी फायलींचे ढीग उपसत. दिवसातून चार-चारदा व्हाइसरॉय गृहखात्याचा सचिव, पोलिसप्रमुख यांच्याशी खलबतं करे. अर्थसचिवही त्याच्या दिमतीला होता. गांधी मात्र कुणाचीही मदत घेत नसत.

असहकार–चळवळीत भाग घेतलेल्या ज्या सत्याग्रहींची मालमत्ता सरकारनं जप्त केली ती परत करावी आणि दंड माफ करावा अशी गांधींची पहिली मागणी होती; पण सरकारनं या मालमत्तेचा अगोदरच लिलाव केल्याचं सांगितलं, तेव्हा त्याची भरपाई देण्याची मागणी गांधींनी केली.

मिठावरच्या कराबाबत तर ते अर्थसचिव जॉर्ज शुस्टरशी दोन तास चर्चा करत होते. कर रद्द करायला सरकारनं नकार दिला तरी किनाऱ्यावरच्या लोकांना मीठ बनवण्याची आणि विकण्याची परवानगी द्यायला ते तयार झाले.

इतर मुद्द्यांबाबत दुसऱ्या दिवशी चर्चा करायचं ठरलं. मालमत्तेची भरपाई द्यायला आणि दंड माफ करायला सरकारनं मान्यता दर्शवली असा त्या दिवशी गांधींचा ग्रह झाला होता. सहाजिकच दुसऱ्या दिवशी बुधवारी, बोलणी संपतील असं त्यांनी परतताना मला सांगितलं.

पण मधेच एक अडथळा उद्भवला. बुधवारी संध्याकाळी सात वाजेपर्यंत काहीही तडजोड होऊ शकली नाही. आदल्या दिवशी 'मान्य' झालेल्या मुद्द्याचाच मसुदा तयार होत नव्हता. मुंबईच्या गव्हर्नरनं जप्त मालमत्तेचा लिलाव करताना ती परत घेतली जाणार नाही असं आश्वासन खरेदीदारांना दिलं होतं. त्यामुळं लॉर्ड आयर्विनची परिस्थिती मोठी अडचणीची झाली होती. गांधी तर तसूभरही मागं हटायला तयार नव्हते.

सात वाजता ते प्रार्थनेसाठी परतले. वर्किंग कमिटीच्या सदस्यांना त्यांनी बोलावून घेतलं.

रात्री दहा वाजता कमिटीनं व्हाइसरायला निर्वाणीचं पत्र पाठवलं –या दोन मुद्द्यांवर यापुढं तडजोड होऊ शकणार नाही ! जे काही उत्तर असेल ते लेखी द्यायला त्यांनी लॉर्ड आयर्विनला पत्रातून सांगितलं होतं. तो काँग्रेसच्या अटी मान्य करायला तयार झाला नाही तर वाटाघाटी फिसकटणार हे स्पष्ट होतं.

एक निराशेचं वातावरण वर्किंग कमिटीच्या या बैठकीनंतर अन्सारींच्या घराभोवती तयार झालं. गांधी मात्र नेहमीसारखे हसतमुख होते. बैठक संपवून बाहेर येताना ते माझ्याशी चार शब्द बोलायला थांबलेसुद्धा.

'अजून काहीही तडजोड झालेली नाही. रात्रीपर्यंत होईल अशीही शक्यता नाही.' माझ्या खांद्यावर त्यांनी थोपटलं आणि हसत म्हणाले, 'तेव्हा मि. शिरर, तुम्ही घरी जाऊ शकता. तुम्हाला थोडी झोप तरी मिळेल. उद्या सकाळपर्यंत तरी व्हाइसरॉयला भेटायचा माझा विचार नाही !'

मी हॉटेलात परतलो. बातमीपत्र लिहायला बसणार तो शिकागोहून आलेली तार मला दिसली. त्या तारेनं माझं अवसानच गळलं. माझ्याआधीच असोसिएटेड प्रेसनं 'स्कूप' दिलं होतं. गांधी-आयर्विन करार झाल्याचं आणि भारतात शांतता प्रस्थापित झाल्याचं त्यांच्या बातमीत म्हटलं होतं.

वृत्तपत्रव्यवसायातल्या इतर अनेक 'स्कूप्स'प्रमाणे ही बातमीही खरी नव्हती. चोवीस तास आधी अशा तऱ्हेनं बातमी देणं मला अप्रगल्भतेचं लक्षण वाटत होतं; पण असोसिएटेड प्रेसनं ती चांगलीच रंगवली होती. सहाजिकच अमेरिकेतल्या सर्व वृत्तपत्रांचा तो त्या दिवशीचा मथळा झाला

मला मात्र शिकागोतल्या माझ्या संपादकाकडून ओरडा खावा लागला ते मला लागलं खरं; पण आता त्याचा काय उपयोग होता?

दुसऱ्या दिवशी सकाळी व्हाइसरिगल पॅलेसमध्ये गांधी आणि लॉर्ड आयर्विननं तडजोडीच्या मसुद्यावर सह्या केल्या. जवळजवळ महिनाभर चाललेल्या वाटाघाटींची ही परिणती होती.

ही निश्चितच महत्त्वाची घटना होती; पण माझ्या दृष्टीनं तिचं महत्त्व काय? मी स्वत:लाच विचारत होतो. 'शिकागो ट्रिब्यून'नं त्या दिवशी मी दिल्लीहून पाठवलेलं महत्त्वाचं बातमीपत्र प्रसिद्ध केलं नाही. त्यांनीही आदल्या दिवशी असोसिएटेड प्रेसची 'बातमी' छापली होती.

माझं अक्षरश: गर्वहरण झालं होतं. ती जखम विसरायला मला बराच त्रास पडला. शेवटी तडजोडीचा मसुदा महत्त्वाचा ठरला होता. त्याचं ऐतिहासिक महत्त्व जोखायचे माझे प्रयत्न, 'शिकागो ट्रिब्यून'च्या दृष्टीनं तरी वायाच गेले होते ! (क्रमश:)

---

**प्रार्थनेच्या आधी गांधींनी डझनभर पत्रकारांना बोलावलं. पत्रकार परिषद बराच वेळ चालली होती.**

**गांधी मोठ्या जबाबदारीतून सुटल्यासारखे दिसत होते. शांतता स्थापन होणार म्हणून त्यांना आनंदही झाला होता.**

**'मी शांतताप्रिय माणूस आहे.' त्यांनी बोलायला सुरुवात केली.**

**'शांतता? पण कोणतीही किंमत देऊन?' आमच्यापैकी एकाने विचारले.**

**'फक्त शांतताच नाही तर स्वराज्यसुद्धा. कराराचं भवितव्य त्यावरच अवलंबून आहे.' ते म्हणाले.**

**'पण तसं तुमच्या करारात कुठेच दिसत नाही...' मी त्यांना टोकलं.**

## महात्मा आणि माणूस

**लेखांक तिसरा । पुढील अंकी**

# करार झाला, पण....

## पुस्तके

# परिभ्रमण
## माणसांच्या शोधातले

वि. ग. कानिटकर

लहान मुलाच्या कुतूहलाने आयुष्याकडे पहाणाऱ्या सर्व भारतीय सुशिक्षितांच्या मनात एक स्वप्न असते. एकदा तरी इंग्लंडला वा अमेरिकेला जाण्याचं. अपवाद–विनोबा किंवा तत्सम संत. असं हे उरापोटाशी जपलेलं स्वप्न अनपेक्षितपणे खरं झालंच, तर त्याचा आनंद त्या माणसाला लपवता येत नाही आणि आनंद लपवायचा तरी कशाला म्हणा! अशा फॉरिन रिटर्नड् माणसाविषयीचं कुतूहल, आज जंबोजेटच्या पोटातून हजारोंनी माणसं प्रतिदिनी परदेशी जात असल्याच्या या काळात, इतरांच्या लेखी फारसे उरलेले नाही, असा जर कुणाचा समज असेल तर ते तितकेसे खरे नाही. कारण सगळ्याच स्वप्नांची ही मजा आहे की, एक स्वप्न हुबेहुब दुसऱ्या स्वप्नासारखे कधीही नसते. म्हणून अनेकांना आपण पाहिलेले अद्भुत जग इतरांना आवर्जून वर्णन करावेसे वाटते. प्रवासवर्णनांना खंड पडत नाही. उदंड वाचकही अजून लाभतो. प्रस्तुत पुस्तकाचे लेखक वा. वा. गोखले हे इतरांना जगप्रवासाचा एक झंझावाती दौरा घडवावा या इच्छेनेच प्रवासवर्णनाकडे वळलेले आहेत.

श्री. वा. वा. गोखले हे नाव मी संगीतावर वा संगीतकारांवर लिहिणाऱ्या मंडळीशी केव्हा तरी निगडित करून टाकलेले होते. यामुळे 'जगप्रवास–शोध आणि बोध' हे पुस्तक हाती घेतले तेव्हा या पुस्तकाचे लेखक हे 'तेच' गोखले, असा संशयही मनात आला नाही; परंतु पुस्तक वाचताना, श्री. गोखले यांनी परदेशातील पेटीवादनाच्या कार्यक्रमाचा उल्लेख केला, तेव्हा उलगडा झाला की तेच हे गोखले!

सतत तीस–पसतीस वर्षे लेखकाने उत्तम व्यवसाय केला. 'विलायतला जायचं काय झालं?' या प्रश्नाने सतत डिवचलेले, मरगळलेले मन सांभाळीत, आयुष्याची संध्याकाळ गाठली आणि मग त्याने काय केले?

'मला एखादी गोष्ट मनापासून व्हावी–करावी–असं वाटतं तेव्हा चारचौघांना सांगत सुटतो–मी अमुक अमुक करणार! एकदा अशी आवई उठली की मग मनात आलं तरी माघार घेता येत नाही. मित्र भेटले की विचारीत, कधी निघणार? मित्रांच्या चौकशांच्या रेट्यापुढे माझ्या निर्धारापासून माघार घेणं आता नामुष्कीचं होईल, म्हणून मी प्रवासाच्या तयारीला लागलो आणि एका झटक्यात पासपोर्ट मिळवला!'

या आणि अशा खेळकर शब्दातील प्राथमिक निवेदन वाचकाला झपाटीत नेते. साधारणपणे परदेशात जायचं म्हणजे एक तर यात्रा कंपनीतून किंवा आपला कुणी आप्त किंवा मित्र परदेशात स्थायिक असेल तर त्याच्या आधाराने. इथेही श्री. गोखले यांचे वेगळेपण आहेच–

"लंडनमध्ये स्थायिक झालेल्या काही मराठी मंडळींचे पत्ते मी मिळवले. त्यापैकी एका वसंत हरी जोशी नावाच्या गृहस्थाला मी दडपून पत्र लिहिले. ओळखपाळख नसताना मी त्याला हवं असलेलं स्पॉनसॉरशिप पत्र पाठवण्याची आर्जवपूर्वक विनंती केली. माझा आर्थिक बोजा त्यांच्यावर पडणार नाही याची ग्वाही दिली आणि काय आश्चर्य, त्यांचे तातडीचे पत्र आले. 'निघण्यापूर्वी वेळ व दिवस कळवावा म्हणजे विमानतळावर घेण्यास येतो.'"

आणि प्रत्यक्ष लंडनला गेल्यावर ह्या पूर्वीची ओळखपाळख नसलेला वसंत जोशी, त्याची पत्नी वंदना, सात वर्षांचा आशिश, चार वर्षांची नीती पाहुण्यावर प्रेमाचा असा वर्षाव करतात की, ज्या दिवशी त्याचे घर सोडून लंडनला इतरत्र जाण्याचा दिवस उगवतो तेव्हा लेखक सांगतो– 'आज आपण हे घर सोडणार म्हणून मी विलक्षण अस्वस्थ होतो. दुपारी मी एकटाच घरी होतो आणि मघापर्यंत दाबून ठेवलेले कढ माझ्या डोळ्यांतून ओसंडू लागले. मी लहान मुलासारखा रडू लागलो. संध्याकाळी जोशी आले–'मी हे घर सोडून इतरत्र जाणार नाही. लंडन सोडीन ते इथूनच!' असं कसंबसं सांगून मी डोळे पुसले. जोशींनी फोन करून 'मी फक्त जेवायला येईन' असे कळवल्यावर मी दोन्ही मुलांना पोटाशी धरून त्यांचे पापे घेतले!"

परदेशात स्थायिक झालेल्यांचे गुदमरवून टाकणारे अगत्य अनुभवाला आले आणि या माणसांच्या या प्रेमाची परतफेड कधी करणार हा विचार मनात आला की, श्री. गोखले यांची जी अवस्था झाली तीच अनेकांची होते. एरवी प्रेक्षणीय स्थळे आणि बाजारपेठा यांच्या वर्णनात अशा पुस्तकांतून अडगळीत जाणारा हा अनुभव श्री. गोखले यांनी शब्दबद्ध केला आहे. या पुस्तकातील अशी भावनिक स्थळे हे या प्रवासवर्णनाचे वैशिष्टय आहे.

या प्रवासवर्णनातील सर्व स्थळे ही मला परिचित होती. श्री. गोखले यांचे पुस्तक वाचताना, त्यांचे बोट धरून मी पुनः एकदा माझ्या प्रवासाच्या सुखद स्मृती अनुभवल्या.

या जगप्रवासात लेखकाने ज्या ज्या व्यक्तींकडे वास्तव्य केले त्या सर्वच व्यक्तींची शब्दचित्रं उत्तम उभी केली आहेत. वॉशिंग्टनचे डॉ. जोगळेकर कुटुंब, सान अँटोनियाचे डॉ. नांदापूरकर, सानफ्रान्सिस्कोचे मनोहर आपटे, त्यांच्याकडे काम करणारी ख्रिस्तिना, शिकागोचे डॉ. गोडबोले आणि त्यांची अमेरिकन पत्नी, डॉ. पिनाकिनी शिवदे, ओकविलाचे विजय देशपांडे–त्यांची पत्नी व्हिटा, कन्या टेरा, नायगाराच्या डॉ. सुधा उपाध्ये, न्यूयॉर्कचे राजू कुळकर्णी आणि पत्नी माधुरी ही सर्व प्रवासाला केवळ सहाय्यभूत झालेली माणसे म्हणून लेखक त्यांच्याकडे पहात नाही, हे या लेखनाचे आणखी एक वैशिष्टय आहे.

मात्र प्रत्यक्षात इंग्लिश वा अमेरिकन माणूस लेखकाला खऱ्या अर्थाने भेटू शकलेला नाही; पण यात नवल नाही. 'एक्सपेरिमेंट इन इंटरनॅशनल लिव्हिंग' सारख्या योजनेत सहभागी होण्याचे भाग्य ज्याला लाभले असे प्रा. प्रभाकर ताम्हणे यांच्यासारखे लेखक थोडे. त्यांनी आपल्या 'हिमफुलांच्या देशात' या प्रवासवर्णनात विविध क्षेत्रांतील अमेरिकन माणसांचे यथार्थ दर्शन घडवलेले आहे. श्री. गोखले यांना इतक्या थोडचा वास्तव्यात इंग्लिश वा अमेरिकन माणसांशी जास्त संपर्क साधणे

शक्यच नव्हते. आणि कितीही इच्छा असली–वेळही असला तरी इंग्लिश व अमेरिकन माणसाचा स्वभाव व जीवनपद्धतीच अशी आहे की, ती 'अघळपघळ' भारतीयांना समजून घेऊ शकत नाही.

श्री. गोखले यानी दोन वेगवेगळ्या प्रवासांचे अनुभव यात सांगितले आहेत; परंतु इंग्लंड–अमेरिकेचा प्रवास ११४ पृष्ठांत सांगितल्यावर केवळ सात पृष्ठांत त्यानी पूर्वेकडचा प्रवास संपवला आहे. यामुळे हा भाग परिशिष्ट जोडल्यासारखा वाटतो.

उपसंहारात 'शोध आणि बोध' म्हणून लेखकाने जी २०–२२ पृष्ठे दिली आहेत ती परदेशी प्रवासाला नव्याने जाऊ इच्छिणाऱ्यांना निश्चित मार्गदर्शक होतील.

पुस्तकाच्या प्रस्तावनेतच श्री. गोखले सांगतात की, 'माणसाच्या शोधात' मी हे परिभ्रमण केले. हे पुस्तक वाचायला घेतल्यानंतर वाचकाला ते अखेरपर्यंत खुलवते याचे रहस्य यातच आहे की, या प्रवाश्याला माणसात रस आहे. देखण्या इमारती आणि पाश्चात्याच्या प्रगतीचे चित्रण तो अनुषगाने करतो. ⁂

जगप्रवास : शोध आणि बोध
लेखक : वा. वा. गोखले
प्रकाशक : प्रपंच प्रकाशन, पुणे
मूल्य : रुपये वीस.

---

# मृगजळातील नौका

श्रीमती सुशीला गोखले पटेल यानी ललितलेखनात केलेला हा पहिलाच प्रयत्न आहे आणि तोही साहित्यिक प्रेरणेपेक्षा सामाजिक, राजकीय प्रेरणेमधून केलेला आहे. स्वत: बघितलेलं, सोसलेलं, भोगलेलं वस्तुस्थितीचा विपर्यास न करता इथे माडायचा हा प्रयत्न आहे.

कादंबरीची नायिका शैला एका समविचारी (वाटलेल्या) गुजराती तरुणाच्या प्रेमात पडते. त्याचा भूतकाळ हा काही विशेष चागला नसतो आणि हितचिंतकानी त्याची तिला कल्पनाही दिलेली असते. परंतु ती आपला हट्ट न सोडता त्याच्याशीच लग्न करते. ती प्रथमच सासरी जाते तेव्हाच तिला रश्मीच्या काही *अवगुणांची ओळख नव्या*नेच होते. रश्मीच्या एका जुन्या मित्राकडे ते दोघं जेवायला जातात. इकडचं–तिकडचं बोलणं होतं. या दोघांच्या लग्नाचा विषयही चर्चेला असतोच. कावळा पक्वान्न घेऊन गेला असा शेरा जसवन्तलाल देतो. म्हणजे रश्मीसारख्याला इतकी चांगली बायको कशी मिळाली ? हा सूर. हाच सूर घरीदारी सगळीकडे असतो. त्यामुळं तिला असं वाटू लागतं की, लोक आपल्याकडे सहानुभूतीच्या नजरेनं बघतात तिला रश्मीविषयी सशय वाटू लागतो आणि ती अस्वस्थ होते.

अर्थातच थोड्याच दिवसात दोघाचे जीवनमार्ग विरुद्ध दिशेने जायला लागतात. तो पैशासाठी संस्कृती, नीति–मूल्ये, स्वत.ची माणसं सगळ्यांचीच तिलाजली देतो. पैशामागे लागणारी व्यसनंही आलीच. आपली म्हणवणारी माणसं, समाज, इतकंच नाही तर स्वत:ची मुलंसुद्धा या रुपेरी मृगजळामागे धावतात. काहीजण अजाणतेपणी तर काही जाणतेपणी आणि सर्वच पातळ्यांवर आपण पराजित होत आहोत या जाणिवेनं शैला खचत जाते.

परंतु सत्ता आणि संपत्ती यांच्यामागं लागणाऱ्या लोकांच्या गटाप्रमाणे सनातन मूल्यांना जपणाराही एक गट कादंबरीत आहे त्याचा आधार घेऊन लाचार जगणं, कायमचं दुसऱ्यासाठी झिजणं आणि पराभूत जाणिवेनं पोखरलं जाणं याचा शैला त्याग करते *आणि स्वत*ःचा *वेगळा मार्ग* शोधू लागते

आपण एकटेच आहोत का ? आपली नौका वादळवाऱ्यात भरकटत आहे का ? आपल्याला कोणीच नाही का ? एकटेपणाच्या जाणिवेत कादंबरी संपते

वास्तवाचा भक्कम आधार असलेली ही कादंबरी. सत्ता, संपत्ती, समृद्धी याच्या आवरणाखाली असलेल्या भयाण वास्तवतेचे अत्यंत प्रत्ययकारी चित्र यात रंगवलेले आहे. परंतु लेखिकेने हे आयुष्य जितके जवळून पाहिले आहे तितकी त्या व्यक्तिमत्त्वाची बारकाईने मांडणी झालेली वाटत नाही. फारच वरवरचे प्रसंग देऊन निष्कर्ष काढलेले आहेत असं वाटतं. त्यामुळंच कादंबरी अतिशय एकांगी वाटते. नायकाच्या चुकांचा पाढाच वाचल्यासारखे वाटते.

दुसरी खटकणारी गोष्ट म्हणजे (लेखिकेचा हा पहिलाच प्रयत्न आहे हे समजूनसुद्धा भाषा अत्यंत बालबोध वाटते. पुस्तकाचं कुठलही पान उघडलं तरी, 'बाबाकाकाच्या प्रेमळ मनाची ही प्रचीती पाहून शैला हेलावली!' 'रश्मीच्या रागीट स्वभावानं शैला चपापली...' अशी वाक्यं दिसतील.

हे सर्व असूनसुद्धा कादंबरीचा आशय जास्त महत्त्वाचा आहे. आज समाजात, राजकारणात जे दिसतं त्या पार्श्वभूमीवर तो जास्त मनाला भिडतो.

–सौ. वंदना भाले

मृगजळातील नौका
लेखिका–श्रीमती सुशीला गोखले–पटेल
ह वि. मोटे प्रकाशन
किमत पन्नास रुपये

---

एका युवराज्ञीची फसलेली कैफियत

# दीपशिखा

सांगलीच्या पद्मिनीराजे पटवर्धन याची 'दीपशिखा' या सांकेतिक नावाची कादंबरी (?) नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. 'दीपशिखे' चा सरळ अर्थ दीपज्योत असा होतो; *पण या शब्दाचा साकेतिक अर्थ वेगळा* आहे. तो काव्यरसिकांना, विशेषत. विरही प्रेमीजीवांना तरी सागायला नको. समर्पण वृत्तीने ज्योतीवर झडप घालून जिवाचा अंत झाला की, एक शोकान्त प्रेमकथा निर्माण होते *आणि ती* वाचून रसिकाना आनंदही होतो; पण या सनातन अनुभवाचा प्रत्यय पद्मिनीराजाची 'दीपशिखा' देते काय, देत असल्यास कितपत, हा खरा प्रश्न आहे हेतुपूर्वक कादंबरीला दिलेल्या नावाशी तिचं कथानक, कथाशय कितपत सुसंगत आहे हे तपासलं पाहिजे.

आपली कादंबरी प्रीतिकथा नसून तीत २५–३० वर्षांच्या कालखंडातील समाजाचं प्रतिबिंब आहे असं लेखिकेनं आपलं 'मनो-

गत ' व्यक्त केलं आहे. ते करण्यापूर्वी ती असंही आवर्जून सांगते की, ' हे केवळ काल्पनिक पुस्तक आहे. ते अमुक एका साहित्यिक साच्यात बसावे असा माझा आग्रह नाही. या कादंबरीतील सर्व पात्रे, घटना आणि स्थळे ही काल्पनिक आहेत. साम्य दिसले तर योगायोग समजावा. प्रसिद्धी अथवा अर्थप्राप्ती हा माझ्या लेखनाचा हेतू नाही. '

प्रसिद्धीचा हेतु नव्हता, तर बारा वर्षे जपून ठेवलेलं आणि अनेकांना वाचावयास दिलेलं हस्तलिखित एकाएकी १९८२ सालात प्रकाशित का बरं व्हावं ? केवळ शांताबाई किर्लोस्कर आणि विद्या बाळ यांनी प्रोत्साहित केलं म्हणून ? त्याना पुस्तक कादबरी वाटली म्हणून १९७० मधील हस्तलिखित एकदम ' स्त्री ' वाटे प्रकरणशः आणि नंतर पुस्तकरूपानं प्रकाशात यावं ? बरं, आपलं पुस्तक कादंबरी म्हणून। एकदा वाचकांपुढं सादर करण्याचं ठरल्यावर 'साम्य-योगायोग' अशी आवर्जून सूचना देण्याची आवश्यकता काय ?

लेखिकेनं आपलं ' मनोगत ' इतकं खुलं केलं नसतं तर बरं झालं असतं; पण त्यातील काल्पनिकतेचा निर्वाळा पुन्हापुन्हा दिल्यामुळं सुजाण वाचक, कान टवकारून बघावं त्याप्रमाणे या कादंबरीतील सर्व घटनाप्रसंग, स्थळं आणि पात्रं या सर्वांचा शोध घेत राहणार आहे आणि मग साहजिकच त्याच्या मनात येणार की, आपण वाचत आहोत ती कल्पित कादंबरी की नावलौकिक असणाऱ्या एका दक्षिणी संस्थानच्या युवराज्ञीची आत्मसमर्थनार्थ लिहिलेली कैफियत ? की बखर ? या कादबरीत कोणत्या कालखंडातील कोणत्या समाजाचं प्रतिबिंब दिसतं ? कादंबरी समाजचित्रणावर केंद्रित आहे की, युवराज्ञीच्या व्यक्तिगत आत्मकेंद्रित विफल जीवनाचं तीत ठळक प्रतिबिंब आहे ?

' दीपशिखे ' चं कथानक ज्या काळात घडत तो काळ अगदी नजीकचा, म्हणजे स्थूलमानानं १९३७ ते १९६७ असा तीस वर्षांचा आहे. या काळात दुसरं महायुद्ध घडलं, भारताला स्वातंत्र्य मिळालं, संस्थानिकांना तनखे मिळून ती भारतात विलीन झाली, देशात चार वेळा सार्वत्रिक निवडणुका झाल्या आणि नेहरूयुगाचा अन्त होऊन इंदिरायुगाची नान्दी झडली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, गृहमंत्री आणि पतप्रधान याचे उल्लेख कादबरीत वारसाहक्क आणि वाटण्या याच्या संदर्भात येतात. नेहरूचा तर एकदा स्पष्ट उल्लेख आहे. पृष्ठ ३३ वर माउंटबॅटनचा अकाली उल्लेख वाचायला मिळतो. ( तो काळ आहे १९३०–३२ चा ) काही असो, या काळात भारतात शैक्षणिक नि औद्योगिक प्रगती पुष्कळ झाली. मध्यमवर्गीय स्त्रीन तक्रार करावी असं कुठलंही वातावरण उरलेलं नाही. लेखिकेन रंगवलेल संस्थानिक घराण्यातील वातावरण, तिथली गृहछिद्रं, स्वार्थ, कारस्थानं, धर्मभोळेपणा, अनैतिक कृत्यं, सास्वानणदानी सुनेचा केलेला छळवाद इत्यादी गोष्टी आणि वर संकल्पिलेला आधुनिक काळ यात खरोखर मेळ बसतो का ? तर बाह्यत ही नाही आणि पात्राच्या स्वभावचित्रणातही नाही.

या कादबरीचा प्रथमार्ध आणि उत्तरार्ध यात स्वरूपतः अंतर बरंच आहे. प्रथमार्धात ज्योतिकेच दरिद्री माहेर, सौंदर्यामुळं मध्यस्थासार्फत तिचा राजमंदिरी प्रवेश, युवराजपती आचरट-वेडपट असल्याचा धक्कादायक अनुभव, साऱ्या राजघराण्यावर सासूचं असणारं वर्चस्व, श्वशुराच्या व्याह्यांचा आणि लुधियानाच्या गुरुमहाराजांचा घराण्यावरील मानसिक कबजा, भरीला श्रीमंत उच्चभ्रू नणंदांचा सासुरवास, विलिनीकरणाच्या काळात संपत्ती आणि हक्क याबाबतीत झालेली कौटुंबिक कारस्थानं, आश्रितांचा लाळघोटेपणा, गुरूच्या आज्ञेबरहुकूम दोन पुत्रसतती देण्यापुरताच पतीचा घडलेला सहवास आणि हे सर्व घडत असता ज्योतिकेला प्राप्त झालेलं एकाकीपण, पुत्राच्या व स्वतःच्या शिक्षणासाठी चाललेला तिचा आटापिटा, ही सर्व हकिकत प्रथमार्धात वाचायला मिळते. कादबरीची पाऊणटक्का पृष्ठे या हकिकतीनेच व्यापली आहेत. ज्योतिका आणि भूषण यांच्या प्रेमजीवनावर अधिक पृष्ठे लिहिली असती तर कादंबरीचं निदान सार्थ ठरलं असतं. ज्योतिकेला पती दुरावलेला असतो, किंबहुना त्याच्याविषयी तिला घृणाच वाटत असते. घृणा वाटावी असंच त्याचं एकूण चित्रण केलेलं आहे. सहानुभूतिशून्य अशा वातावरणात ती एम. ए. एल. एल. बी. पर्यंत शिक्षणाची मजल मारते हे मात्र गौडबंगाल आहे.

पुत्रांच्या शिक्षणासाठी हुजूरसरकार जी सल्लागारसमिती नेमतात त्या समितीवर वसंतपुरातील भूषणनामक एका कर्तबगार प्रशासकाची नेमणूक होते आणि इथपासून कादंबरीचा उत्तरार्ध सुरू होतो. ज्योतिका सल्लामसलतीच्या निमित्ताने भूषणच्या सहवासात येते व अखेर या सहवासाला प्रीतीची पालवी फुटून एक नवं भावजीवन सुरू होतं. भूषणची पत्नी वेडसर, आक्रस्ताळी असल्याने तोही ज्योतिकेप्रमाणे दु:खी असतो. साहजिकच मग हे समदुःखी जीव एकमेकांकडे आकर्षिले जातात आणि ज्योतिकेची स्थिती दोलायमान होते. शेवटी मीलनमार्गातील सर्व अडचणी हळूहळू दूर होतात. भूषण प्रशासकीय वस्त्रं उतरून राजकारणात पडतो, सार्वत्रिक निवडणूक जिंकून दिल्लीस जातो; पण अकस्मात विमान अपघातात त्यास मृत्यू येतो. मुंबईस त्याच्या अंत्यदर्शनप्रसंगी ज्योतिका आणि तिची मुलं फक्त आकान्त करतात. ज्योतिका फक्त मूक

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

**मूल्य दहा रुपये**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

विलाप करते. दीपशिखेची कथा इथे संपते.

ज्योतिका हे कादंबरीचं प्रमुख पात्र आहे. ते लेखिकेन अतिशय स्वयंकेंद्रित रंगवलं आहे. म्हणजे असं की, आपल्या वाताहत झालेल्या वैवाहिक जीवनात सर्व भलेपणा ती स्वतःकडे घेते आणि भूषणखेरीज इतर सर्व खोगीरभरती केलेल्या पात्रांवर दोषांचं खापर फोडते. तिचे युवराजपती आचरट, वेडसर, गुरूंच्या आज्ञेत राहणारे आणि वैवाहिक सुखाबाबत पूर्ण उदासीन आहेत. गुरुमहाराज, मामा कृष्णराव, माता-पिता, विशेषतः मातुश्री राणीसरकार सांगतील तसं जगणं एवढंच *बिचाऱ्याच्या* हाती. या मातापित्यांना नातवाच्या, म्हणजे वारसांच्या जन्मामुळे आनंदापेक्षा दुःखच अधिक होतं. सासूचं (राणीसरकार) चित्रण तर असं काळ्या रंगात रंगवलं आहे की, आनंदीबाई फिक्की पडावी वैवाहिक सुखाला पारखी झालेली सुविद्य स्त्री, भूषणच्या सहवासात आल्यावर त्याला प्रतिसाद न देता, नुसतं खेळवत ठेवते आणि आपल्या योगक्षेमाची काळजी वाहात दुःख पिंजत बसते. स्वातंत्र्योत्तर काळातील गर्भश्रीमंत, सुविद्य सुविद्य स्त्रीचं 'दीपशिखे'तील हे सारं चित्रण अत्यंत कृत्रिम, ऊरबडवं झालेलं आहे. दुःख ओढवून घेणं आणि त्या दुःखातच गुरफटत राहणं हीसुद्धा एक विकृतीच नाही का? सावली असता उन्हातून चालत राहणारी ज्योतिका ही खरं तर आपल्या युवराजपतीपेक्षाही वेडी म्हटली पाहिजे. सर्वात आश्चर्य म्हणजे युवराज्ञी ज्योतिका आपल्या दरिद्री आईबापाना आणि धाकट्या भावंडाना पूर्ण विसरते. त्यांच्यासाठी ती कधी तरी तळमळते, पण काहीही करत नाही. कधी त्यांना भेटत नाही. तिची ही निष्क्रियता राणीसरकारांपेक्षाही निष्ठुर आहे. *अनुकूल परिस्थिती आली असता*, माहेरची काळजी न वाहणे आणि भूषणलाही सुखी न करता अप्रत्यक्षतः त्याच्या मृत्यूला कारणीभूत होणे हे प्रौढ ज्योतिकेचं वर्तन तिच्याविषयी सहानुभूती तर उत्पन्न करीत नाहीच, पण तिरस्काराला मात्र पात्र होते. ना सासर, ना माहेर, ना सुफलित प्रेमजीवन या अवस्थेला तिची अतिरिक्त स्वयंकेंद्रितता हेच प्रमुख कारण आहे. भूषणच्या अकस्मात मृत्यूमुळे, ओठाशी आलेला प्याला खळकन फुटावा तद्वत् तिला नियती एक प्रकारे शिक्षाच देते. ही सर्व कादंबरी ज्योतिकेविषयी सहानुभूती वाटावी, अशा पद्धतीने विणली आहे; पण हा हेतू साध्य न होता, ज्योतिका ही एक आत्मकेंद्रित, कांगावखोर युवराज्ञी आणि भेकड प्रेमिका आहे; असंच वाचकांचं मत होईल. आणि मग जी दुष्ट पात्रं म्हणून उभी केली आहेत त्याच्याकडे सहानुभूतीचा मोहरा वळू लागेल.

'दीपशिखे'तील स्थळं आणि पात्रं सुजाण वाचकाच्या इतक्या परिचयाची आहेत की, त्यामुळं कल्पित कथा आपसूक पडद्याआड जाते आणि ती-ती पात्रं नि स्थळं मनःचक्षूसमोर येऊन आपापली जणू कैफियत सांगतात *नि ज्योतिकेनं अंधारात केलेले वार* सर्वांना दाखवतात. मराठी कादंबरीत 'दीपशिखे' सारखा कादंबरीरूप नवा चर्चाविषय व्हावा असा आत्मकथात्मक प्रवाह येऊ पाहत आहे. हे इष्ट की अनिष्ट हे काळ ठरवील.

—म. श्री. दीक्षित

**दीपशिखा**
पद्मिनीराजे पटवर्धन,
श्रीविद्या प्रकाशन,
मूल्य : ३५ रु.

# घरंदाज मराठी नाटकांचे समाजशास्त्र एक टिपण

प्रा. गोपाल दत्त कुलकर्णी, नाशिक

एका पंधरवड्यात प. सा. नाट्यगृह (नाशिक) येथे लागोपाठ 'वाहतो ही दूर्वांची जुडी' (बाळ कोल्हटकर) व 'अश्रूंची झाली फुले' (वसंत कानेटकर) यांची ही लोकप्रिय सामाजिक स्वतंत्र नाटके पाहण्याचा योग आला. इतर काही मराठी नाटककारांप्रमाणे कानेटकर व कोल्हटकर परकीय कथावस्तूची उचलेगिरी करत नाहीत हे ऐकले-वाचले होते. वास्तविक जगातील सर्वांत श्रेष्ठ नाटककार शेक्सपियरने निव्वळ कथावस्तूचीच उचलेगिरी केलेली नाही, तर त्याने समकालीनांच्या नाटकातले उतारेच्या उतारे उचलले आहेत, असे म्हणतात. तेव्हा 'स्वतंत्र' सामाजिक नाटक हे विशेषण काही अहंगंडांना कुरवाळत असेलही, पण त्यात फारसे तथ्य नाही. कारण सामान्य वकूबाचे निर्जीव 'स्वतंत्र' नाटक लिहिण्यापेक्षा महाभारतातून उचलून 'शाकुंतल' लिहिणे केव्हाही चांगले आहे. वास्तविक आधुनिक मराठी साहित्य डॉ. केतकराची साक्ष काढावयास गेल्यास 'पुरेसे परपुष्ट नाही' म्हणजे उचलेगिरी विपुल आहे, पण 'पुचाटता' नाही.

हा लेख लिहिताना मी कोल्हटकराची 'जुडी' व कानेटकराचे 'अश्रु-फुले' नाटकाची छापील संहिता पुढे ठेवून बसलो नाही. तरीही ही नाटके-दोन्हीही फॉर्म्युला-नाटके आहेत. हंसू व आंसू याचा त्यात बेतशीर व मध्यमवर्गीय प्रेक्षकांना सोसेल म्हणण्यापेक्षा आवडेल इतपत कालवून चमचमीत पदार्थ तयार करण्यात आलेला आहे. कोल्हटकराची व कानेटकरांची नाटके 'अश्लील' नसतात, असे एक मत वारंवार ऐकू येते अमुक गोष्ट 'नसणे' हा गुण मानणे नकारात्मक घटकांना प्राधान्य देणे हा मध्यमवर्गीयांच्या संस्कृतीचा घाट आहे ! काय आहे त्यापेक्षा काय नाही यांना मध्यमवर्गात महत्त्व दिले जाते ! जगात फक्त एक 'श्लील' पुस्तक आहे व ते म्हणजे 'टेलिफोन

डिरेक्टरी' (इति बर्नार्ड शॉ) तेव्हा घरंदाज नाटक याचा मध्यमवर्गापुरता अर्थ विशिष्ट गुणनिर्देशक नसून कुटुंबाची एका विशिष्ट तीही ब्राह्मणी घराची सुखदु:खे विशेष करून पुळचट दु:खेच उघळत सुखान्ताकडे प्रवास म्हणजे मराठी घरंदाज नाटक, मध्यमवर्गीय घरातील कुटुंबप्रमुख व त्याचे परावलंबी आप्त (त्यात पत्नी आली) यांच्या खऱ्या–खोटया दु:खाना गोंजारणाऱ्या दृश्याची, प्रसग–घटनाची रेलचेल म्हणजे आपले श्लील नाटक! वास्तविक अश्लीलतेपेक्षाही वाईट (अव) गुण नाटकात असू शकतात ? उदा. त्याच त्याच प्रतिगामी भावनाना कुरवाळत राहणे उबवलेल्या भावनाना (sentiments) मेलोड्रॅमॅटिक पद्धतीने सादर करणे...वगैरे. मराठी सिनेमा व नाटक (अर्थात कथित घरंदाज) हे नेहमी ब्राह्मण मध्यमवर्गाला उद्देशून असते. कारण जे काही नकारात्मक नीतिनियम आहेत ते निष्ठेने पाळण्यापेक्षा त्यांच्यात तूर्त तरी इतर काही धाडस दिसत नाही. रेडिओवरील नाटकाचे उदाहरण घेतले तर आपली करमणूक किती मृगजलसारखी. (दूरस्थ या अर्थाने नव्हे तर कोरडी या अर्थाने) व त्याच त्याच प्रसंगांना पालवणारी असते हे ध्यानात येते. रेडिओवरील नभोनाटये ही विशिष्ट वर्गाची दु:खे उगाळत राहतात, समाजशास्त्रात ज्याला 'संस्कृतिकरणाची प्रक्रिया म्हणतात, ती विचारात घेता आपल्याहून उच्च जातीप्रमाणे होण्यात इतराना धन्य वाटत राहते. ब्राह्मणासारखे होणे ह्याचा अर्थ त्याच्या दुर्गुणासह भेदरटपणासकट अनुकरण नव्हे! म्हणून तर हल्ली मराठी तरुण सैन्यात आढळत नाहीत. ही तक्रार होत नाही ना ? कारण मध्यमवर्गीयांचे संघर्ष शारीरिक पातळीपर्यंत पोचत नाहीत, ते 'कुढण्या'त धन्यता मानतात. 'तळीतले जग नळीत जगते' हे वर्णन मराठी मध्यमवर्गीय माणसाचे व्यवच्छेदक वर्णन आहे.

कोल्हटकर व कानेटकरानी अलीकडच्या काळात मराठी नाटक वाचवून तगवल्याचा त्याच्यावर आरोप किंवा गौरव केला जातो. जसे तेंडुलकरी नाटक प्रातिनिधिक नाही, तसेच कोल्हटकरी किंवा कानेटकरी नाटक प्रातिनिधिक नाही. सर्व मराठी प्रेक्षकांना भिडणारे नाटक कोणते ? अशा वेळी कोणतीच कलाकृती तेवढी प्रातिनिधिक किंवा युनिव्हर्सल नसल्याचा प्रतिवाद करता येईल, पण प्रश्नाचे उत्तर प्रतिप्रश्न नसते ! कानेटकर प्रारंभी प्रायोगिक नाटके (वेडयाचे घर उन्हात वगैरे) लिहित होते, नतर त्यांना सूट उर्फ भट्टी उर्फ फॉर्म्युला सापडला फॉर्म्युला म्हणजे मिडास-स्पर्शाप्रमाणे असतो, मग तो कानेटकर-कोल्हटकरांचा असो की सलीम-जावेदचा ! हा 'फॉर्म्युला' सापडला की त्याची चाकोरी बनते– (त्याला हायवे म्हणा हवं तर!) मग नाटककार प्रेक्षकांना ती चाकोरी हाच संस्कार, किंवा सस्कृति हा क्रम वाढत राहतो. वास्तविक 'कुलीनपणा' हा घाऊक वर्ग गुण नसून व्यक्ति-गुणविशेष आहे..

दूर्वांची जुडी व अश्रु–फुले यातील साम्य पाहून मला आश्चर्य वाटले. कोल्हटकरांच्या नाटकात स्व–रचित कविता आहेत (वाया गेलेला हुषार मुलगा कविता करणार नाही तर काय करणार ? तेवढीच प्रेक्षकाची सहानुभूती!) तर कानेटकरांचा गणित शिकविणारा व तज्ज्ञ प्राचार्य शाकुंतल व शेक्सपियर 'कोट' करतो. (तेही साधारणपणे अज्ञात ओळी नव्हे, तर समोरच्या प्रेक्षकांपैकी अनेकांनी टेक्स्ट म्हणून अभ्यासलेल्या नाटकातल्या सर्वज्ञात ओळी.)

'जुडी' मधल्या म्हाताऱ्या वकील बापाची बायको मेलेली आहे, तर 'फुले' तील प्राचार्याचा मुलगा मेलेला आहे. प्राचार्य तत्त्वासाठी झगडतो तसाच नेमका 'जुडीतला' विधुर बाप कुणा जन्मठेपीतल्या कैद्यासाठी झगडतो ! हा बाप ज्याप्रमाणे ध्येयवादी (?) आहे व न्याय व कायदा बदलण्याची भाषा बोलतो, तसा कानेटकरांचा प्राचार्य 'लाल्या' नामक 'अंतरी' चांगुलपणा असलेल्या मुलासाठी धडपडतो. दोन्ही नाटकांचे शेवटी एकेक पात्र तुरुंगात जाते, ते 'गुन्ह्याला शिक्षा झाली पाहिजे' हा सिद्धान्त जगाच्या माथी थोपण्यासाठी ! तरी बरे, मध्यम वर्गीयात लाच खाणारे संभावित, शहाजोग डाकू किती जण असतील ? अर्थात् त्या गुन्ह्यांना ही नाटके पाहणे ही शिक्षा (हिंदी अर्थाने-शिकवण) असावी ! जुडीमध्ये प्रत्येक पात्र येता–जाता पाय धुते. कानेटकरांच्या नाटकात एक पारिजातकाचे झाड आहे. कानेटकराचा प्राचार्य चार–आठ दिवसात प्रत्यक्ष स्टेजवर एका दृश्यात लाल्याला दुरुस्त करतो; पण बालमित्र शंभुमहादेववर प्राचार्यांच्या चागुलपणाचा ५० वर्षांत प्रभाव पडत नाही. तोच प्रकार कोल्हटकरांच्या नाटकात आहे, 'ताई' गुणी निपजते, तर भाऊ दुर्गुणी! ताईला मॅचिंग म्हणून कानेटकराच्या नाटकात प्राचार्य–पत्नी आहेतच ! हिंदी चित्रपटांप्रमाणे दोघाच्याही नाटकात चांगली व वाईट माणसे परस्पर-विरोधी 'कँपस्' मध्ये विभागली आहेत व शेवटी चांगली माणसे जिंकतात हा मध्यम-मार्ग–गोड शेवटासाठी चांगला असतो ! कोल्हटकरांच्या नाटकातले एक बावळट पात्र–मित्र विनोदी आहे, तर कानेटकराच्या नाटकातील हेच कार्य शभु–महादेव नावाचा स्मगलर–व्यभिचारी मित्र करतो. दुर्गुणी व्यक्ती चांगल्या माणसाला (प्राचार्य) साथ देते म्हणून तिचा कोणीच राग धरत नाही. कारण तो प्राचार्यांचा कैवारी आहे. लाल्याचे सुधारणे व भाऊचे बिघडणे ह्याही एकाच फॉर्म्युलारूपी नाण्याच्या दोन बाजू आहेत ! थिसिस व अँटीथिसिसप्रमाणे ! ताईशी एवढया सरळपणाने वागणारा बाप आपल्या औरस पुत्रावर एवढी धार धरतो तीही फॉर्म्युलासाठीच ! कारण मध्यमवर्गात या जातीचे बाप समोरच बसून, पाहिलंत 'माझ्या दु:खाना कोणी तरी वाचा फोडलीच !' म्हणून कुढतात प्राचार्य हा कार्लाइलच्या व्याख्येप्रमाणे सद्गुणातही 'ग्रेट' व दुर्गुणातही 'ग्रेट' दाखविणे, हेच नेमके हिंदी चित्रपटातील प्रारंभीचा गरीब अमिताभनंतर दरोडेखोर अमिताभ दाखविणाऱ्या कादरखानी फॉर्म्युल्यातही आढळते. कं. वि. स. खाडेकरांना कानेटकरांचा प्राचार्य स्मगलर झालेला पाहून हुदका आला होता म्हणे ! पण गॉडफादरी अवसान शेवटच्या सीनसाठी, लाल्याला दिलेली संथा वठली की नाही, हे अजमाविण्यासाठी होते. (प्राध्यापकमडळी फार तर पिरियड 'चुकवू' शकतील, ते काय जकात 'चुकवून' फॉरेन माल आणणार ? हां पुस्तकातील उचलेगिरी असेल तर ते जमू शकेल – ते स्मगलिंग जमेल !) ज्याप्रमाणे कोल्हाटकरांचा 'बाप' (नाटकातले ते म्हातारे पात्र) फक्त एक सद्गुणी व्यक्ती पैदा करू शकला, तेवढेच पेशाने शिक्षक असलेल्या कानेटकरांच्या प्राचार्याला साधते. नाही

तर त्यांच्या अन्नावर पोसलेला तो घामळू स्वार्थी प्राध्यापक रावण–धर्माप्पा-कँपमध्ये गेला नसता ! कोल्हटकराच्या नाटकातील भाऊची एक उल्लेखित प्रेयसी आहे, तशीच शंभु–महादेवाची रखेली (वरचेवर बदलणारी) आहे. जसा 'भाव-बंधन' मधला खलनायक शेवटच्या अंकात सुधारतो, तसेच कानेटकर–कोल्हटकराच्या नाटकातील तरुण नायक वेगवेगळ्या अंकात एकदम सुधारतात ! अलीकडच्या नाटकांच्या मानाने अश्रु–फुले मधील कानेटकरांचे संवाद गडकरी–छाप म्हणजे पल्लेदार (टाळीदार) आहेत, कोल्टकरांना तर काय 'छोटा गडकरीच' म्हणतात ! (तेव्हा टाळ्या हव्यातच.)

### प्रेक्षकांचे वय

खुशवंत सिंगावर तेच तेच जोक्स् किंवा चोरटे जोक्स् सांगितल्याचा आरोप केल्यावर त्यांनी उत्तर दिले होते की, जगात फक्त पाच जोक्स् आहेत, बाकी सर्व जोक्स् त्याचे तर्जुमे (व्हेरिएशन्स) आहेत. त्याप्रमाणे मराठीतील तथाकथित कौटुंबिक (सॉरी) घरंदाज ऊर्फ सर्व कुटुंबाने एकत्र बसून एन्जॉय करण्याची नाटके म्हणजे एकमेकांची व्हेरिएशन्स् असतात. कौटुंबिक नाटकाचे भाजणीत कुणी हिंग अभ्रिक टाकतो, तर दुसरा 'जिरे' तर तिसरा 'हरभरा डाळ'; पण असतात सर्व भाजणीचेच उप–प्रकार ! तेव्हां हीट व हॉट नाटके वाईट, शिवीगाळ ऐकविणारी नाटके वाईट वगैरे सबझूट आहे. कारण ती उघड-पणे पाहण्याचे धैर्य कोत्या मध्यमवर्गीयात नाही. 'तो मी नव्हेच 'सारखे चक्क व्यभिचारी व्यक्तीवर हिरोपण आरोपित करून बेतलेल्या नाटकाचेही, 'जुडी' व 'फुले' एवढे प्रयोग होतात, याचे कारण त्यांत 'उघड' अश्लीलता नाही. अर्थात उघड किंवा छुप्या अश्लीलतेच्या व्याख्या पुन्हा या तथाकथित घरंदाज प्रेक्षक व लेखकांजवळही नाहीत. जो नायक (तो मी नव्हेच) उघड-पणे सहा–सात स्त्रियांची शरीरे व संपत्ती निर्लज्जपणे भोगतो, त्यावर अश्लीलतेची तेव्हा व आताही टीका होत नाही. कारण जिवंतपणी अन्यायाविरुद्ध तोंड उघडण्याची काय शामत होती कुणा घरंदाजाची ? (वाचा : मुलखावेगळी माणसे : घडा पहिला, लेखिका वनमाला.)

ऑस्कर वाइल्ड म्हणत असे त्याप्रमाणे नाटकांचे (पुस्तकाचे) श्लील ऊर्फ कौटुंबिक व 'हॉट–हीट' असे प्रकार नसतात, नाटक चांगले वा वाईट एवढेच दोन प्रकार असतात. एखाद्या नाटकाचे अमुक शे व तमुक हजार प्रयोग झाले हे गमक लोकप्रियतेचे आहे. अर्थात लोकप्रियता हाही गुण मोठाच; पण मग अशा नाटककाराची गणना कादरखान व सलीम जावेद यांच्याशी केल्यास त्यांनी वाईट वाटून घेऊ नये. शोलेच्या गद्य–संवादांच्या एक लाख एल. पी. खपल्या म्हणून शोले जसा ग्रेट चित्रपट ठरत नाही, त्याचप्रमाणे अमुक इतके प्रयोग होणारी नाटके लिहिणारे नाटककार फॉर्म्युलावाले असल्याच्या आरोपातून सुटू शकत नाहीत ! मला वाटते, माधव मनोहरानीच मराठी नाटक 'थिटे' असल्याची टीका केली आहे मला त्यात आणखी एक शब्द 'अॅड' करायचाय की ते थिटे व 'खोटेही' आहे–तरीही लोकप्रिय ऊर्फ गल्लाभरू आहे. मराठी नाटकाचे व त्या थोर मध्यमवर्गीय प्रेक्षकाचे दुर्दैव असे की, नाटककारही वाढत नाही तसे प्रेक्षकही (वयाने) वाढत नाहीत. सत्यजित रेंनी भारतीय चित्रपट पाहणाऱ्या प्रेक्षकांचे सरासरी वय ८ ते १२ असल्याचे म्हटले आहे, ते थोडे वाढवून मराठी नाट्यप्रेक्षकाचे वय १३–१४ असल्याचे म्हणता येईल. हे वय इंग्रजीत 'टीन्स' म्हणतात, तसेच मराठी नाटकाचे विश्व टिन्सेल (बेगडी) आहे ! किशोर वयात हसणे–रडणे ऊठसूठ संभवते. त्याचप्रमाणे प्रयोगांची भेंडोळी पाहूनही 'घरंदाज' रसिकांना ही नाटके फॉर्म्युला वाटत नाहीत! 'ग्राहकांचा संतोष हाच आमचा फायदा' हे दृश्य बोधचिन्ह असणारी अनेक नाटके खास मराठी मध्यमवर्गाच्या दुर्गुणांवर व मर्मस्थानावर (वीक पॉइंट्स्) बोट ठेवून बेतण्यात आली आहेत. त्यातले स्पेशॅलिस्ट हे दोन 'कर' आहेत. त्यांनी जेव्हा जेव्हा स्वनिर्मित चाकोरी सोडण्याचा प्रयोग वा प्रयत्न केला तेव्हा 'घरंदाज' प्रेक्षकानी ती नाटके पाडली. (उदा. माणसाला डंख मातीचा, सीमेवरून परत जा वगैरे) शेवटी हिंदी संगीताप्रमाणे कोल्हटकर व कानेटकर 'हॅमर' व स्वतःला किंवा परस्परांना 'रिपीट' करतात तेव्हा 'हिट' ठरतात. मराठी रंगभूमीचे दुर्दैव असे की, तिचा ऐहिक जीवनाधार (म्ह. गल्ला) पुरविणारा मध्यमवर्गीय प्रेक्षक स्वत: तर वाढत नाहीच (मानसिक वयाने म्हणजे बुद्धीने) व वाढण्याचे सामर्थ्य असलेल्या 'प्रॉमिसिंग' नाटककारांना तो अष्टांगांची जुडी करायला लावून शेवटी 'मातीत ते पसरले किती रम्य पंख !' याचा विदारक प्रत्यय आणून देती !

सामाजिक फॉर्म्युला असा आहे : व्यवहारात एकत्र कुटुंब उधळून लावणारा तरीही आत कुठे तरी ते सलत ठेवणारा वा ठणकत राहिलेला, जुन्या (म्हणून चांगल्या नव्हे) मूल्यांना वरवर मानणारा (उदा. देव्हाऱ्यातील शाळिग्राम) ही मूल्येसुद्धा कोणती? तर मध्यमवर्गीय व तीही ब्राह्मणी (जुडीतली पात्रे चक्क कोकणस्थ आहेत, कानेटकरांनी आडनावे टाकली तरी त्यांचे 'वळण' ब्राह्मणीच आहे.) मूल्ये व संस्था जपणारी पात्रे व त्याचे भंपक, पोचट प्रश्न सुभाषितवजा चटपटीत संवादांतून मांडले (मात्र शेवट गोड हवा–कीर्तनानंतरच्या खिरापती-प्रमाणे) की झाले स्वतंत्र सामाजिक नाटक ! इंग्रजीत ज्यांना Platitudes म्हणतात, तसे हे घरंदाज नाटकांचे तत्त्वज्ञान ! वास्तविक अखिल महाराष्ट्रात संख्येने पाच टक्के नसलेल्या ब्राह्मणांची कुटुंबव्यवस्था व अवस्था हेच वर्तुळ यशस्वी नाटककार का निवडतो? कारण प्रेक्षक त्याच 'वर्गातला' आहे. म्ह. कनिष्ठ. उच्च मध्यमवर्गातला–एक तारखेला पगार घेणारा किंवा पर्क्सवाला किंवा टी. ए. डी. ए. वाला! मध्यंतरी म्हातारा व म्हातारी नायक-नायिकांची नाटकं (प्रारंभ–नटसम्राट) रंगभूमीवरील चलनी नाणी होती. (राजा परांजप्यांचा 'ऊनपाऊस' मात्र पडला; पण तोही परकीय कथेवर आधारित होता.) का ? तर जो प्रेक्षक आहे, विशेषतः शहरी नव–कुटुंबी जोडपी, त्यांचा 'गिल्टी कॉन्शन्स' सुखविणारी (कॅथॅर्सिस नव्हे परगेशन करणारी) ती नाटकं होती. ही जोडपी प्रत्यक्ष घरात म्हाताऱ्यांना 'नको' करून टाकतात, थेटरात मात्र त्याच म्हाताऱ्यांना डोक्यावर घेतात ! भारतीय मनुष्य मुळात Familistic प्रवृत्तीचा आहे. त्याचा फायदा उठविणारी नाटके चालतात. मराठी नाटके वर्गीय आहेत, ती या अर्थाने की, ती मध्यमवर्गीय आहेत. तोही मध्यमवर्ग असा की, जो चाकरमान्या आहे; हपापू खायरखोर आहे, पुरा ब्याद आहे,

जुनी मूल्ये जपण्याचा आव आणणारा, परंतु वास्तविक स्वत.त व भोवतालच्या समाजात स्वत.ची ओळख हरवलेला आहे ! त्याला ही घरंदाज नाटके 'आरसा' दाखवितात; पण असा आरसा की जो मायावी आहे, म्हणजे यथार्थ प्रतिबिंब दाखविणारा नाही, तर 'दर्पण' आहे. त्या मध्यमवर्गीयांचे संघर्ष देखील एवढे मिळमिळीत असतात, की बस्स्! किरकोळ गैरसमज किंवा किरकोळ अपमानांनी ही माणसे उध्वस्त होतात. त्यांचे अहंकारही जत्रेतल्या फुग्याएवढे पातळ आहेत त्यांच्यात एखादा ऑथेल्लो नाही, की जो मत्सर-संशयाने बायकोचा गळा घोटेल, उलट तो व्याख्यान, तेही पातिव्रत्यावरची कोटेशन्स् सांगत, झोडेल ! ज्यांचे मानापमान पोरकट, ज्यांचे रागलोभ बालिश, ज्यांचे तत्त्वज्ञान उधारीचे ते काय झपाटून टाकून उन्मळून टाकणारा अनुभव घेणार किंवा देणार ? असे जातिवंत नाटक लिहिणारे दुर्मिळ ! त्याचेही कारण जातिवंत पीळदार प्रेक्षक दुर्मिळ ! हल्ली जी काही नाटके तथाकथित बंडखोर मानली गेली, तीही एकीकडे या कौटुंबिक नाटकांचा धिःकार करत, त्याच मध्यमवर्गाला धक्के देत राहिली. अगदी वादग्रस्त 'घाशीराम' घेतले, तरी त्याचा हिरोही पुन्हा ब्राह्मणच ! तोही १००–१५० वर्षांपूर्वीचा ! मग त्याची थट्टा करायला पुन्हा त्याच्याच वंशजांनी गर्दी करावी ह्यात नवल नव्हते ! कारण पुन्हा मध्यमवर्गीयांना आपण किती उदार आहोत, हे दाखविण्याचा एक (अहं) गंड असतोच ! अशा विसविशीत, विरी गेलेल्या मध्यमवर्गीयांना तिंबून–थापून काही वस्तु बनविणेही अवघड ! मराठी नाटक प्रारंभापासून अथक असे मध्यम–वर्गीयच आहे–आणि मध्यमवर्गाने अधूनमधून महापुरुष निर्माण केलेही असतील–परंतु स्वातंत्र्योत्तर काळात संघटित मध्यमवर्गाने जसे अनेक गोष्टींवर अप्रत्यक्ष 'नियंत्रण' ठेवले आहे, (उदा० शासनयंत्रणा, वृत्तपत्रे) त्याच थाटात त्यांनी मराठी कलेच्या नाकातही वेसण घालून ठेवली आहे. नाटक ही गर्दीने उपभोगण्याची कला असे वचन टीकाग्रंथात असेसही; पण मराठी नाटक मध्यमवर्गीयांनी आपली भोगदासी करून ठेवली आहे जेव्हा कलावंत विशिष्ट प्रेक्षक व त्याची खिसा-पाकिटे व पर्सेस डोळ्यांपुढे ठेवून पेन उचलतो, तेव्हा तो काय काय लिहिणार हे अगोदरच ठाऊक (फोरगॉन कनक्लूजन) असते. शेक्सपियरचे नाव घेणारे हे नाटककार ! शेक्सपियर ज्या मनमुराद मस्तीत जगला, तसे जगायला शिकल्याशिवाय नाटककाराला किंवा कलावंताला प्रेक्षकांच्या लहरीवर मांड ठोकता येत नाही. आमची ढासळणारी (?) मूल्ये नाटकातून दाखवून आम्हाला गोंजारा म्हणणाऱ्याच्या मागणीबरहुकुम नाटके लिहिणारे काय लिहून लिहून लिहिणार ? फक्त बाटल्यांचे आकार व आतल्या रसायनाचे डोस कमीजास्त करत तोच फॉर्म्युला प्रिस्क्राईब करणार ! मध्यमवर्गाला स्वतःच्या कोशातून बाहेर पडायचे नाही, उंबरातून बाहेर पडायचे नाही, मग नाटककार तरी काय करणार ? ते त्यांना बाहेर काढण्याचे नाटक करत पुन्हा आतच थोपत राहतात. कारण नाटके लिहिणारेही सर्व पक्के मध्यमवर्गीयच आहेत. अशांनी –म्हणजे प्रेक्षक व नाटककारांनी आपण पृथ्वी तोलून धरणारे शेष असल्याचा आव निदान भरमसाठ 'डायलॉगबाजीतून' तरी मारू नये. हिंदी सिनेमावाल्यांना हसणारे तथाकथित बुद्धिजीवी आपणही एक वेगळ्या फॉर्म्युलाची –म्हणजे मार्क्स ज्याला 'ओपीएट' (अफीम) म्हणतो त्याचे बळी आहोत, हे विसरू नये. राम गणेश गडकऱ्यांच्या 'भावबंधन–एकच प्यालाचा' हॅंगओव्हर ६६ वर्षे टिकून राहावा, हेच आमच्या मध्यमवर्गाचे यश आणि शेळपटपणाही ! बैलगाडीच्या–युगातून मराठी माणूस जेटयुगात शरीराने आला, मनाने तो अजून १९ व्या का त्याही आधी कुठे तरी चाचपडत आहे. हे सांस्कृतिक पश्चायन (कल्चरल् लॅग) मराठी कलांच्या मानगुटीवरचा वेताळ आहे आणि दुर्दैव असे की, प्रेक्षक वा घरंदाज, स्वतंत्र–सामाजिक नाटकवाल्यापैकी एकही विक्रमादित्य नाही, की जो त्या वेताळाच्या मेंदूची छकले उडवू शकेल ! □


**तिचं सौंदर्य हाच तिचा शाप ठरला !....**
**स्त्रीबुवाबाजीवर झोत टाकणारी**
**'माणूस'मधून क्रमशः प्रसिद्ध**
**झालेली कादंबरी आता पुस्तकरूपात**
**प्रकाशित झाली.**

**सबला**
माधव शिरवळकर

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव, पुणे ३०**
**मूल्य रुपये बारा**

**सर्चलाइट**

अमृत पुरंदरे

# रासायनिक युद्ध

आजच्या जगात ज्या देशाकडे जास्त शक्तिमान अस्त्रं आहेत, तो देश 'मोठा' समजला जातो. मग त्या देशाची आर्थिक परिस्थिती, सामाजिक परिस्थिती किंवा इतर गोष्टी गौण होऊन बसतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे चीन. चीनमध्ये बऱ्याच प्रमाणात असाक्षरता, गरिबी पसरली आहे; परंतु त्यांच्याकडे असलेल्या प्रचंड युद्धसाहित्यामुळे तो देश जगातल्या पहिल्या तीन ताकदवान सत्तांमध्ये गणला जातो.

विविध प्रकारची युद्धतंत्रं सध्या चर्चिली जातात, उदा. अणुयुद्ध, जंतुयुद्ध, वायुयुद्ध, मानसशास्त्रीययुद्ध, रासायनिकयुद्ध इ. या सर्वांचा उद्देश मुख्यत्वेकरून शत्रुपक्षावर अतिशय जोरात आघात करणे, शत्रूची मोठ्या प्रमाणावर मनुष्यहानी वा वित्तहानी करणे, रसद थांबवणे, रस्ते बंद करणे, शहरे नष्ट करणे इ. साठी केला जातो. या क्षेत्रात इतके प्रचंड संशोधन चालू आहे की, जवळजवळ रोज नवे शोध लागत आहेत.

नुकतीच अमेरिकेच्या रेगन सरकारने रासायनिक अस्त्रांच्या निर्मितीला परवानगी दिली आणि दुसऱ्या दिवसापासून सर्व जगातून या घटनेवर अतिशय तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. त्यातल्या त्यात रशियाने तर रासायनिक अस्त्रांविरुद्ध मोठे अवडंबर माजवले. (रशिया या अस्त्रनिर्मितीला फार पूर्वीपासून विरोध करत आलेला आहे.) मी जेव्हा इकडेतिकडे यासंबंधी माहिती विचारायला लागलो तेव्हा माझ्या असं लक्षात आलं की, या संबंधात कोणालाच काही फारशी माहिती नाही. मग मी यावरच रासायनिकयुद्ध 'सर्चलाइट' टाकायचं ठरवलं.

जेव्हा युद्धामधील अस्त्रांमध्ये रसायनांचा वापर केला जातो तेव्हा त्याला रासायनिकयुद्ध असे म्हणतात. ही व्याख्या इतकी ढोबळ आहे की, तिच्यामध्ये जवळजवळ सर्वच अस्त्रे बसतील. आजकाल रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्र एकमेकांत इतकी गुंतली आहेत की, त्यांना वेगळे करणे अशक्य आहे. त्यामुळं या अस्त्रांचा थोडक्यात इतिहास बघणे सोईचे होईल.

पहिल्या महायुद्धात जर्मनांनी २२ एप्रिल १९१५ या दिवशी प्रथमच रासायनिक अस्त्रं वापरात आणली किंवा 'रासायनिकयुद्ध' हा शब्द याच सुमारास उदयाला आला. त्यांनी क्लोरिनची अनेक सिलिंडर्स फ्रान्स आणि इंग्लंड यांच्यावर मोकळी केली. जर्मनांनी हा वायू वाऱ्याबरोबर शत्रूच्या क्षेत्रात सोडला. त्याचा परिणाम फार भयंकर झाला. दोस्तांचे अनेक लोक मेले. त्यांना तातडीने माघार घ्यायला लागली; परंतु जर्मनांना या गोष्टीची कल्पना आली नाही. त्यांच्या कल्पनेपेक्षा फारच मोठा परिणाम या वायूने घडवला होता. या वायूचा पुरेसा साठा नसल्यामुळे आणि जर्मनांना त्याचा नेमका उपयोग आणि क्षमता लक्षात न आल्यामुळे त्याचा वापर थोडा काळ थांबला. तेवढ्या काळात दोस्तांनी क्लोरिन विरोधासाठी मुखवटे तयार तर केलेच; पण विषारी वायूंची निर्मितीसुद्धा चालू केली. पहिल्या महायुद्धाच्या उत्तरकाळात अनेक विषारी वायू दोन्ही बाजूंनी एकमेकांवर वापरले.

१९१८ नंतर या भयंकर विषारी वायूंवर इतकी टीका झाली की, तेव्हापासून आजपर्यंत कोठेही हे वायू वापरले गेले नाहीत; परंतु पहिल्या महायुद्धापूर्वीसुद्धा आगी लावण्यासाठी वेगवेगळी रसायने वापरली जात. तसेच गंधकापासून अतिशय दुर्गंधी पसरवणारे वायू आणि धूर सोडणारे काही बॉम्ब्ससुद्धा वापरात होते.

विषारी वायूंचा उपयोग बंद झाला याचे एक कारण म्हणजे या अस्त्राला योग्य मारकता नाही. वारा बदलला की योग्य परिणाम साधता येत नाही. दुसरं असं की, 'गॅसमास्कस्' मुळे मृत्यूचे प्रमाण बरेच घटले. या अस्त्रावर नियंत्रण ठेवणे कठीण जाते. तसेच वायूंचा साठा, गळती लागण्याच्या भीतीमुळे फार करता येत नाही.

## 'नापाम' आणि 'फॉस्फर बॉंब'

अश्रुधूर हा सुद्धा एक प्रकारचा रासायनिक बॉंबच आहे. छोटी बंडाळी मोडण्यासाठी त्याचा वापर केला जातो. पहिल्या महायुद्धात आगी लावण्यासाठी जर्मनांनी एक 'आग ओकणारे' (Flame Thrower) यंत्र उपयोगात आणले. पेट्रोलसारखा ज्वालाग्राही पदार्थ या यंत्रातून दूरवर फेकला जायचा. अमेरिकेत यावर बरेच संशोधन केले गेले आणि 'नापाम' नावाचे एक रसायन बनवले गेले. पेट्रोलवर जेव्हा नॅप्थानिक ॲसिड आणि पामिक ॲसिड यांच्या ॲल्युमिनिअम सोप (साबण) ची क्रिया होते तेव्हा एक चिकट द्रावण तयार होते. यालाच 'नापाम' असे म्हणतात. हे द्रावण जेव्हा फ्लेमथ्रोअर मधून फेकले जाते, तेव्हा ते नेहमीपेक्षा बरेच दूर टाकता येते. तसेच पेट्रोलपेक्षा ते जास्त वेळ आणि जास्त उष्णतेने जळते. 'नापाम'चे अजून एक वैशिष्ट्ये म्हणजे, ते ज्या ठिवाणी पडते त्या ठिकाणी चिकटून बसते आणि संपूर्ण जळाल्याशिवाय ते तेथून निघत नाही. पाण्यामुळे 'नापाम'ची आग विझत नाही. त्यामुळेच 'नापाम'चा उपयोग बॉंबमधूनसुद्धा केला जातो.

पांढरा फॉस्फरस हा सुद्धा आगी लावणाऱ्या बॉंबमध्ये वापरला जातो. (सध्या इस्त्राइल लेबॅनॉनमध्ये या प्रकारचे बॉंबस् वापरत आहे.) सर्वसाधारणपणे विस्फोटकाबरोबर त्याचे मिश्रण केले जाते. पांढऱ्या फॉस्फरचा आगी लावण्याच्या कामी उपयोग तर होतोच; पण त्याच्यामुळे अतिशय दाट असा पांढऱ्या रंगाचा धूर सुद्धा तयार होतो. या धुराचा उपयोग सैन्याच्या गुप्त हालचाली करण्यासाठी होऊ शकतो. पांढरा फॉस्फरस नापामपेक्षा दाहकतेने व तीव्रतेने जळतो. तसेच तो अंगाला चिकटून बसतो. तो विषारी सुद्धा आहे.

$TiCl_4$ म्हणजे टिटॅनियम टेट्रा क्लोराइड हे एक वाफाळणारे द्रवरूप रसायन आहे. ते जेव्हा हवेत मोकळे सोडले जाते तेव्हा त्याची हवेतील प्राणवायूवर अतिजलद प्रक्रिया होते आणि $TiOCl_2$ म्हणजेच टिटॅनियम ऑक्सिक्लोराइड तयार होते. पांढऱ्या रंगाच्या अतिशय दाट धुराच्या रूपाने $TiOcl_2$ दोन विरोधी सैन्यांच्यामध्ये एक पडदाच तयार करते. त्यामुळे माघार घेणं किंवा चाल करणं, तसेच वेगळी सैन्यरचना करणं शक्य होते.

१९२५ साली आंतरराष्ट्रीय कायद्याने प्राणघातक वायू तसेच विषारी, गुदमरवणारे, आग लावणारे वायू यांच्या युद्धातील वापरावर बंदी घातली. काही किरकोळ अपवाद सोडले तर ही बंदी अजून टिकून आहे. १९३५–३६ मध्ये, दुसऱ्या महायुद्धात इटलीने इथिओपियावर विषारी वायू वापरले. तसेच १९३७ ते ४२ या काळात जपानने चीनवर वरील रासायनिक अस्त्रे वापरली. दुसऱ्या महायुद्धात दोन्ही बाजूंनी अतिशय प्रचंड असा विषारी वायूंचा साठा करून ठेवला होता; परंतु तो वापरला गेला नाही. (एखाद्या वेळेला पुन्हा उट्टे काढले जाण्याची भीती दोन्ही बाजूंना वाटली असावी.) १९४५ साली १२,००० टन 'टॅबून' नावाचा अतिविषारी वायूचा साठा रशियनांना जर्मनीत सापडला. (पहिल्या महायुद्धात हिटलर स्वतः ब्रिटिशांच्या वायूला बळी पडता पडता वाचला होता. अशा वेळेला टॅबून का वापरला गेला नाही यावर सर्वच

लोक आश्चर्य व्यक्त करतात. ) हा वायू मज्जासंस्थेवर क्रिया करावयाचा व यामुळे माणसाला अर्धांगवायू व्हायचा. 'टॅबून' सध्या कालबाह्य समजला जातो, परंतु जर्मनांनीच तयार केलेले 'सरीन' आणि 'सोमन' हे वायू आजही तितकेच धोकादायक आहेत.

हल्ली हल्ली व्हिएतनामवर अमेरिकेने अनेक रासायनिक अस्त्रांची चाचणी घेतली असा उघड आरोप केला जातो. व्हिएतनाममधील जंगले नष्ट करण्यासाठी अमेरिकेनेही रासायनिक तसेच जिवाणूंच्या बाँबसचा वापर केल्याचे आता उघड झाले आहे. एकूण ४१५०००००० एकर जमिनीमधील ८६,००,००० एकर जमिनीवर ही वृक्षनाशके टाकली गेली. यामुळे १० टक्के जंगले, ३ टक्के लागवडीखालची जमीन व ३८ टक्के मनुष्यनिर्मित जंगले नष्ट झाली. त्यांचा परिणाम बराच दूरगामी असल्यामुळे पुन्हा या भागात जंगले तयार होणेसुद्धा अशक्य झाले आहे.

## अजब रसायन !

रशिया आणि अमेरिका नेहमीच एकमेकांवर चिखलफेक करत असतात. कधीकधी तर त्यांचा एकमेकांविरुद्धचा प्रचार कमालीचा पोरकट वाटतो. अफगाणिस्तानमध्ये रासायनिक अस्त्रे वापरल्याचा दावा अमेरिकेने केला की, लगेच रशिया अमेरिकेने व्हिएतनाममध्ये केलेल्या युद्धाची आठवण देते. व्हिएतनाममध्ये एक 'शिंक येणारा वायू' अमेरिकेने सोडला, असा दावा रशियाने केला आहे. या वायूमुळे मनुष्य बधिर होऊन जातो व १२ तास त्याला काहीही हालचाल करता येत नाही. त्यानंतर मात्र त्याच्यावर कोणतेही दुष्परिणाम दिसून येत नाहीत; परंतु T. B. किंवा इतर फुप्फुसाचे विकार असणाऱ्यांना वरील वायू मारक ठरू शकतो.

बायॉलॉजिकल अस्त्रे हीसुद्धा हल्ली मोठ्या प्रमाणावर तयार होत आहेत. ( बंदी असून ) शास्त्रज्ञांच्या मते यांचा उपयोग मनुष्यावर करण्यापेक्षा पाळीव प्राणी किंवा अन्नधान्य आणि जंगले यांच्यावर केला तर तो जास्त मारक ठरेल.


अमेरिकेत रेगन सरकारने १,६५,०,०००,००० डॉलर्सचा रासायनिक अस्त्रांचा प्रकल्प मंजूर केला आहे. ( नर्व्ह गॅस बाँब ) या प्रकल्पामध्ये एक नवीन प्रकारचा रासायनिक बाँब बनवण्यात येईल. दोन वेगवेगळी रसायने,जी अजिबात विषारी किंवा धोकादायक नाहीत,जेव्हा एकत्र येतील तेव्हा एक अतिविषारी वायू तयार होईल. मोटर-ऑइलसारख्या घट्ट अशा पदार्थाचे दाट धुके तयार होईल. ते वाऱ्यामुळे तर हालणार नाहीच; परंतु जमीन, झाडे किंवा ज्या गोष्टीशी संपर्क येईल त्याला घट्ट चिकटून बसेल. कपड्यातून तसेच कातडीतून ते सहज पार होईल. हा बाँब टाकल्यानंतर कित्येक दिवसांनी जरी एखादा सैनिक या रसायनाने खराब झालेल्या वस्तूच्या संपर्कात आला तरी त्याच्यावर याचा परिणाम होईल. याचे काही थोडे कणसुद्धा मनुष्याची हत्या घडवून आणायला पुरेसे आहेत.

मिथिल फॉस्फॉनिल डाय-फ्लुराइड आणि आयसो प्रोपेनॉल हीच ती दोन घटकद्रव्ये. यातील आयसो प्रोपेनॉलमध्ये काही गुप्त रसायने मिश्रित केली असण्याची शक्यता आहे.

## बाधा झाली तर...

एखाद्या माणसाला नर्व्हगॅसची बाधा झाली तर त्याची लक्षणं काय असू शकतील?

१. प्रथम डोळ्यांच्या बुबुळांचे अचानक आकुंचन होईल. जो या वायूचा बळी असेल त्याला एकदम सर्व दिवे गेल्याचा भास होईल.
२. लाळ गळू लागेल.
३. नाकातून पाणी येईल.
४. त्याच्या मनात नॉशिया उत्पन्न होईल.
५. उलट्या होऊ लागतील.
६. अनिवार्य लघवी लागेल.
७. आचके किंवा झटके येतील.
८. अर्धांगवायु होईल.
९. मृत्यू काही मिनिटात येईल. (जर का वायु श्वासातून गेला असेल तर) जर कातडीमधून विष भिनले असेल तर काही तासात माणूस मरेल.




१. फ्युज २. विस्फोटक ३. पहिला कप्पा (मिथिल फॉस्फोनिल डाय फ्लुराइड
४. सहज तुटणारी भिंत ५. दुसरा कप्पा (आयसो-प्रोपेनॉल)

यावर उपाय म्हणून 'अॅट्रोपिन' नावाचे औषध वापरता येते. याचे मोठे साठे सर्वच देशांनी आधीच करून ठेवलेले आहेत. या अॅट्रोपिनमुळे नर्व्हगॅसच्या कचाट्यातून माणूस वाचू शकतो. परंतु त्यापूर्वी कृत्रीम श्वासोच्छवास मात्र अतिशय जरुरीचा आहे.

हा नवीन बाँब कसा असेल ?

दोन भिन्न रसायनांसाठी दोन वेगळे कप्पे असतील. बाँबच्या नाकाकडील बाजूला स्फोटक द्रव्य असेल व त्यामागे मिथिल फॉस्फॉनिल डायफ्लुराइड असेल. त्याच्या लगतच्या कप्प्यात आयसो प्रोपेनॉल व कॅटॅलिस्ट (वरील दोन्ही रसायनांची क्रिया अति जलद घडवून आणणारा पदार्थ) असेल. या दोन कप्प्यांमधील भिंत बाँबच्या प्रचंड वेगाने आपोआप फाटेल व दोन रसायने एकत्र येतील. हा बाँब दर मिनिटाला १५००० फेऱ्या स्वत:भोवती मारत असेल. त्यामुळे वरील रसायने आपोआप वेगाने घुसळली जातील. जेव्हा बाँब योग्य ठिकाणी जाऊन फुटेल तेव्हा हा नर्व्हगॅस मोकळा होईल.

सध्या 'केमिकलवॉरफेअर'ला (रासायनिक युद्ध) इतका भाव आहे. कारण त्याच्यामुळे फक्त मनुष्यहानी होते पण वित्तहानी होत नाही. तसेच जेव्हा एखादा सैनिक या रसायनांचा त्रास होऊ नये म्हणून मुखवटा व अंगरखा घालतो तेव्हा त्याच्या दृष्टीचा टप्पा कमी होतो व त्याच्या सहज हालचालींना अडथळा येतो. नुसतं जेवायचं म्हटलं तरी ते अवघड होऊन बसते.

अनेक शास्त्रज्ञांच्या मते रासायनिक अस्त्रे मनुष्यहत्या लवकर घडवून आणतात. त्यामुळे माणसाला वेदना कमी होतात. जर युद्धाचा हेतु मनुष्यहानी हाच आहे, तर मग रासायनिक अस्त्रांमुळे कमीत कमी, लवकर तरी हत्या होईल. म्हणजे थोडक्यात माणसावर उपकारच होतील !

याच्याउलट काही शास्त्रज्ञांच्या मते सध्याच्या न्युट्रॉन बाँबच्या काळात रासायनिक अस्त्रांचा काहीही उपयोग नाही. (न्युट्रॉन बाँब सुद्धा मालमत्तेचे काहीही नुकसान करत नाही. परंतु न्युट्रॉनसच्या प्रचंड माऱ्यामुळे भयंकर जीवितहानी होते.) अंगावर अंगरखा आणि तोंडावर मुखवटा घातला की रासायनिक अस्त्रे कुचकामी ठरतात. परंतु न्युट्रॉन बाँबपासून बचावाचे काहीही साधन नाही. तसेच अजूनसुद्धा रासायनिक अस्त्रांना म्हणावी तेवढी अचूकता व भेदकता आलेली नाही. वारा असताना किंवा पाऊस असताना या अस्त्रांचा उपयोग होत नाही.

असो, परंतु जोपर्यंत शत्रूकडे रासायनिक शस्त्रे असतील तोपर्यंत ती आपल्याकडेही असावीत असे प्रत्येक राष्ट्राचे तत्त्व असेल. कमीत कमी,प्रश्नाला उत्तर देण्यासाठी तरी.□

**रंगभूमी**

# मालती माधव आणि मंडळी

## तेरड्याच्या कोमेजल्या फुलांचा गजरा

'या नाटकातील प्रसंगांचे टी. व्ही. वरील गजरा या कार्यक्रमाशी साम्य आढळल्यास कृपया तो योगायोग समजू नये.' अशीच सूचना नाटकापूर्वी झाल्यामुळे मी हताशच झालो. 'टी. व्ही. वरचा कार्यक्रम सुरू ठेवणे वा बंद करणे निदान आपल्या हातात तरी असते. नाटकासाठीसुद्धा असे काही तरी बटण ठेवले पाहिजे' असे चडफडत जे जे होईल ते ते पाहावे अशा शिक्षेला सिद्ध झालो. एकूणच या नाट्यगजऱ्यासाठी खुडण्यात येणाऱ्या फुलांचा मी 'संगीत सुकामेवा' या प्रकारापासून धसकाच घेतला होता. त्यात 'मा. मा आणि मं.'मध्ये सुरेश खरे, दया डोंगरे, दिलीप प्रभावळकर,बाळ कर्वे,मनोरमा वागळे आणि रमाकांत देशपांडे ही बरेच गजरे बनविलेली माळी मंडळी.

पडदा उघडला. रंगमंचावर एका प्रकाशझोतात सुरेश खरे उभे. (नाटकाचे लेखक हेच.) त्यांनी प्रेक्षकांकडे (म्हणजे रंगमंचासमोरील अंधारात) बघून मोठ्याने 'नमस्कार, मंडळी' असे म्हटले. (आतापर्यंत बऱ्याच नाटकात स्टेजवरून प्रेक्षकांना तीनतीनदा नमस्कार करूनही एखाद्या सुज्ञ प्रेक्षकाने त्याला प्रतिसाद दिल्याचे माझ्या तरी ऐकिवात नाही; पण यापासून काहीही धडा न घेता हे नाटकवाले लाडात येऊन वारंवार अशी सलगी का करतात कोण जाणे.) मग (प्रेक्षक अगदी गप्प असतानाही त्यापासून काहीही बोध न घेता) सुरेशरावांनी 'उशीर का झाला? रिक्षा मिळाली नाही वाटतं?' इत्यादी इत्यादी रीतसर (पण एकतर्फीच) चौकशी केली. अशा सगळ्या घरगुती गप्पा चालू असतानाच दया डोंगरे (नाटकाची निर्मिती आणि संकल्पना हे सुरेश खरे आणि दया डोंगऱ्यांचे संयुक्त कर्तृत्व आहे.) अचानक 'सुरेश, सुरेश' म्हणत मुद्दाम स्टेजवर आल्या आणि मग जणू काही आपण चुकून आलो आहोत आणि प्रेक्षकही आले आहेत हे समजल्यानंतर आश्चर्यचकित झालो आहोत (ही गोष्ट मात्र खरेच चकित करणारी होती.) असे दाखवीत त्यांनीही एक नाटकी नमस्कार ठोकला. मग 'आम्ही तुमच्याच आयुष्यातील काही घटना तुम्हाला दाखवणार आहोत आणि त्यातून मानवी स्वभावाचे पैलूबैलू मांडणार आहोत.' असा दम भरून हा सगळा घरगुतीपणा बंद करून गजऱ्यातील पहिले फूल दोऱ्यात ओवले.

मालती आणि माधव हे एक जोडपे— सामान्य, मध्यमवर्गीय, अर्थातच दोघांचा आय. क्यू. बराच कमी असणार हे उघड आहे. तर हे जोडपे आणि यांच्या आजूबाजूची काही माणसे यांच्या (म्हणजे आपल्याच; कारण सुरुवातीलाच खऱ्यांनी तसे सांगितले आहे आणि खरे खोटे कसे सांगतील? हा–हा–हा.) आयुष्यातील काही प्रसंग दाखवणारी स्किड्स आपल्यापुढे घडतात. पहिल्या अंकात पाच आणि दुसऱ्या अंकात सहा प्रसंग-प्रवेश आहेत. त्यांची पहिल्या फटक्यात यादीच सांगून टाकतो.

१) काटकसर–मालती (दया डोंगरे) आणि माधव (दिलीप प्रभावळकर) या जोडप्याने महागाई वाढल्यामुळे काटकसर करण्याचे ठरवले; पण या प्रयत्नात दोनशेसात रुपयांची काटकसर करण्यासाठी दोनशे अठ्ठावन्न रुपये खर्च झाले.

२) काळजी – प्रत्येक बारीकसारीक गोष्टींची काळजी करणारा, आपली कल्पनाशक्ती लढवून चिंधीचा शालू करणारा म्हातारा (रमाकांत देशपांडे) आणि त्याची बायको.

३) तक्रार-टी. व्ही. बिघडल्याची तक्रार घेऊन आलेला ग्राहक (बाळ कर्वे) आणि वर्फाहूनही थंडपणे त्याच्या तक्रारीची विल्हेवाट लावणारा तक्रारविभागातील कर्मचारी (दिलीप प्रभावळकर) यांच्यामधील हा प्रसंग बाकी संपूर्ण नाटकाला न शोभेसा उत्तम झाला.

४) पेन्शनर–शिवाजीपार्कवर जमणाऱ्या पेन्शनर म्हाताऱ्यांच्या इरसाल गप्पा आणि इस्रायल–पॅलेस्टाइन गनीम या झगड्यापासून सुनील गावसकरच्या खेळापर्यंत आणि अमिताभच्या तब्येतीपर्यंत सर्व विषयांवरील त्यांची शेलकी. अर्क मते असा हा विषय असल्याचे आधीच सांगितले होते, म्हणून मी या खास गाळीव अर्कपणासाठी त्यांच्या चिल्लर हवापाण्याच्या गप्पा बराच वेळ ऐकत बसलो आणि पाहता पाहता तो प्रसंगच संपला.

५) फॅड–'सब बातों पर एक ही इलाज' असे एखादे फॅड बऱ्याचजणांनी जपलेले असते. त्याप्रमाणे गीतापठण, योगासने, निसर्गोपचार आणि मालिश अशी चार फॅडे जपणाऱ्या चार व्यक्ती.

६) कुत्रा–विषय–कुत्र्याची भीती.

७) खरेदी-विक्री – दुकानात आलेल्या गिऱ्हाइकाशी तुसडेपणाने वागून गिऱ्हाईक आणि फायदा गमावणारा दुकानदार त्याच्याबद्दलचे बोधपर स्किड.

८) सांत्वन–एखाद्या मृताच्या नातेवाइकाचे सांत्वन करायला गेल्यावर आपण किती मुखवटा चढवून आणि कृत्रिम वागतो यावरील उपहासगर्भ स्किड.

९) आदर्श जोडपे.

१०) ऑफिसमधील चकाट्या.

११) निरोपसभा–बदली होऊन चाललेल्या सहकाऱ्याला.

प्रत्येक फुलाचे वर्णन करता करता कंटाळा आल्याने आणि सर्वांना ओवणारे समान सूत्र एव्हाना वाचकांना समजले असेल या कल्पनेने शेवटच्या तीन प्रवेशांची फक्त नावे घालून टाकली आहेत.

या सर्वच्चा सर्व अकरा प्रसंगांपैकी 'तक्रार' ह्या एकमेव प्रसंगाचा नवेपणा आणि ताजेपणा सोडल्यास बाकी सर्व फुलांचा यापूर्वी अनेक वेळा रंगदेवता आणि नाट्यरसिकांना वाहून वाहून पार निर्माल्य झालेला आहे.

या कोमेजल्या निर्माल्यावर पाणी मारमारून त्यांना ताजेपणा आणायचा प्रयत्न केला आहे तो अभिनेत्यांनी. दस्तुरखुद्द सुरेश खऱ्यांच्या निवेदकाच्या भूमिकेतील आखडलेल्या हालचाली आणि अति-घरगुतीपणाचा आभास निर्माण करू गेल्यामुळे जाणवणारा नाटकीपणा सोडल्यास सर्व अभिनेत्यांनी सर्व प्रसंगांमध्ये अतिशय दिलफेक कामे केली. याला अपवाद फक्त शिवाजीपार्कवरील म्हाताऱ्यांच्या गप्पांचा प्रसंग; पण याला कारण त्या प्रवेशाच्या लिखाणातच मुळात अजिबात जीव नव्हता. बाकी सर्व प्रसंगांमधील कसाबसा धरून बसलेला लहानसाही जीव सर्व अभिनेत्यांनी कौशल्याने फुलवला. आवर्जून उल्लेख करायला हवा तो दिलीप प्रभावळकरांचा.

काही महिन्यांपूर्वीच 'संकेत मीलनाचा' सारखे अप्रतिम नाटक दिल्यानंतर सुरेश खरे यांनी असा कोमेजल्या तेरड्याच्या फुलांचा गजरा द्यावा, ही फारच खिन्न करणारी गोष्ट होती.

**—सदानंद बोरसे**

MANOOS (Marathi Weekly) Two Rupees Regd. No. PNC-W 28
( Licensed to post without prepayment of postage-No. 11)



# वृक्ष लावा दारी पुण्य पाडा पदरी

★ पाच वर्षांपूर्वी रामजीनं आपल्या शेतातील अंब्याची पाच रोपटी लाविली. आता वाटसरू थंडगार पाणी पिऊन त्या वृक्षांच्या छायेत बसतात आणि त्याला दुआ देतात. शिवाय त्याच्या घरचे वर्षाचे लोणचें मोफतच तयार होते.

★ आणखी काय पाहिजे ? वृक्ष लाविल्याचे पुण्य घ्या आणि घरचीच फळे खा.

★ आमच्या देशात सुमारे २३ टक्के जमिनीवर वृक्ष आहेत ही टक्केवारी ३३ पर्यंत न्यावयाची आहे.

**वृक्ष म्हणजे इंधन, खत, फळे आणि फुलांची खाण**

सविस्तर माहितीसाठी खालील कूपन भरून पाठवा.

श्री. आर. के. जॉली
असिस्टंट प्रॉडक्शन मॅनेजर
रिजनल डिस्ट्रिब्यूशन सेंटर
२३, सिदपुर इंडस्ट्रियल इस्टेटस
हलाव पुल, मसरानी लेन
कुर्ला, मुंबई–४०००७०

नव्या २० कलमी कार्यक्रमाच्या माहितीसाठी कृपा करून मराठी/हिंदी/इंग्रजी पुस्तिका पाठवा.

नाव ..........................................

पत्ता ..........................................

.............................. पिन ..............

**नवा २० कलमी कार्यक्रम**

davp 82/192